म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. ७९०



REFBK-0006982

# गोपार

किमत २॥ रु.

हें पुस्तक/नियतकालिक नवें असल्याकारणानें प्रत्येकास लवकर मिळावें अशी उत्कंठा असते; तरी तें घेतल्यापासून निदान ७/८ दिवसांत परत करण्याची कृपा करावी.

# दर्यापार

दा. क्र. ६९८२

लेखक

कॅप्टन् अ. ह. लिमये

REFBK-0006982

किंमत २॥ रुपये

प्रकाशक :
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार पेठ, पुणें २.

१. मुखपृष्ठावरील चित्र दीनानाथ दलाल यांचें आहे.

२. पुढील आवृत्तीचे हक्क सौ. सुलोचना लिमये यांच्याकडे आहेत.

मुद्रक :
न. वि. सरदेशपांडे
आदर्श मुद्रणालय
२९५।५ सदाशिव, पुणें.

★

सौ. सुलोचनेस

—अनंत—

★

॥ श्री ॥

५४२ शनिवार पेठ, पुणें शहर
२९ जुलै १९४६.

सप्रेम नमस्कार वि. वि.

बालहट्ट पुरविण्याचा प्रसंग आजपावेतों मजवर जरी आला नाहीं तरी स्त्रीहट्ट मात्र मला पुरवावा लागला.

मुंबई सोडल्यापासून मीं नियमानें दैनंदिनी लिहीत असे. परक्या प्रांतांत एकाकीपणाचं जीवन कंठणं सोपं काम नाहीं. म्हणून दैनंदिनी हा एक चांगला विरंगुळा मिळे. परंतु एका चोरींत सुमारें ३०० पानांची दैनंदिनी चोरीला गेली. म्हणून दैनंदिनींत लिहावयाचा मजकूर सौ. सुलोचनेला पत्ररूपानें पाठवूं लागलों. कारण ‘ सर्व कांहीं अगदीं सविस्तर सांगा ’ असा तिचा हट्ट असणार ही माझी खात्री होतीच ! त्या हल्ल्याला तोंड देण्यासाठीं हा दारूगोळा मीं वापरूं लागलों. श्री. रामभाऊ देशमुख यांनीं मला कांहीं मराठी पुस्तकें पाठविलीं होतीं. अन् मीं त्या पुस्तकांची दिलेली पोंच त्यांना इतकी आवडली कीं प्रथम भेटींतच त्यांनीं माझीं पत्रें प्रकाशनासाठीं मागितलीं. हा सर्व मजकूर सौ. सुलोचनेच्या मालकीचा असल्यानें तिच्या परवानगीनें कांहीं पत्रें प्रसिद्ध करीत आहे. अर्थात् बरींचशीं पत्रें रस्त्यांत गहाळ झालीं. पत्रांतील कांहीं (!) मजकूर वगळला आहे हें सांगणें नकोच. मी कांहीं साहित्यिक नाहीं. परदेशांत असलेल्या एका अधिकाऱ्यानें प्रत्यक्ष पाहिलेल्या स्थळांचें प्रत्यक्ष चित्र आपल्या पत्नीपुढें उभें केलें आहे एवढाच यांत विशेष !

या पत्रांच्या प्रकाशनानें माझ्या मित्रांस व हितचिंतकांस तीं वर्णनें सांगितल्याचा आनंद मला मिळत आहे.

बाकी विशेष कांहीं नाहीं.

कळावें, लोभ आहेच, वृद्धि व्हावी ही विनंति.

आपला स्नेहांकित,

**अनंत हरि लिमये**

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | | |
|---|---|---|
| १ | फुलें आणि दगड (आ.दु.) | ३ |
| २ | घरट्याबाहेर ( ” ) | ३ |
| ३ | पहिली लाट ( ” ) | ३ |
| ४ | स्त्री आणि पुरुष ( ” ) | २ |
| ५ | सूर्यकमळें ( ” ) | २॥ |
| ६ | कालचीं स्वप्नें | ३ |
| ७ | आजचीं स्वप्नें | ३ |
| ८ | चंदेरी स्वप्नें | ३ |
| ९ | कलिका | २। |
| १० | सोनेरी सांवल्या | |
| ११ | मृगजळांतील कळ्या | २॥ |
| १२ | सुवर्णकण | २। |
| १३ | मंजिऱ्या | २। |
| १४ | सायंकाल ( आ. दु. ) | २॥ |
| १५ | अविनाश ( ” ) | १॥ |
| १६ | मंदाकिनी ( ” ) | १॥ |
| १७ | चांदण्यांत ( ” ) | २ |
| १८ | कल्पलता | ३ |
| १९ | आगरकर व्यक्ति आणि विचार | ३॥ |
| १० | सहा भाषणें | २ |
| २१ | तीन संमेलनें | २॥ |
| २२ | फुलें आणि कांटे | २। |
| २३ | मराठीचा नाट्यसंसार | ३ |
| २४ | हिरवा चांफा (आ. तिसरी) | ५ |
| २५ | दोन ध्रुव ( ” ) | ५ |
| २६ | उल्का ( ” ) | ४॥ |
| २७ | पहिलें प्रेम ( आ. दुसरी ) | ३ |
| २८ | क्रौंचवध ( ” ) | ५ |
| २९ | पांढरे ढग ( ” ) | ४। |
| ३० | जळलेला मोहर | ३ |
| ३१ | तुरुंगांतील पत्रें | २ |

## साने गुरुजी

| | | |
|---|---|---|
| १ | पुनर्जन्म ( आ. दुसरी ) | ३ |
| २ | आस्तिक ( ,, ) | ३ |
| ३ | संध्या | ५ |
| ४ | ना खंत ना खेद ( कृष्णा हाथीसिंग ) | ५ |
| ५ | सोन्या मारुति (आ. दुसरी) | २ |
| ६ | निळा पक्षी ( ,, ) | २॥ |
| ७ | गोड निबंध ( भाग पहिला) | ३ |
| ८ | गोड निबंध ( भाग दुसरा ) | ३ |
| ९ | गोड निबंध (भाग तिसरा) | ३ |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | | |
|---|---|---|
| १ | अवशेष | २ |
| २ | व्यक्तिरेखा | २। |
| ३ | माझी नभोवाणी | २ |
| ४ | नवे संसार ( जप्त ) | ४ |
| ५ | चंदनवाडी | ६॥ |
| ६ | नागकन्या | २ |
| ७ | दोन तपें | ५ |

## ना. धों. ताम्हनकर

| | | |
|---|---|---|
| १ | तात्या भा. १ ला (आ.दुसरी) | ४ |
| २ | तात्या भा. २ रा | ३ |
| ३ | निवाडे भा. १ ला | २॥ |
| ४ | निवाडे भा. २ रा | ४ |
| ५ | संतु | २ |
| ६ | चकमकी | १॥ |
| ७ | बच्चा नवरा | १॥ |
| ८ | अनेक आशीर्वाद | ३॥ |
| ९ | दाजी भा. १ ला (आ. ति.) | ३॥ |
| १० | बहीणभाऊ | ॥। |

## भाई वेके

| | | |
|---|---|---|
| १ | रॉयचरित्र— | १॥ |

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें


**वा. म. जोशी**

१ स्मृति–लहरी २
२ विचार–लहरी २।
३ विचार–विहार ४।

**चिं. वि. जोशी**

१ आणखी चिमणराव(आ.२री)४
२ वायफळाचा मळा ( ,, ) ५
३ नवें भारूड २
४ स्टेशनमास्तर २
५ नटश्रेष्ठ ॥।

**दत्तु बांदेकर**

१ सख्या हरि ( आ. दुसरी ) २
२ नवी आघाडी १॥
३ तूं आणि मी २।
४ नजरबंदी २॥

**प्र. के. अत्रे**

१ साखरपुडा ( आ. दुसरी ) २
२ ललित वाङ्मय ३॥
३ दूर्वा आणि फुलें २।

**ना. म. पटवर्धन**

१ हितपत्रें ३
२ वा. म. जोशीचरित्र ४।

**द. र. कवठेकर**

१ अपुरा डाव ३
२ रेशमाच्या गांठी ३
३ आभाळाची सांवली ८

**अनंत काणेकर**

१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ( आ. दुसरी ) ३
२ पिकलीं पानें (आ. दुसरी) १॥
३ उघड्या खिडक्या १॥

**काकासाहेब कालेलकर**

१ ब्रह्मदेशाचा प्रवास १॥
२ भक्ति-कुसुमें ३
३ सामाजिक प्रश्न ३

**य. दि. पेण्ढरकर**

१ प्रापंचिक पत्रें ३
२ घायाळ २

**ना. ह. आपटे**

१ फसगत १॥
२ साजणी ५

**पु. य. देशपांडे**

१ नवें जग ?– २॥

**वि. स. खांडेकर** (परिचय-लेखक)

१ काव्यज्योति ( आ. दुसरी) १

**आनंदीबाई जयवंत**

१ पारंब्या २

**रा. वि. फडतरे**

१ मृगया ४

**लक्ष्मणराव सरदेसाई**

१ ढांसळलेले बुरूज २

**प्रो. वि. ह. कुलकर्णी**

१ व्यक्तिचित्रें २॥

**शकुंतलाबाई परांजपे**

१ भिल्लीणीचीं बोरें ३

**कृष्णाबाई मोटे**

१ मीनाक्षीचें जीवन २।

**र. गो. सरदेसाई**

१ चलतीं नाणीं २

**संपादक आचार्य भागवत**

१ वर्धा शिक्षण योजना ४।

## देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

### रा. श्री. जोग
१ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८

### वि. वि. बोकील
१ बेबीची बहीण ३

### सत्याग्रही
१ ग्रह आणि तारे ४॥

### वि. म. भुस्कुटे
१ स्टॅलिन ३॥
२ आई ( मॅक्झिम गॉर्की ) ७

### कमलाबाई टिळक
१ आकाशगंगा २॥

### रामतनय
१ साखरगोटी ५

### ह. रा. महाजनी
१ आपलें आर्थिक नियोजन ५

### पं. क्षमा राव
१ देणगी २॥

### गोपीनाथ तळवलकर
१ मंगलधाम ३॥

### श्री. किनरे
१ प्रकृतिदर्शन ५

### प्रो. हॅरॉल्ड लास्की
१ राज्यशास्त्र-प्रवेश २

### बाबुराव गोखले
१ बारा फोफावला २

### प्रो. एम्. एल्. दांतवाला
१ आपली राहणी १॥।

### बापू गोखले
१ निवड ३

### अरविंद गोखले
१ उन्मेष २॥

### रमातनय
१ समाजजीवन ५

### बिवलकर
१ नाना पाटील-चरित्र १

### एस्. एन्. आग्रवाल
१ विद्यार्थ्यांसाठीं विधायक कार्यक्रम २

### कुसुमावती देशपांडे
१ मोळी २॥

### सौ. मालतीबाई दांडेकर
१ वज्रलेख ४॥

### पट्टाभि सीतारामय्या
१ गांधी आणि गांधीवाद ४

### वियोगीहरी
१ अंतरीचे बोल २॥

### नेताजी सुभाषचंद्र बोस
१ लाल किल्ला ३।

### आचार्य कृपलानी
१ गांधीदर्शन ४

### कॅ. लिमये
१ दर्यापार २॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६६१२
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ता. १०/१२/८८

॥ श्री ॥

* १७ री-इन्फोर्समेंट कँप
एम्. ई. एफ्.
१७-२-४५

सुले,

सर्व प्रवास सुखरूपपणें संपवून आज रोजीं येथें येऊन पोहोचलों. वाटेनें त्रास झाला नाहीं. येतांना सुएझ येथें थांबलों होतों. अन् शहरांत हिंडून आलों. तेथील सर्व घरें धाब्याचीं आहेत. बायका बुरखा घेतात. पण त्यांच्या नाकांत तोंडल्याच्या आकाराची एक बांबूची काडी असते. सौंदर्य वाढविण्याचा एक मार्ग कीं काय न कळे! बसमधून हिंडतांना भाषेची अत्यंत अडचण. मग नेत्रपल्लवी, करपल्लवी वगैरे मार्गांचा अवलंब करावा लागतो. पण ५-६ हिंदी अधिकारी बरोबर असल्यानें कंटाळवाणें वाटलें नाहीं. प्रत्येक गोष्ट नवीन त्यामुळें कंटाळवाणें वाटत नाहीं. प्रकृति उत्तम. टपालाची वेळ झाल्यानें पत्र पुरें करतों.

तुझा,
अनंत

---

* हा तळ कैरोच्या नजीक पिरॅमिडच्या पायथ्याशीं होता.

२

॥ श्री ॥

१७ री-इन्फोर्समेंट कँप
२३-२-४५

सुळे,

माझीं मागील दोन्हीं पत्रें तुला या वेळेपर्यंत मिळालीं असतील. अजून माझें निश्चित असें कांहींच नाहीं. त्यामुळें तुला काय कळवूं? तोंपर्यंत खुशालीचीं पत्रें लिहिण्यावरच मला, व वाचण्यावरच तुला समाधान मानून घेणें भाग आहे. तूर्त कैरो शहर पाहाण्यांत व रोज तेथें जाण्यांत वेळ घालवीत आहें. प्राचीन काळचे अवशेष जेथें ठेवण्यांत आले आहेत तें इजिप्शिअन म्यूझिअम पाहाण्यास परवां गेलों होतों. इमारत खूप मोठी असून कालक्रमानुसार सर्व वस्तु लावून ठेवल्या आहेत. जुन्या काळचे दागिने, होड्या, बैलगाड्या वगैरे सर्व पाहिल्या. ममीज् अथवा २००० वर्षांपूर्वींचीं गुंडाळून ठेवलेलीं प्रेतेंहि पण पाहिलीं.

त्यानंतर कॅबेरे नांवाचा एक नाच पहाण्यास गेलों. इजिप्तमधील तमाशाच तो. अर्धनग्न बायका अन् त्यांचे ते हावभाव! थिएटरमध्यें एक विशेष गोष्ट आढळली स्टेजजवळच्या २-४ रांगा सोडल्यानंतर मागें रिकामी जागा ठेवली आहे. तेथें हॉटेलप्रमाणें खुर्च्या व टेबलें ठेविलीं आहेत. चहा प्यावा, फराळाचें खावें व खातां खातां समोर सिनेमा पहावा. सिनेमागृहाच्या वरच्या मजल्यावर गच्ची आहे. तेथें कुंड्या, वेली लावून बगीचा बनविला आहे. सोइस्कर असे "आडोसे" आहेत. तेथें बसावें अन् खुशाल शाकुंतल करावें. मीही करणार होतों ग; पण काय करूं? माझी 'शकुंतला' पुण्यास अन् भाड्यानें ठरविलेली शकुंतला नको. तो काय टांगा थोडाच आहे? पहिल्या तासाला १ रु. अन् मागच्या तासांना ६ आणे

रस्ते खूप मोठे आहेत. वाहनें उजव्या बाजूनें चालतात.

दुकानांतून विक्रेत्या मुली असतात. ग्रीक, फ्रेंच, तुर्की, अथवा इजिप्शियन. प्रत्येकीच्या चेहऱ्यावर आपापल्या जातीचीं वैशिष्ट्यें उठून दिसतात. ग्रीक लोक मला विशेष आवडले. बोलण्यांतही चांगले. लाघवी खरे पण लघळ नाहींत. प्रेमळ खरे पण पांचट नाहींत. ट्रॅममध्यें बसले कीं हिंदुस्थानबद्दल हवे ते प्रश्न विचारतात. हिंदुस्थानबद्दल आपणांस भरपूर ज्ञान आहे, अशी कल्पना असणाऱ्या एकानें विचारलें, “ कांहो, हिंदुस्थान कराचींत आहे कीं मुंबईत ! ”

येथें हॉटेलें खूप आहेत. चॉकोलेट, टॉफी वगैरे भरपूर. आइस्क्रीम छान मिळतें. पण तूं जवळ नसल्यानें एकट्यानें खायला मन घेत नाहीं. येथें थंडी प्रचंड आहे. दिवसभर गार वारा वाहात असतो.

आपण एकमेकांबद्दल विचार करतोंच; पण हाही विरहकाल निघून जाईल. सर्व माणसांना नीट संभाळून राहिलें पाहिजे. आपल्याही चुका होतात, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. उगीच माझी काळजी करूं नकोस. तुझें मनोबल माझ्यामागें सतत उभें राहून माझें रक्षण करीत आहे. व्यसनांत सांपडणार नाहीं अशी खात्री वाटत आहे. आनंदांत रहा. तुझ्या आनंदांत माझा आनंद आहे. सर्वत्रांस न.

तुझाच,
*अनंत*

## ३

॥ श्री ॥

१७ री-इनफोर्समेंट कॅंप
१–३–४५

**सुले,**

तुझ्याकडून मला अजून पत्र नाहीं. ३ फेब्रुवारीला रात्रीं ९ वाजतां दादर स्टेशनवरून तुम्हां सर्वांचा निरोप घेऊन निघालों. अन् डोळ्यांत

पाणी अन् मनांत विचार आले. म्हटलं, आपल्याला बराच काळ एकट्यानें काढायचा आहे. आपण दोघांनीं अत्यंत आनंदानें दिवस घालविले अन् त्यानंतर इकडे यावें लागलें. थंडीमध्यें घरांत मनुष्य पांघरुणें घेऊन पडला असावा अन् त्यांतून उठून त्याला बाहेर पडावं लागावं, तसा प्रकार झाला. येथें सर्व व्यवस्था उत्तम आहे. विड्याच्या पानांची उणीव भासते. मुंबईहून घेतलेलीं पानें एडनपर्यंत पोहोंचलीं; पण त्यानंतर पानें सडल्यामुळें टाकून द्यावीं लागलीं. आणि गप्प बसलों.

मी आतां माझ्या नेमणुकीची वाट पहातों आहे. हुकूम मिळेल तेथें जावें लागेल. त्यामुळें कदाचित् पत्रें वेळेवर मिळणार नाहींत. पण काळजी करूं नकोस. हंसून खेळून रहा.

तुझाच,
*अनंत*

४

श्री

इटली

**सुले,**

शेवटीं हुकूम मिळाला अन् पुन्हां जलपर्यटनाला सुरुवात झाली. आज आम्ही इटलीच्या किनाऱ्याला लागलों. आतां मी येथेंच राहीन. मात्र तुला गांवाचें नांव कळवितां येणार नाहीं. तेव्हां सध्यां इटलींत कुठें तरी आहे, एवढेंच. सविस्तर पुढील पत्रीं.

तुझाच,
*अनंत*

५

॥ श्री ॥

इटली
१५ मार्च १९४५.

सुले,

अजून कामास सुरवात नाहीं. तेव्हां भटकणें अन् गप्पा मारणें एवढाच उद्योग आहे. लालू अचानक भेटला. तेव्हां गप्पा मारतां मारतां फ्लश नांवाचा खेळ खेळण्याचा बूट निघाला. हा खेळ म्हणजे शुद्ध जुगार आहे. ५ तास खेळलों अन् २०० लिरा—सुमारें १० रुपये—हरलों. म्हटलं, माफ करा. बहुधा पुन्हां आतां हा खेळ खेळणार नाहीं.

सुले, येथें फार मजा आहे. पण ती मजा एकट्यानें उपभोगतां येत नाहीं. हो, पण आपला '१० वाजतांच्या' प्रार्थनेचा कार्यक्रम जमणार नाहीं. कारण मुंबईहून निघाल्यापासून आतांपर्यंत आमचीं घड्याळें ५ तास मागें आहेत. आतां येथें सायंकाळचे ६ वाजले आहेत. पण तेथें ११ वाजून गेले असतील.

येथें थंडी खूप आहे. तीन रग घेऊनही थंडी भागत नाहीं. तंबू विस्तृत आहे. आंघोळीला गरम पाण्याचे फवारे आहेत. पण लालू हिंदुस्थानांत येतोय; त्याच्याकडून तुला सविस्तर माहिती मिळेलच.

भाषेची अडचण फारच पडते. काल लालू व मी एका दुकानांत केस कापण्यास गेलों होतों. दुकानदाराला इंग्रजी येईना अन् आम्हांला इटालियन समजेना. 'कानडीनें केला मराठी भ्रतार' असा प्रकार झाला. शेवटीं लालूनें दुभाष्याचें काम केलें अन् मग माझी हजामत झाली.

माझ्या मित्रांपैकीं कोण कोण येतात ? माझा सध्यांचा कार्यक्रम अगदीं आदर्श आहे. सकाळीं ६॥ला उठतों. तोंपर्यंत आर्डरलीनें चहा आणलेला

असतो. तोंड धुऊन चहापान, व दाढी. मग शालजोडी पांघरून ८ वाजेतों विश्रांति. ८ वाजतां ब्रेक-फास्ट. ८॥ ला परत. ८॥ ने १ पर्यंत मानसिक तपश्चर्या. १ वाजतां जेवण. नंतर वामकुक्षी ३॥ पर्यंत. पुढें ३॥ ला आंघोळ. ४ वाजतां चहा. ४॥ वाजतां हिंडणें, सिनेमा वगैरे विधायक कार्यक्रम. ८ वाजतां जेवण. ८॥ वाजतां तंबूंत परत येणें, कपडे काढणें. अन् मग लगेच दिवसभराच्या अशा कष्टांनीं श्रमलेल्या देहाला आराम नको का ? अग, हंसतेस काय ? 'सरकारी पाहुणा' आहें मी—४ समुद्र ओलांडून आल्यावर थोडासा तरी आराम नको का ? अशा या कार्यक्रमांत जातों वेळ.

असो. सर्वांस म्हणजे मोठ्यांस न. तुला प्रेम—बरोबरीच्यांस सहानुभूति अथवा आपलेपणा.

तुझा,
*अन्ता*

६

श्री

२३ मार्च ४५

सुले,

नेमणूक होऊन काम सुरळीत सुरू झालें. माझें काम दौऱ्याचें आहे. दिमतीला मोटार आहे. लष्करी कायद्याप्रमाणें मी असलेल्या गांवाचें नांव कळवतां येत नाहीं. मी एका मोठ्या शहरांत आहें. व हें शहरच

माझें मुख्य ऑफिस राहील. एका मोठ्या हॉटेलमध्यें माझी व्यवस्था आहे. स्वतंत्र खोली, त्यांत टेलिफोन वगैरे सर्व व्यवस्था आहे. एकदां बस्तान बसलें कीं छोट्या मोठ्या सफरी काढण्याचा विचार आहे. गेल्या आठवड्यांत नेपल्सला जाऊन आलों. शहर खूपच मोठें आहे. इमारती भव्य आहेत. अजबखाना फारच मोठा आहे. रस्त्यांत दर चौकांत पुतळे बसविले आहेत. कलाकृतींना येथें बराच भाव असावासें वाटतें. व्हीनस ही यांची लाडकी देवता ! व्हीनसचे छोटे मोठे पुतळे, माळा वगैरे रस्त्यावर विकत मिळतात. कापडावर नक्षी कामांचे सुंदर नमुने आहेत.

नेपल्सची बांधणी मोठी चांगली आहे. शहराचा एक भाग डोंगरावर वसलेला आहे. तेथून उतरत उतरत समुद्रसपाटीपर्यंत घरेंच घरें आहेत. त्यामुळें शेजारशेजारचे रस्ते उंच सखल दिसतात. मध्यें एक बारकी टेकडी आडवी आली आहे. तेथें भोगदा केला असून टेंकडीवर घरें बांधलीं आहेत. मला नेपल्स आवडलें. सडकांवरून सायकलींची इतकी गर्दी होते कीं बोलायची सोय नाहीं. अन् त्यांत जास्त पोरीच ! पण मी त्यांच्याकडे पाहात नाहीं, बरं का ! आमच्या कचेरीसमोर एक मोठें उद्यान आहे. त्यांत अनेक रसिक आपली रसिकता व्यक्त करीत असतात. फार नाहीं. आपले तोंडचे हिशोब ! अशा वेळीं मन चलबिचल होतें; पण तो आपला मार्ग नाहीं म्हणून अबाऊट टर्न करतों.

थंडी आतां बरीच कमी झाली आहे. इतके दिवस गरम सदरा, ह्यावर जर्सी व त्याच्यावर बॅटलड्रेस असा पोशाख असे.

मी विचारलेल्या बऱ्याच प्रश्नांचीं तूं उत्तरें दिलीं नाहींस. तुझ्या साय कलचें काय झालें ? अजून घेतली नाहींस ? बघ हं. नाहींतर पाहीन पाहीन अन् एकादी सायकल तारेनें पाठवून देईन !

तिथून सर्वांचीं पत्रं गोळा करून मला पाठव.

तुझाच,

*अन्ता*

७

श्री

A. F. H. Q.
C. M. F.

सुले,

माझें मागील पत्र तुला मिळालेंच असेल. अजून माझा प्रवास चालूच आहे. इटली पहाण्याची हौस पुरेपूर फिटत आहे. इतिहासप्रसिद्ध पॉंपे शहर लांबून दिसलें. व्हेसुव्हिसमधून निघालेल्या धुरानें आकाश काळेंभोर झालं होतं. आजूबाजूला सर्वत्र लाव्हा दिसत होता. कोळशाप्रमाणें काळा दिसतो. पण त्यानें सर्व पिकें जळून जातात. खेडीं उध्वस्त होतात. आगगाडींत दिवे नसतात. आपल्या जवळच्या मेणबत्त्या लावाव्या लागतात. सर्वत्र दारिद्र्य आहे. युद्धाचे दुष्परिणाम जागोजागीं दिसून येतात. पण इंग्रज अमलाखालीं आल्याचा लोकांना आनंद झालेला दिसतो. येथील व्यवस्था बरी आहे. कामाला सुरवात झाली. बाकी ठीक.

तुझा,
अनंत

८

॥ श्री ॥

H. Q. 3 Dist.
C. M. F.

सुले,

तुझीं दोन पत्रें मिळालीं. येथील परिस्थितीचा विनाकारण विचार करूं नकोस. तुझा अंता खात्रीनें तुला परत मिळेल अन् तोही व्यवस्थित. तूं

ह्या बाबतींत अगदीं निश्चिंत रहा. पाजीपणा करायला हवे तेवढे मार्ग आहेत. पण माझ्या बाबतींत ते मार्ग सर्वस्वीं त्याज्य आहेत. इतरांची उदाहरणें माझ्या डोळ्यासमोर आहेत आणि म्हणूच निर्मळ शरीरानें परत येईन अशी माझी खात्री आहे.

आतां येथें उन्हाळा सुरू झाला आहे. दिवसभर सुरेख ऊन पडतं. आपल्याकडे जशी होळी पौर्णिमा गाजते त्याचप्रमाणें येथें ईस्टरचा सण गाजतो. ईस्टर म्हणजे वसंत ऋतूचें आगमन. आतां झाडांना पालवी फुटेल. तीं फुलतील अन् सफळ होतील. थंडी निघून जाईल. सर्वत्र आनंदाचें वातावरण अन् साम्राज्य ! सर्वांचे चेहेरे फुललेले. शत्रूची भीति नाहीं. सर्व स्थिरस्थावर होऊं लागल्या आहेत. ठिकठिकाणीं उद्यानें फुलून गेलीं आहेत, माणसांनीं अन् लता-वृक्षांनीं !

गुड फ्रायडेच्या दिवशीं येथें मोठी जत्रा भरली होती. आपल्याकडे असतात त्याप्रमाणें पाळणे लावले होते. मिठाईचीं दुकानेंही होतीं. सर्व लोक उत्तम कपडे करून हिंडत होते. बरेचसे लोक सहलीला गेले होते. येथील लोकांत सहलींचें बरेंच प्रस्थ आहे. कल्पना चांगली आहे. अपल्याकडे जेवण, गप्पा अन् चहा यांत सणाचा दिवस जातो. हिंदुस्थानांत आल्यावर शक्य तेवढे सण व सुट्या आपण शहराबाहेर घालवीत जाऊं. दोन तास मी हिंडत व मजा बघत होतों. ट्रॅम, मोटारी, घोड्याच्या गाड्या, सर्व भरलेल्या ! सायकली व इतर वाहनांवर फुलें लावलेलीं ! लोकांनीं गळ्यांत माळा घातलेल्या ! हंसत खेळत, नाचत बागडत, लोक चालले होते. फार मजा वाटली. परंतु तूं येथें नसल्यानें मी या कार्यक्रमांत भाग घेऊं शकलों नाहीं; त्याबद्दल मात्र वाईट वाटलं.

जीवन आनंदी खरें या लोकांचं. वास्तविक युद्धामुळें इटलीची किती तरी हानी झाली आहे. घरें पडलीं आहेत; लोकांची विपन्नावस्था आहे. पण तीं सगळीं दुःखें विसरून आहे त्यांत आनंद मानून दिवाळी साजरी करण्याची तयारी खरीच ! अर्थात दारूच्या पुष्कळच बाटल्या फुटल्या.

युरोपांतील लोकांचा जीवनाकडे बघण्याचा कोन खूपच आशावादी वाटतो. कोंडयाचा मांडा करून खाण्याची त्यांची प्रवृत्ति असते.

चैन, आनंद, उत्साह, गंमत, सगळं जीवन कसं उत्साहानं रसरसलेलं असतं ! लोक गरीब पण मन केवढं मोठं ! असो. अनेक धडे शिकण्याजोगे आहेत. निदान मला तरी शिकण्याजोगं खूप मिळालं आहे यांच्यांत. दोस्तांच्या विजयाच्या वार्ता दिवसेंदिवस येतच आहेत. अन् सुटकेचा निश्वास टाकायला लोक अधीर झाले आहेत. मीही रोज बंदरावर जातों, पण मावळत्या सूर्याचीं सोनेरी किरणें, अफाट दर्या, निळं आकाश हें सगळं चर्मचक्षूंना दिसतं. पण अन्तःचक्षूंना त्या सागरावरचं जहाज दिसतं. मनानें ह्या जहाजांत बसून मी घरीं येतों अन् तुला भेटतों. इतरांकडे पहाण्याकरितां डोळे उघडतों तों मी किनाऱ्यावरच उभा आहें, हें सत्य उभं राहातं. पण हा क्षणिक आनंद आभासमय का असेना, माझ्या हृदयाला पुलकित करतो. भविष्यकाळाची ही स्वप्नं माझ्या एकाकीपणाला दूर नेतात. पुन्हां जोमानं मी कामाला लागतों. सुले, विचारांना आपण जहाजाची उपमा देतों. हृदयाला सागर म्हणतों. अन् या सागरावर विचाराचं जहाज थैमान घालतें असें आपण म्हणतों. पण ही कल्पना किती यथार्थ आहे याचा प्रत्यक्ष अनुभव आला आहे. जहाजांत किती तरी माल असतो अन् त्याहून किती तरी माणसं; पण खरं महत्त्व कप्तानालाच ! त्या कप्तानाला मला भेटायचं आहे हं. योग्य वेळीं भेट होईल. तोंपर्यंत थांबलं पाहिजे. होना !

सर्वत्रांस न.

तुझाच,

*अन्ता*

१

॥ श्री ॥

H. Q. 3 Dist.
C. M. F.
२ एप्रील १९४५

सुले,

तुला माझा येथील कार्यक्रम कळला ना! रोज सकाळी ६॥ वा. उठतों. गरम पाण्याची व्यवस्था असल्यानें आंघोळ सकाळींच उरकतों. आठवड्यांतून ३ वेळां तरी आंघोळ करतोंच बरं का. ७॥ ला ब्रेक-फास्ट अंडीं, बेकन, चहा वगैरे. ८॥ ला परस्पर ऑफिस. १ वाजतां आम्हीं बरेचसे अधिकारी एकत्र जेवावयास येतों. तेथून परत २॥ ते ६ ऑफिस. ६ वाजतां हिंडायला जातों. समुद्रकिनारा खूपच लांब आहे. त्यावर उत्तम हिंडणें होतें. मग मेसमध्यें परत येतों. जेवून मुक्कामास परत येतों. रात्रीं घरीं आलों कीं कपडे काढून जरा पडतों. मग उदबत्ती लावतों. प्रार्थना करतों अन् झोप येईतों वाचन करतों. वाचल्याशिवाय झोप न येण्याची संवय अजून चालूच आहे. अन् ती खूप उपयोगी पडत आहे.

वसंत घैसासचें लग्न झालें हें छान, पण या लग्नांत मुकुंदाच नवरदेवाच्या ऐटीनें मिरवीत होता असें मी ऐकलें.

आईला मी दरमहा पत्र पाठविण्याचें ठरविलें असून त्याप्रमाणें रवानाही झालें आहे. तेथील आठवणी तर फार येतात. भेटीचा योग लौकर नाहीं. परंतु जेवढे दिवस आपल्याला काढायचे तेवढे आनंदांत काढावे, हा मार्ग चांगला नाहीं का? आपली आपण करमणूक करावी अन् आपल्या विचारांची मांडणी सद्भावनेवर असावी, हें खरं ना?

मीही येथें सिनेमा पाहाण्यास जातों. काल सॅन कार्लो नांवाच्या थिएटरांत एक इटालियन नाटक पाहावयास गेलों होतों. थिएटर प्रचंड आहे. एकूण ५ मजले आहेत. आंत सर्वत्र नक्षीकाम आहे. छतावर उत्तम उत्तम चित्रें कोरलीं आहेत. बसण्याच्या जागा फारच सोईस्कर आहेत. एका वेळीं ३०००० प्रेक्षक बसूं शकतील. या नाटकाचा विशेष म्हणजे सर्व नाटक पद्यमय होतें. नायक रागावला तरी गाणें. " काय ग ", " पुरे बाई ", " इश्श " हेंसुद्धां सगळें संगीतांत. ५० लोक संगीताच्या ताफ्यांत असावेत. मला मधून मधून हसूं येई. ' मॅडम बटर-फ्लाय ' हें ऑपेराचें नांव. हें नाटक युरोपांत फारच प्रसिद्ध आहे. १९०७ पासून याचे जगभर प्रयोग झाले आहेत. मुख्य भूमिका एका नटीची आहे. शेवटच्या अंकांत ती आत्महत्या करते; त्या वेळचा तिचा अभिनय अप्रतिम आहे. प्रेक्षकांच्या डोळ्यांना पाणी येतें. पण अंक संपल्याबरोबर टाळ्या पडल्या. झालें ! लगेच ती नटी हंसतमुखानें आली अन् तिनें प्रेक्षकांना अभिवादन केलें. झालं, बोंबलला ड्रॅमॅटिक इफेक्ट !

मी पहिल्या रांगेचें तिकीट काढलें होतें. ६॥ रुपये पडले. कपडे वगैरे उत्तम होते— माझे नव्हे— नटांचे ! नेपथ्यरचनाहि छान होती. एक सूर्यास्ताचा देखावा होता— क्षितिज— त्या खालीं तांबडा रंग, तो हळू हळू नामशेष होतो. मग सगळें आकाश निळें. मग चंद्र व चांदण्या ! सप्तर्षि व मृगशीर्ष हेहि तारे त्यांत होते. विजेचे दिवे व रंग यांची करामत. याला म्हणावें कला ! नाहींतर आपल्याकडे किटसनचे दिवे लखलखत असतातच. अन् नायक म्हणतो— " प्रिये, बोलतां बोलतां खूपच रात्र झाली. चल, आपण दिवे लावूं. "

एक सकाळचा देखावा होता. भिंतीवर कवडश्यानें ऊन पडल्याचें दाखविलें होतें. मला खेळ फारच आवडला. जाऊं दे. कागद संपल्यानें येथेंच पडदा पाडतो. प्रकृति उत्तम.

तुझाच,

*अन्ता*

# १०

॥ श्री ॥

H. Q. 3 Dist.
C. M. F.
१५-४-४५

सुले,

माझा कार्यक्रम व्यवस्थित चालला आहे. तुला व्यवस्थित पैसे मिळतात ना ? कांहीं तक्रार असल्यास तसें कळव.

मला दौऱ्यासाठीं वारंवार जावें लागतें. पुन्हां १५ दिवसांकरितां दौऱ्यावर जाणार आहें. परंतु खास मोटार, हिंदी ड्रायव्हर व हिंदी ऑरडरली असल्यामुळें त्रास होणार नाहीं. आज एका हिंदी फलटणींत जेवलों. मटाराची उसळ, आमटी, पोळ्या, दूध व भात. खूपच आडवा तिडवा हात मारला. त्यामुळें आहारलों आहें. मुंबई सोडल्यापासून आजच प्रथम इतकें उत्तम व भरपूर जेवण मिळालें. अन् अगदीं जमिनीवर बसून भुरके मारून जेवलों.

येथें हवा अगदीं उत्तम आहे. दुकानांतून हिंडता-फिरतांना व खेरदी करतांना तुझी फारच आठवण येते. १-२ दुकानांतील मुलींची थोडी ओळख झाली आहे. पण भाषेची बोंब. नेत्रपल्लवी करावी तर भलतंच व्हायचं. तेव्हां अंदाजानें दडपतों. मराठी, उर्दू, इंग्रजीची खिचडी करून थोडा वेडावांकडा उच्चार केला कीं झालें. इटालियन भाषेंतील १० शब्द आतांपर्यंत आत्मसात केले आहेत. इंडियन म्हणून अनेक लोक बोलण्याचा प्रयत्न करतात. पण बोलूं काय कपाळ ? इंग्रजी पुस्तकें मात्र भरपूर वाचतों. अन् सुटीचे दिवशीं आसपासचीं स्थळें पहावयास जातों.

येथील वनश्री मोठी रमणीय आहे. घरें उध्वस्त झालेलीं, शेतें उजाड पडलेलीं, पण लोक आपलीं कामें करीतच असतात. मनांत विचार येतो, इतक्या इमारती, घरें, शहरें बांधायला किती मेहनत व काळ लागला असेल, अन् किती थोड्या वेळांत त्यांचा नाश झाला! पण पुन्हां आपल्या दुरुस्त्या चालूच आहेत. मजा आहे, झालं.

सर्वांच्या शाळांना सुट्या झाल्या असतील. हापूसचे आंबेही खूप खात असाल. माझ्या नांवचे राखीव खातीं जमा करून ठेवा. सर्वत्रांस नमस्कार.

तुझाच,
*अन्ता.*

## ११

॥ श्री ॥

A. F. H. Q.
C. M. F.
ता. २७।८।४५

सुले,

हिंदुस्थानांत अन्नावर रॅशनिंग असलें तरी पत्रांवर खास नाहीं. अन् त्यांत आम्ही योद्धे ना? तेव्हां आमच्या सुखसोईचा विचार सरकार प्रथम करतें. त्याप्रमाणें तुम्हींही जरा जास्त पत्रें पाठवत जा.

तुझ्या रेसची हकीगत वाचून गम्मत वाटली. येथेंही दर आठवड्यास रेसेस होतात. त्यासाठीं कॅसर्टाहून खास माटारीही जातात. माझे पुष्कळ

स्नेही मला भयंकर आग्रह करतात. म्हणतात, लिम् ( अग, हो माझ्या नांवाचा या लोकांनीं अगदीं पचका केला आहे. उदा० लिमया, लिमाया अखेर लिम हें नांव त्यांना सोईस्कर सांपडलें. कांहीं थोडे अनंत म्हणतात. ) " अरे चल, तूं पैसे लावूं नको. " म्हटलं, "नको. साष्टांग नमस्कार. आपल्याला ती रेस नको अन् कांहीं नको." म्हणतात ना ' कर्म करितां न भी कोणा, मग दिसे केविलवाणा ! ' रेसला जायचें, थोडेसेच पैसे लावायचे, पाहिजे कशाला ? माझं मन आहे विचित्र. अप्रिय वस्तूंपासून जोंपर्यंत मी पूर्णपणें अलिप्त आहे, तोंपर्यंत ठीक आहे. पण एकदां त्या वस्तूला मी स्पर्श केला कीं संपलें. मिठाच्या एका खड्यानें सर्व दूध नासतें ! हवी कशाला ती भानगड ? असो. रेसचें जग विश्व आहे. रेस खेळणाऱ्या लोकांच्या चेहेऱ्याकडे पाहिलेंस का तूं ? दुसऱ्याचा घोडा पहिला आला म्हणजे त्याच्या मुद्रेवरील विकार कसलेल्या खलनायकाला खालीं पहायला लावतील.

ती. मा. आईची प्रकृति बरी नाहीं हें वाचून जरा काळजी वाटते खरीच. माझी ती जन्मदात्री आहे. तिनें माझ्यासाठीं अनंत खस्ता खाल्या आहेत. मीं परत येऊन तिला भेटावें अशी इच्छा आहे. व तशी मी रोज प्रार्थनाही करीत असतों. परंतु अजून एक वर्ष तरी येथें रहावें लागेल.

घोड्यावर बसण्यास शिकविण्याचा एक वर्ग येथें सुरू झाला आहे. व त्यांत मी नांव घातलें आहे. येथील साप्ताहिक रिपोर्ट: प्रकृति उत्तम. मन खंबीर. डोकें ताळ्यावर. जेवण पोटभर. काम भरपूर. स्त्रीसुख मुळींच नाहीं. अग, हंसतेस काय ?

तुझाच,

*अनंत.*

# १२

श्री

१७ जुलै ४५.

सुले,

आजच दौरा पुरा करून आलों. ह्या दौऱ्यांत ब्रिंडिसीपर्यंतचा भाग पाहून झाला. टॉरंटो येथें जमादार सुर्वे नांवाचे गृहस्थ भेटले. त्यांना तुझा पत्ता देऊन तुला भेटण्यास सांगितलें आहे. कारण ते लौकरच हिंदुस्थानांत येणार आहेत.

येथें ठिकठिकाणीं थिएटरांतून विविध कार्यक्रम होतात. नाच, गाणीं, कसरतीचे खेळ, जादूचें प्रयोग, वगैरे तीन तासांचा प्रयोग असतो. शिपायांच्या करमणुकीसाठींच फक्त हे कार्यक्रम असल्यानें नटांच्या भूमिकांना अन् प्रेक्षकांच्या डोळ्यांना बरेंच स्वातंत्र्य मिळतें. हे कार्यक्रम अश्लील नसले तरी उत्तान खासच असतात.

बारी व टॉरंटो येथें अनुक्रमें झूला व जादूका झोला हे दोन हिंदी चित्रपट पाहाण्यास मिळाले.

ब्रिंडिसी जवळ लेवे नांवाचें एक गांव आहे. तेथें जुने पुतळे वगैरे पाहाण्यालायक आहेत. येथील ‘ जिवंत पुतळ्यांसाठीं ’ हें गांव प्रख्यात आहे असें आम्हांस परत आल्यावर समजलें.

आपण द्राक्षाचे वेल पाहातों पण येथें द्राक्षांच्या जाळ्या करवदाप्रमाणें पाहाण्यास सांपडल्या. द्राक्षें काळीं होतीं. शेतांत दोहों बाजूस दगडांचे बांध चांगले घातलेले आहेत. सर्वत्र डांबरी रस्ते आहेत. सर्व मुलूख सपाट असल्यानें रस्ते सरळ आहेत. एके ठिकाणीं तर ७ मैलांपर्यंत रस्ता सरळ होता. समुद्रकिनाऱ्या लगतची जमीनही लोकांनीं लागवडीस आणली आहे. खारें पाणी शेतांत येऊं नये म्हणून किनाऱ्यावर दगडांच्या

भिंती बांधल्या आहेत. आपल्याकडे शेतांत झाडें फारशीं दिसत नाहींत; पण येथें शेतांतून खूपच झाडें लावलेलीं आढळतात. नांगर वगैरे आपल्या सारखेच आहेत पण आपल्याकडे नांगरास २,४,६ अशा बैलांच्या जोड्या जोडतात. इटालियन नांगरास तीन जनावरें असतात; एक मध्यें व दोहों बाजूस दोन. कधीं कधीं पुस्तकाच्या शेवटी जोडलेल्या परिशिष्टा-प्रमाणें मध्यभागीं असलेल्या जनावराशेजारीच आणखी एक जनावर असतें जोखड एका जनावरासाठीं व दुसरें जनावर साइड इश्यू–गाण्यास प्रत्यक्ष मदत नसलेल्या पय लय बांधण्यासाठीं आवश्यक असलेल्या तंत्रोऱ्याप्रमाणें.

मी जनावरें शब्द एवढ्यासाठींच वापरला–नांगरास अथवा गाड्यांस घोडे जोडण्याची येथें पद्धति आहे; कारण बैल खाण्यासाठीं उपयोगांत येतात. कारण जर्मनांनीं जातांना बहुतेक जनावरें नेल्यानें असलेल्या जनावरांवरूनच भागवावें लागतें. जातिभेदाचा अभाव व स्त्री-पुरुषांस समान हक्क हीं दोन तत्त्वें इटालियन लोकांनी जनावरांच्या बाबतींत आत्मसात् केलेलीं दिसतात. म्हणून एका बाजूस गाढव, मध्यें घोडा व दुसऱ्या बाजूस गाय, असें दृश्य नांगरास जोडलेलें दिसतें. जनावरांपासून हा धडा घेण्याजोगा आहे. “ जातपात तोडक संघाची ” येथें अवश्य शाखा असावी.

रहदारी उजवीकडून होते. अर्थातच ‘ वाममार्ग ’ वर्ज आहे. शेतांत काम करणाऱ्या बायका डोक्यास फडकें गुंडाळतात. झगे घालण्याची पद्धति असल्यानें गरोदर बायका पाहिल्यानंतर मारवाड्याची आठवण होते. घराच्या बाहेर बसून मुलांस स्तनपान देण्यांत येथील बायकांना विनयभंग होण्याची भीति वाटत नाहीं.

समुद्र स्नानाची लोकांस फारच हौस आहे. रविवारीं घरांतील सर्व लहानथोर मंडळी समुद्रावर अंघोळ करण्यास जातात. छोटे छोटे तंबू

अथवा पालें बांधून त्यांत दिवस घालवितात. अंघोळ करून उन्हांत रेतीवर पडून अंग तांबूस करण्याची पद्धति आहे. ३–४ तास लोक उन्हांत असतात. मीही अंघोळीस गेलों होतों.

या दौऱ्यांत कॅस्टेलिना या गांवीं असलेल्या गुहा आम्हीं पाहिल्या. या गुहांस ग्राटो म्हणतात. पृथ्वीवर जें पाणी वाहातें त्यांत खनिज द्रव्यें पुष्कळ असतात. कांहीं काळानें पाण्याची वाफ होऊन खनिज द्रव्यें शिल्लक राहातात. त्यांचें निरनिराळ्या रंगाचे दगड बनतात. या गुहा जमिनीच्या खालीं आहेत. आंत जाण्यासाठीं पायऱ्या आहेत. एकूण पायऱ्या १९० असून प्रत्येक पायरी २८ इंच आहे. म्हणजे जमिनीच्या खालीं सुमारें ४०० फूट जावें लागतें. आंत विजेचे दिवे खेळविलेले आहेत. या प्रकाशामुळें आंतील दृश्य फारच मनोरम दिसतें. भूगर्भ-शास्त्रवेत्ते येथें संशोधन करीत आहेत. अशा प्रकारचा १ इंच दगड तयार होण्यास २०० वर्षें लागतात असें त्यांचें मत आहे अन् कांहीं ठिकाणीं दगड ६ फूट उंच आहेत. हें कार्य किती पुरातन असेल याची यावरून कल्पना येते. कांहीं दगड नळांप्रमाणें आंतून पोकळ आहेत. व त्यांतून पाणी झिरपत असतें. व पाण्याची वाफ होऊन दगड वाढत जातो. लोखंडाचा अंश दगडाच्या मध्यभागीं असतो. व तो कठीण अन् काळसर दिसतो. निसर्ग हाही एक कलाकार आहे. त्यामुळें या दगडांच्या आकृति नानाविध आहेत. कोठें त्यांच्या आकृति सिंहाप्रमाणें, तर कुठें वाघ, हत्तीची झोंड, हंड्या झुंबरें, मधाचे पोळें वगैरेसारख्या आढळतात. विजेचा प्रकाश बघायला मजा वाटते. प्रवेशद्वारापासून ४०० यार्डी-पर्यंत उत्खनन आजपावेतों झालें आहे. या दगडांचें नमुने मी गोळा केलें आहेत. इटलींतील हें एक प्रेक्षणीय स्थान आहे, यांत शंका नाहीं. पुढील पत्रांत आणखी कांहीं गमती.

तुझाच
**अनंत**

# १३

॥ श्री ॥

H. Q. 3 District
१८ एप्रिल १९४६

सुले,

आजच्यां नोटपेपरचा रंग बघून तुला आश्चर्य वाटेल. पण तुझा आवडता नोटपेपरच काय पण ह्यावेळीं माझ्या खिशांत ५ रुपयेसुद्धां नाहींत हें ऐकून तुला काय वाटेल ?

घाबरूं नकोस. पण तो एक इतिहासच आहे. मी स्वभावतः निराश अगर घाबरट प्रवृत्तीचा मनुष्य नाहीं हें तुला माहीत आहेच. तरीसुद्धां मी आज अस्वस्थ झालों. काल मोटारीनें मी टोरँटोला जाण्यास निघालों. मजजवळ सध्यां एक डॉज गाडी आहे हें मी तुला कळवलंच होतं. मागच्यां बाजूस सर्व सामान व्यवस्थित लावून, बाहेरचे पडदे वगैरे बंद करून मी ड्रायव्हरच्या शेजारी बसलों. एक तर ड्रायव्हर नवा होता— त्याला रस्ता माहीत नव्हता. अन् दुसरं कारण म्हणजे मागच्या बाजूला ह्यादेरही जास्त बसतात.

आम्हीं नेपल्सहून निघालों अन् बारीला जाण्याचा रस्ता शोधूं लागलों. नेपल्स हें मोठें विचित्र शहर आहे. मजजवळ नकाशे वगैरे सर्व होतें. पण त्या नकाशांत कोणत्या चौकांत बाहेर पडलं असतां बारीचा रस्ता मिळेल हें थोडेंच लिहीलें आहे ! अन् इटालियन भाषेचं माझं ज्ञानही अगाध. म्हणून रस्तां कांहीं केल्या मिळेना. अखेर रस्ता सांपडून आम्हीं बाहेर पडलों ! सुमारे ६० किलो आम्ही गेलों असूं. ( ८ किलोचे

५ मैल होतात. ) सूर्य अस्ताला जाऊं लागला होता; मंद मंद वारा वाहात होता. सृष्टिदेवीनं आपली सर्व आभरणं धारण केली होती. मोटारच्या आवाजाचं पार्श्वसंगीत चाललंच होतं; रस्त्यांत एक अधिकारी भेटला. त्यालाही बारीला जायचं होतं. म्हटलं बरें झालं. सोबत मिळाली. अन् सामान सांभाळायला आयता पहारेकरीही मिळाला ! मोटार थांबवली अन् मागचें पडदे उघडले.

सुले, आतलं सगळं सामान अन् माझ्या आशा, नाहींशा झालेल्या ! डोळे चोळले, अंगाला चिमटा घेतला. स्वप्नांत नसून जागृतावस्थेची खात्री पटली. मोठा थोरला होल्डऑल, ट्रंक अन् इतर सर्व वस्तू गहाळ ! ! अंगावरच्या कपड्यांचाच फक्त मी धनी राहिलों. अगदीं गारठा झाला माझा !

त्या बिचाऱ्या अधिकाऱ्याचं तोंड तर अगदीं चिमणीएवढं झालं. अन् मग माझ्या डोळ्यासमोर नेपल्समधील त्या पाट्या दिसूं लागल्या—

( १ ) " नेपल्सला आजच आलांत ना ? मग आपलं सामान सांभाळा! "

( २ ) " जें तुमच्या दृष्टिआड असेल त्या सामानाची आशा सोडा! "

( ३ ) " चोरीसाठीं हा चौक प्रख्यात आहे."

अगदीं हताश झालों मी. इतके दिवस अतिशयोक्तीचे नमुने म्हणून या पाट्यांकडे पहात होतो मी. परक्या देशांत, जवळ पैसा नाहीं, शेवटीं नेपल्सला परतलों. गाडींत पेट्रोल भरपूर होतं सुदैवानें !

गाडी वळवली अन् नेपल्समध्यें शिरलों. अधिकाऱ्यांची रहावयाची व्यवस्था कांहीं विशिष्ट हॉटेलांतून केलेली असते ! पण तिथं ३० लिरा द्यावे लागतात. माझ्या खिशांत फक्त १० च होते. सूटकेसमध्यें असलेले ६००० लिरा एकाद्या इटालियनच्या खिशांत केव्हांच जाऊन पडले असतील. हॅाटेलमधील सार्जंट सज्जन खरा; पण कायद्याच्या बाहेर थोडंच जाता येतं ? चेकबुकही चोरीला गेलेलं ! उद्या ११ वाजेपर्यंत पैसा

मिळणं कठीण. सकाळीं दाढी करायला आयुधं नाहींत अन् न्हाव्याला द्यायला पैसे नाहींत.

दुसऱ्याला शहाणपण शिकवणं सोपं असतं. पण स्वतःवर प्रसंग आला कीं समजतं. त्याची आज आठवण झाली.

आम्हीं कैरोला उतरलों त्या वेळची हकीगत. आम्हीं सकाळीं ४॥ वाजतां उतरलों. आमचा एक सैनिक जरा पलिकडे सामान ठेवून कानांत जानवं टाकून बसला होता. जरा वेळानं पहातों तो एक इजिप्शीयन ह्याचं सामान घेऊन पळतो आहे ! अन् हा बिचारा अशा चमत्कारिक स्थितींत सांपडला होता की ह्याला ऊठताही येईना अन् ओरडताही येईना. पण त्यावेळीं मी त्याच्यावर कोण रागावलों. अन् त्याला कसा उपदेश केला !

मनुष्याचा स्वभाव तुला माहीत आहे. ४ लोक एकत्र जमले अन् कोणी आपले अनुभव सांगू लागला कीं तशा तऱ्हेचे इतरांचे अनुभवही मुखावाटे बाहेर पडतात. आजच्या रात्रीचा सोबती हॉटेलमधला सार्जंट होता. त्यानें गोष्ट सांगितली.

एक अधिकारी रोमला चालला होता बदलून. सगळं सामान जीप्मध्यें होतं. रोममधील एका रस्त्यावर गाडी उभी करून, तो अधिकारी रिपोर्ट करायला गेला. ड्रायव्हरनें ५–१० मिनिटें वाट पाहिली अन् तो समोरच्या चहाच्या दुकानांत शिरला. ५ मिनिटांनीं बाहेर येऊन पाहातों तों सर्व सामान बेपत्ता ! फक्त गाडी उभी. लगेच दोघेही मिलिटरी पोलिसांकडे वर्दी देण्यास गेले. परत येऊन पाहातात तो गाडी बेपत्ता ! कल्पना कर त्यांना काय वाटलं असेल...

सार्जंट या गोष्टी सांगत होता तरी पण खरं म्हणशील तर हंसण्याच्या मनःस्थितींत मी नव्हतों. समाधान येवढंच कीं असा अनुभव घेणारा मी कांहीं एकटाच नाहीं. पैशाची व्यवस्था काय करावी हाच विचार माझ्यापुढें उभा होता. अखेर १० मिनिटांनीं एक अधिकारी आला. त्याचं जाड पाकीट बघून त्याला हकीगत सांगितली. अन् १०० लिरा उसने

घेतले. मेस केव्हांच बंद झाल्यानें जेवणाचा प्रश्न नव्हता. उपाशी पोटी अन् भरल्या डोक्यानं अंथरुणाला पाठ लावली.

पुढें काय होतं तें तुला कळवीन. आजची गोष्ट अनुभव खातीं जमा करीत आहे. काळजी करूं नकोस.

तुझाच,
अनंता

## १४

॥ श्री ॥

C. M. F.
२४ एप्रिल १९४५

सुले,

तुझं ९ तारखेचं नवरत्नासारखं पत्र आज मिळालं. ९ वेळा वाचलं. दौऱ्यावरून परत आलों होतों अन् तुझ्या पत्रांची वाट पहात होतों. दोन पाकिटं मिळालीं. दोन्ही पाकिटावरचा पत्ता एकाच हस्ताक्षरांत होता. पण शंका आली. म्हटलं दोन्ही पाकिटं वरून सारखीं दिसत असलीं तरी आंतील मजकूर वेगळा आहे. मग एका गोष्टीची आठवण झाली. अकबर बादशहाकडे एक जवाहिऱ्या आला. त्यानें दोन आंगठ्या दाखविल्या. एकीची किंमत होती ५ रु. अन् दुसरीची होती ५०००० रु.! दोन्ही आंगठ्या अगदीं सारख्या होत्या. हिरे चमकत होते. बादशहाला मोठा पेंच पडला. बिरबलला बोलावलें. त्यानें आंगठ्या ओळखल्या अगदीं

बरोबर. एका अंगठीभोंवतीं एक माशी घोंघावत होती. ती खडीसाखरेची अन् दुसरी होती ती हिऱ्याची ! तसं अंतर्ज्ञानानें मी तुझं पत्र ओळखलं. अग वर वर साम्य असलं तरी पत्राच्या अंतरंगांत, मजकुरांत केवढा फरक ! मला फसवायचा प्रयत्न केलास. पण फसलों नाहीं मी.

दौरा छान झाला. खूपच प्रदेश पाहिला. हा देश खरंच उत्तम आहे. सगळीकडे हिरवंगार होतं ! मधून मधून कसल्याशा तांबड्या फुलांनीं शेतं बहरलीं होतीं. डोंगरांच्या शिखरांवर सुद्धां खेडीं. डांबरी रस्ते. युरोप-खंड जरी पाहाता आलं नाहीं तरी त्याचा थोडासा भाग पाहाता आला. या शितावरून भाताची परीक्षा करायची म्हटलं तर हा भात केशरी भात आहे, फोडणीचा नाहीं, हें सहज कळून येतं.

मला रोज चालावें लागतें म्हणून तुला काळजी वाटूं लागली. अग मी आघाडीवर आहे. अशा किरकोळ सवयी आतां बाजूला ठेवल्या पाहिजेत. पायांना कांहींही त्रास होत नाहीं. उलट चांगला व्यायाम होऊन प्रकृति उत्तम रहाते.

विडा अथवा पान अजिबात मिळत नाहीं. पहिले १५ दिवस खूपच त्रास झाला. आतां मधून मधून आठवण येते इतकेंच.

तेथील बरींच लग्नें बुडलीं. जाऊ दे. मीही सध्यां ब्रम्हचारी नाहीं का ? एकदां एखादा मार्ग आपल्यासाठीं नाहीं असें मी ठरविलें कीं तिकडे मी वळूनही पहात नाहीं, हें तुला माहीत आहे. त्याप्रमाणें—दारू अन् वेश्या स्त्रिया—या आपल्यासाठीं नाहींत हें मी प्रथमच ठरवलें. अजून पर्यंत निभावून गेलों. पुढेंही जाईन. आतां मला कसलीच भीति वाटत नाहीं. प्रथम प्रथम मनावर ताबा राहील कीं नाहीं, याबद्दल शंका वाटे. पण आतां खात्री झाली. तिकडे यायची कळ अजून सोसायला हवी. परिस्थिति निवळत चालली आहे हें खरं पण अजून बराच वेळ लागेल. अर्थात हे सर्व अंदाज आहेत. मुंबईला येईतों केव्हां येणार हें कांहींच सांगता येत नाहीं. त्या दिवसाची प्रतीक्षा करणें येवढेंच आपल्या हातीं

आहे. कामावर वरिष्ठ खूष आहेत. तुझ्या शिवाय सर्व सुखसोई येथें आहेत.

खरोखर घटना आपल्या बऱ्यासाठींच होत असतात ! यांतून कांहीं तरी चांगलें निष्पन्न होणार यांत शंका नाहीं. माझा आशावाद जबरदस्त आहे. तो डळमळणार नाहीं.. त्या आशावादाची उभारणी तुझ्या प्रेमावर अन् पत्रांवर आहे. पत्र वारंवार पाठवीत जा. आनंदांत रहा. सर्वत्रांस न.

तुझाच,
**अनंत**

## १५

॥ श्री ॥

C. M. F.
२९ एप्रिल १९४५

सुले,

आजच्या मुहूर्तावर तूं मला पत्र लिहिणार ही खात्री असल्यानें मीही आज पत्र लिहीत आहें. आज माझा वाढदिवस. नेहमीं या दिवसाला मी फारसें महत्त्व देत नाहीं. कारण मी माझ्या मंडळींत असतों. कधीं कधीं मला तूं या दिवसाची आठवण करून देतेस. पण आज मी स्वतःलाच आठवण करून दिली. सकाळीं आंघोळ करून ऑफिसला गेलों. माझा वाढदिवस ज्या दिवशीं असे त्या वेळीं आई कांहीं तरी गोड पदार्थ करीत असे. माझ्या आयुष्यांत तूं पदार्पण केल्यापासून ती जबाबदारी तूं उचललीस. अन् आपोआपच १५ डिसेंबर अन् १९ डिसेंबर या दिवसांचें

महत्त्व मला वाटूं लागलें. आज तूं जवळ नाहींस याबद्दल मात्र वाईट वाटलं. असो.

मला एक पंचांग हवें आहे. तें शक्य तितक्या लौकर पाठव. चालू वर्षाचें मात्र हवें. मराठी मासिकें पण पाठव. येथें इंग्रजी पुस्तकांशिवाय वाचायला कांहींच मिळत नाहीं.

आणखी तुमच्याकडची खबरबात ? उसाचा रस अन् हापूसचे आंबे यांना पोट जोराचा आश्रय देत असेल ! खातांना माझी आठवण येते का ? म्हणे पुण्याला जेवण जात नाहीं. कशाला जाईल ? सकाळ-संध्या-काळ आंबे अन् राहिलेल्या वेळांत उसाचा रस.

लिंबाचें लोणचें घालून ठेव. खावें, प्यावें, मजा करावी. मी येईतों वजन वाढलें पाहिजे बरं का !

मीहि शक्य तितकी मजा करतों. गेल्या आठवड्यांत आणखी एक कॅबेरे पाहिला. येथें सिनेमा पाहाण्यास पैसे द्यावे लागत नाहींत. रांगेंत उभें रहावें लागतें. दर आठवड्यास दोन सिनेमा बघतों. इटालियन नाटक पाहिलें; एक अक्षरही समजलें नाहीं. इटालियन संगीत मात्र आवडतें. संधि सांपडेल त्या वेळेस ऐकायला जातों. येथें अजून खूप थंडी आहे.

बाबा* दीक्षितचं खूप दिवसांत पत्र नाहीं असं कां ? सर्वत्रांस न.

तुझाच,

**अन्ता**

---

* सौ. लिमये यांचे बंधु.

# १६

॥ श्री ॥

C. M. F.
३ मे १९४५

सुले,

तुझं पत्र कां नाहीं ? या आठवड्यांत अनेक घटना झाल्या. वर्तमानपत्रांतून त्या तुला कळल्या असतील. मुसोलिनी फांशी गेल्यानंतर इटलीमध्यें दोस्तांचा पूर्णपणें विजय झाला आहे. बर्लिनही ताब्यांत घेतले असल्यामुळें युरोपांतील युद्धाचा शेवट हें पत्र तुला पोहोंचेतों झालाही असण्याचा संभव आहे. अर्थात लौकर परत येण्याची आशा वाटूं लागली आहे.

काल मला एक पत्र आलें. स्टाफ कॅप्टन आर. एच. लिमये यांना त्यांच्या सौ. नं लिहिलेलं तें पत्र आहे. तें झांशी, आग्रा करून नागपुरास गेलें. तेथें त्यांना कळलें असावें कीं आर्मी स्कूल ऑफ एज्युकेशनमध्यें एक कॅ. लिमये आहेत म्हणून. कारण त्यांवर तें पत्र एम. इ. एफ. कडे गेलें व तेथून माझ्याकडे आलें. अक्षरावरून मी सौ. मालतीबाईचें पत्र ओळखलें. पण नंतर तें मला नसून बंधूंना आहे हें माझ्या ध्यानांत आलें. मी तें तुझ्याकडे पाठवीत आहे. बंधूंचा पत्ता मला माहीत नाहीं. आहे कीं नाहीं गंमत ? आम्हीं खूप हंसलों.

मला येथें पत्रें येऊं लागलीं आहेत. गंगाधर वैद्य, आप्पा परांजपे, मुकुंदा घैसास, नानासाहेब दिवेकर, ताई व अण्णा भाटे.

मधू फाटक ब्रम्हदेशाच्या लढाईंत कामास आल्याची बातमी कळली.

लिलीला येथून पत्र पाठविलें आहे. मधू फाटक अन् वसंता भाटे दोघेही गेले !

मधू लिमयेचा अन् माझा पत्र-व्यवहार चालूं आहे.

येथील हवा अजब आहे. सकाळीं खूप थंडी, दुपारीं खूप ऊन अन् रात्रीं खूप पाऊस. बाबा दीक्षितकडून एकही पत्र न यावें, आश्चर्य आहे ! तुझा भाऊ म्हणून बोलता येत नाहीं. नाहीं तर......

खरं म्हणजे जावई म्हणून रुसायला हंव मी.

तुझाच,
*अन्ता*

## १७

॥ श्री ॥

C. M. F.
८ मे १९४५

सुले,

युद्ध संपल्याची बातमी तुला शिळी असेल पण आज हें पत्र लिहिताना मला ती ताजीच आहे. काल माझा सुटीचा दिवस होता, अन् म्हणून दुपारीं जेवण करून तंबूंत जरा आडवा झालों होतों इतक्यांत एंजिनें, मोटारी यांचे भोंगे अन् शिट्या ऐकूं आल्या, चर्चमधील घंटा वाजूं लागल्या. आरडा ओरडा सुरूं झाला. अन् लगेंच बातमी कानांवर आली. तूर्त कांहीं दिवस मीं A. F. H. Q. मध्यें आहे. तेथें एक मोठा

राजवाडा आहे. अन् राजवाड्यांतच कचेऱ्या आहेत. उठलों अन् कपडे करून राजवाड्यांत गेलों. दुपारचा चहा तेथें होतो. राजवाड्यांत काय अल्ला होता. सर्वत्र आनंद. मोटारींचे भोंगे वाजत होते. कागदाचीं विमानें अन् माळा सर्व खिडक्यांतून लोंबूं लागल्या. प्रत्यक्ष युद्ध-भूमीवर असल्यानंतर युद्ध संपण्याचा देखावा पाहाणें ही विशेष गोष्ट आहे. विजयदिनाबद्दल लौकरच समारंभ सुरूं होतील.

युद्ध संपल्यामुळें दोस्तराष्ट्रांबरोबर तूंही सुटकेचा निश्वास टाकला असशील. कारण आतां येथील धोका खूप कमी झाला असून मला तिकडे लौकरच येतां येईल.

आतां उगीच वादविवाद नको. मोठमोठ्या राष्ट्रांमध्यें समेट होणार. मग तुझ्या माझ्यांत व्हायलाच हवा. तुझी काळजी मला जास्त कीं माझी काळजी तुला जास्त याचा निवाडा करण्यासाठीं एक आंतरराष्ट्रीय कोर्टच स्थापन करायला पाहिजे. पण तें स्थापन होईपर्यंत माझा निर्णय असा कीं मलाच तुझी काळजी जास्त ! मी मुळीं कठोर कधीं लिहीलंच नाहीं, बरं का ! त्यांतून माझी पत्रं तर कशीं अगदीं प्रेमळ असतात. कठोर-पणा औषधाला सुद्धां मिळायचा नाहीं. आपण दोघं इतकीं दूर असतांना एकमेकांना कठोर पत्रं लिहीणं तरी शक्य आहे कां ?

आतां काळजी करूं नकोस. मी लौकर परत येईन. काल हिंदी जेवण मिळालं. कोबी व बटाट्याची भाजी पोळ्या अन् भात. सपाटून हात मारला.

या आठवड्यांत तुझं पत्र कां नाहीं ?

तुझाच,

*अन्ता*

# १८

॥ श्री ॥

नेपल्स
१० मे १९४५

ले,

पत्र-व्यवहारासंबंधींचे बरेचसे नियम शिथिल झाल्यामुळें मीं नेपल्समध्यें आहे हें आज लिहितां येणें शक्य झालें आहे. मी गेला महिनाभर नेपल्स मध्येंच होतों. अन् दक्षिण इटलींत दौरा करणें हें माझें काम होतें. हिंदी सैनिकांच्या उपयोगासाठीं नेल्पसची एक मार्ग-दर्शिका मी रोमन उर्दूमध्यें तयार केली असून ती छापखान्यांत गेली आहे. या कामानिमित्त मला नेपल्स पूर्णपणें पहाण्यास मिळालें.

गेले २ आठवडे मी नेपल्सपासून ३० मैलावर असलेल्या कॅसर्टा या गांवीं आहे. येथें एक प्रचंड राजवाडा असून तेथें सर्व कचेऱ्या आहेत.

काल सकाळीं विजयादशमीनिमित्त येथें मोठी परेड झाली. परमेश्वराची प्रार्थना, जागतिक शांततेबद्दल आशावाद, युद्धोत्तर काळांतील जबाबदाऱ्या वगैरे विषयांवर अत्यंत गंभीरपणें प्रवचनें झालीं. इटलींतील दोस्तांचे सेनापती फील्ड मार्शल अलेक्झांडर यांचें छोटेसें भाषण झालें. एकंदर देखावा फारच मनोहर होता. सुट्टिनिमित्त काल नेपल्सची सफर करून आलों. सर्वत्र आनंदी आनंद आहे. इटालियन, अमेरिकन व ब्रिटिश निशाणें झळकत होतीं. रोषणाईही खूप केली होती. काल रात्रीं सरकारी खाणावळींत ( मेस साठीं हा मराठी प्रतिशब्द आहे.) सर्व अधिकाऱ्यांस मेजवानी झाली. ओली व रंगीत फुकट होतीच ! रात्रीं आम्ही कांहीं अधिकारी हिंडून आलों.

सिनेमाचा कार्यक्रम आठवड्यांतून ४ वेळां होतो. सर्वांस सिनेमा फुकट असतो. ठिकठिकाणीं आम्ही (?) सिनेमागृहें ताब्यांत घेतलीं असून सैनिकांना फुकट सिनेमा दाखविण्याची व्यवस्था असते. सैनिकांचें आयुष्य शक्य तितकें सुखकर करणें हें ध्येय बऱ्याच अंशीं साध्य होतें. आज या सर्व गोष्टी मोकळेपणानें लिहीतां येत असल्यानें किती आनंद होतो आहे, याची तुला कल्पना करतां येणार नाहीं. मुंबईत उतरल्यावर पहिली पानपट्टी खातांना जो आनंद होईल त्याचीच उपमा मी देऊं शकेन.

एवी तेवी युरोपखंडांत आलोंच आहे. तेव्हां आणखी थोडी सफर मारून पॅरिस, लंडन हीं शहरें पाहाण्याची इच्छा आहे. पहावें काय होतें तें. सर्वत्रांस न.

तुझाच,

*अन्ता*

१९

॥ श्री ॥

कॅसर्टा

१३ मे १९४५

सुले,

तुझ्या मनाचा झालेला गोंधळ मला समजतो. अग पण अडचणींतून हंसत मुखानं मार्ग काढायला नको का? कुणाचेंही विनाकारण ऐकून घेऊं नकोस.

माझा स्वभाव तूं जाणतेस. मी शक्यतों सर्वांना धरून राहाण्याचा प्रयत्न करतों. विनाकारण दुसऱ्याचें मन मोडणें माझ्या जिवावर येतें. तसाच विचार तूं कर. पण विनाकारण कुणी शहाणपण शिकवूं लागलें तर आपल्याजवळही अक्कल आहे हें त्यांना जरूर दाखव.

काटकसर अगर उधळेपणा याबद्दल जग बोललें तरी आपण आपला मार्ग शोधून काढावा अन् त्याप्रमाणें चालावें. ऐकावें जनाचें अन् करावें मनाचें हें सगळ्यांत उत्तम. अग तूं तर तुझ्या माणसांत आहेस. पण मला परक्या देशांत सगळ्यांना आपलंसं करून घ्यायचं अन् पुन्हां आपल्या तत्त्वांना धक्का लागूं द्यायचा नाहीं. म्हणजे किती त्रास होत असेल बघ. पण कांहीं झालं तरी माझ्या गोष्टी मी सोडत नाहीं. आपल्या मनाचा एकदां ठाम निश्चय असला कीं, दुसऱ्याच्या भिडेला भिण्याचं कारण काय ?

माझीच गंमत सांगतों. गेल्या आठवड्यांत एका व्याख्यानाच्या वेळीं आमचा सर्वांत वडा ऑफिसर ( कर्नल ) याची भेट झाली. आम्ही सुमोर १० अधिकारी होतो. हिंदी मी एकटाच, अर्थात्, दारू घेण्यासाठीं त्यानें भयंकर आग्रह केला. बाकीचे अधिकारीहि म्हणाले, ‘ एवढ कर्नल म्हणतो आहे तर घेईनास ? ’ म्हटलें, ‘ नाहीं. ’ कर्नलसाहेबही जरा नाखूष झाले. त्यांनीं बोलावलें अन् मला छेडण्यास सुरवात केली. शेवटीं डोक्यांत एक युक्ति आली.

मी म्हणालों, “ सर, जर्मनी व जपानचा पराभव होईतों दारू घ्यायची नाहीं, असा माझा निश्चय आहे. ” जमलें बरोबर. काम फत्ते !

माझें सर्व सामान अन् त्यांत पानदानही चोरीला गेल्यानें, सुपाऱ्या आहेत पण अडकित्ता नाहीं. असो.

येत्या गुरुवारीं कॅसटॉला माझें व्याख्यान आहे. ‘आजचा हिंदुस्थान.’ अर्थात् इंग्रजींत. व्याख्यान चांगलें व्हावें अन् श्रोतृसमुदाय चांगला जमावा असें वाटतें.

तूं पाठविलेली कविता उत्तम आहे. पण तिची चाल? माझी बांसरी सध्यां बंद आहे. ऐकणार कोण? सर्वत्रांस न.

तुझाच,
*अन्ता*

## २०

॥ श्री ॥

कॅसर्टा,
२४ मे १९४५

सुले,

गेला आठवडा छान गेला. लौकरच मी नेपल्सला जाईन. सोमवार माझा सुटीचा दिवस असतो. त्या दिवशीं सकाळपासून कुठें तरी मी बाहेर जातों. या सोमवारीं नेपल्सचा उपसागर पाहिला. मंगळवारीं जवळच असलेल्या कॅपुआ गांवीं गेलों होतों. तेथील एका छावणींत एक जलसा होता. दोन इटालियन मुलींनीं अनुक्रमें व्हायोलिन व पियानो हीं वाद्यें वाजविलीं. तयारी फारच उत्कृष्ट होती. आपलें व त्याचें संगीत अगदीं निराळें आहे. पण फिड्लवरील मेंडकाम व फिरत अत्यंत उत्तम. पियानोवर तर त्या पोरीचा हात ठरत नव्हता. कार्यक्रम मस्त झाला. रविवारीं रात्रीं आणखी एक कार्यक्रम झाला. मोझा नांवाचा एक प्रख्यात् ऑस्ट्रियन गवई होऊन गेला. त्याच्या गाण्याच्या तबकड्या व्यवस्थित रीतीनें लावून एक जलसा झाला. मोझाचें वृंदवादन ( Orchestra )

त्याच्या काळांत ख्यातनाम होतें. त्याच्या वृंदवादनांत एक प्रकारचा आवेश व उत्साह भरलेला आहे. या आठवड्यांत आणखी एक कार्यक्रम आहे. सर्व लोक विरहाग्नीनें होरपळलेले आहेत, पण त्या जखमांवर टीका व गप्पा यांचे मीठ न चोळतां मनोरंजक, चित्तवेधक व उपयुक्त असे कार्यक्रम आंखून मलमपट्टी लावण्याचा प्रयत्न चालतो.

सकाळीं व रात्रीं हवा थंड असते. चेरी नांवाचीं फळें आतां मिळूं लागलीं आहेत. कच्चीं करवंदें जितकीं लाल असतात नां? तितकीं हीं फळें लाल असतात. आंत बारीकशी बी असते. फळें चवदार पण पचायला जरा कठीण असावींतसें वाटतें. युद्ध संपल्यामुळें मेसूमधील जेवण सुधारलें आहे. व्याख्यानामुळें ओळखी खूप झाल्या आहेत. त्यामुळें वेळ छान जातो. माझ्या तंबूंत एक इंग्रज अधिकारी आहे. फार सज्जन आहे. त्याची व माझी दोस्ती जमली आहे. मला एक कुलूप हवें होतें. नेपल्समध्यें चौकशी केली. एका भिकार कुलपाची किंमत १० रु.! माझ्या इंग्रज दोस्तानें त्याचें कुलूप मला दिलें. परवां एक कचकड्याची सोपकेस घेतली. ५ रु. पडले. आतां डोळे हिंदुस्थानकडे लागले आहेत. अन् अंतःकरण तर तुजजवळ आहेच. खूप गमती सांठल्या आहेत. पण लिहूं किती? तिकडील विशेष काय? मे महिना म्हणजे लग्नाचा; अन् त्यांतून युद्ध संपलेलें? मग काय विचारावं? किती मेजवान्या झोडल्या?

येथें एक सुंदर रेनकोट घेतला. त्याला आंतून उंटाचें मऊ कातडें जोडलें आहे. काल ऑफिसर शॉपमध्यें एका मगला गुंडाळलेलें एक मराठी वर्तमानपत्र मिळालें. गेल्या सालचें मुंबईचें होतें. नांव कळलें नाहीं. सती अनुसूया वगैरे चित्रपटांच्या जाहिरातींचें पानच फक्त वाचायला मिळालें. पण जपून ठेवलें असून रोज एकदां वाचतों. हंसतेस काय! अग खरंच. पुण्याची सविस्तर हकीगत कळव.

तुझाच,
**अनंत**

# २१

॥ श्री ॥

कॅसर्टा
३० मे १९४६

सुले,

तुझीं डेक्कन-क्वीनमधील व नागपूरचें, अशीं दोन्हीं पत्रें मिळालीं. पुढील आठवड्यांत मी रोमला जाणार आहे.

गेल्या आठवड्यांत नेपल्सजवळ असलेल्या पॉत्सुऑली येथील ज्वालामुखी पाहाण्यास गेलों. आम्हीं ५ अधिकारी होतो. सबंध इटली-मध्यें सुमारें ३५ मैल लांबीचा पट्टा ज्वालामुखीचा आहे. ही जमीन खाजगी मालकीची असून ही जागा पाहाण्यास येणाऱ्या लोकांकडून त्यांस फी मिळते. फी माणशीं १५ लिरा व गाइडची फी माणशीं ५० लिरा आहे. आंत गेल्यावर जमिनीपासून ६ फुटांवर लाव्हा उकळतांना पाहिला. ही सर्व जागा पोकळ आहे. आम्हीं जेथें उभे होतों तेथें गाइडनें दगड टाकला, धप्प असा आवाज झाला. कारण खालीं पोकळी होती. म्हटलं जर का आतां येथें ज्वालामुखी पेटला तर—? उकळणारा लाव्हा काळसर—गर्द अस्मानी होता. विशेष आश्चर्य म्हणजे डोंगरांत सुद्धां पोकळी होती. आणि डोंगराच्या शिखरावरून वाफा निघत होत्या. हा द्रव अत्यंत ज्वालाग्राही आहे. गाइडनें कागद पेटवून एका ठिकाणीं धरला. लगेच ६–७ ठिकाणांहून वाफा निघूं लागल्या. शेजारीं जमिनीं-तून वाफ निघत होती. अन् वाळू वर उडत होती. ही वाळू अतिशय कढत असते. भुइमूगाच्या शेंगा भाजतांना घमेल्यांतील वाळू जितकी

कढत असते ना, तितकी ही वाळू कढत होती. चहासाठीं आम्हीं पाणी ठेवलें अन् थोड्याच वेळांत तें उकळूं लागलें.

त्याच्या पलिकडे एक गुहा आहे. गुहेचें छत तापलेलें, पण जमीन मात्र गार! असो, सृष्टीचें रौद्र स्वरूप म्हणजे ज्वालामुखी—या शहरांत असणारें एक अत्यंत भव्य अँफी थिएटर पूर्णपणें धुळीस मिळालें आहे. सरकारी उत्खनन खात्यातर्फे संशोधन चालूं आहे. सुमारे २०००० लोक बसतील एवढें अँफी थिएटर, पण ज्वालामुखीच्या भक्ष्यस्थानीं पडलें.

जवळच चर्च आहे. चर्चमध्यें एक पुतळा आहे. तो पुतळा दरवर्षी ११ मे रोजी अँफी थिएटर मध्यें नेतात. तेथें पुतळ्याचा रंग बदलतो. चेहेऱ्यावर लाली चढते. चर्चमध्यें एक दगड आहे. त्या दगडावर जेनेरिस नांवाच्या एका गुलामाचा शिरच्छेद करण्यांत आला होता. या दगडांतून दरवर्षी १ मे व १९ सप्टेंबर रोजीं रक्त वाहातें. या सर्व ठिकाणांचे फोटो खरेदी केले आहेत. प्रत्येक स्थळ पाहातांना तुझी आठवण येते. पण या सर्व स्थळांचें वर्णन रसाळ वाणीनें तुला मीं समक्ष सांगेनच.

तों पर्यंत—

तुझाच,

*अनंता*

## २२

॥ श्री ॥

कॅसर्टा

१०।६।४५

सुले,

रोमच्या दौऱ्याचें सविस्तर वर्णन तुला कळवलेंच आहे. दौरा अगदीं छान झाला. सुमारे १०० रु. खर्च झाला. पण रहाणें व खरेदी याचाच

खर्च. ट्रक फुकट असल्यानें वाहनाचा खर्च नव्हता. रोममध्यें चार-पांच मुली फारच देखण्या होत्या. एका दुकानांतील मुलीचा एक हिंदी अधिकारी दोस्त आहे. मी दुकानांत गेलों त्यावेळीं ती त्याच्याकडून आलेलें पत्र वाचीत होती. पत्र इंग्रजींत होतें. अन् तिला दोन चार शब्द अडले होते. तेव्हां तिनें अभिमानानें मला पत्र वाचायला दिलें. प्रेमपत्रच तें. त्यानें आपलें सर्व अंतःकरण पत्रांत ओतलें होतें. अन् पत्रांत दिलेल्या यादीवरून सबंध खिसाही ओतलेला दिसत होता. तिनें विचारलें— "हिंदी लोक तर श्रीमंत आहेत. तूं सुद्धां श्रीमंत आहेस का ?" मी म्हणालों 'छटाकभर श्रीमंत आहे मी !" "मग तुझी सिनोरिना (प्रियकरीण) कुठें आहे ?" मी म्हटलें, "मला एकच सिनोरिना असून ती सध्यां हिंदुस्थानांत आहे. सुदैवानें इटलींत अजून शाखा कचेरी उघडली नाहीं व उघडण्याचा विचारही नाहीं !" खूप मनमोकळेपणानें हंसली ती.

एका न्हाव्याच्या दुकानांत गेलों. दोन पोरी होत्या तिथें. केस कांपीत असतां या मुली नखें साफ करतात. एक मुलगी म्हणाली, "नखें साफ करून घे." मी नकार दिला. मग म्हणाली, "फेस—मालिश कर." त्यालाही मी नकार दिला. मग म्हणते, "फेस—मालिश नको, नखें साफ करून नकोत मग मला पैसे मिळायचे कसे ?" मी म्हणालों, "परमेश्वरानें पैसे मिळविण्याचे अनेक इतर मार्ग तुला दिले आहेत." तिला अर्थ कळला कीं नाहीं कोण जाणे ?

रोमचा हा एक भाग झाला. रोममधील सौंदर्य खरोखरच अप्रतिम आहे. प्रत्येक घरावर, रस्त्यावर अन् चौकांत उत्तमोत्तम पुतळे दृष्टीस पडतात. शिल्पकारांच्या अन् कलाकारांच्या कृतींनीं डोळे दिपून जातात. 'सर्व रस्ते रोमला मिळतात' ( All roads lead to Rome ) अशी एक म्हण आहे. अन् ती अगदीं खरी आहे. इतिहास, कला, शास्त्रें, यांचा संगम रोममध्यें आहे. पण आधुनिक कलाकार फुकट ! त्यांत कला नाहीं, अन् सौंदर्य नाहीं. आधुनिक चित्रांचें प्रदर्शन पाहाण्यासाठीं एके ठिकाणीं गेलों.

'दवाखान्यांतील टेबल', 'फळांची टोपली', 'दोन घोड्यांचें युद्ध' हीं चित्रें नमुने म्हणून तेथें ठेवलीं होतीं. पाँपे, रोम वगैरे शहरांत आजही, चित्रकार हातांत कुंचले घेऊन निरनिराळ्या स्थळांचीं चित्रें रेखाटण्याचा प्रयत्न करतांना दिसून येतात. पण जिला ओरिजिनल (मराठी शब्द आठवत नाहीं) म्हणतात ती कला आजच्या रोममध्यें नाहीं. नग्न स्त्रियांचीं चित्रेंही भरपूर आढळतात. पण अवयवांची प्रमाणबद्धता, चेहऱ्यावरील भाव, अन् पार्श्वभूमीची सजावट यांनींच मन इतकें भारून जातें कीं कामुकता निर्माण होण्यास वावच नाहीं! ही कला पूर्वींची! याच्या उलट एका नग्न स्त्रीचें आधुनिक चित्रकारानें काढलेलें चित्र पाहिलें—इतकें ओंगळ अन् किळसवाणें होतें तें!

असो, रोमचें हें पुराण पुरें झालें. येतांना आम्हांस कसीनो हें शहर लागलं. कसीनोचा लढा या युद्धांतील महत्त्वाचा झाला. रोमच्या रस्त्यावर कसीनो असल्यानें जर्मनांनीं या शहराची मोर्चेबंदी अत्यंत उत्तम केली होती. पण मराठे व गुरखे यांनीं शौर्याची कमाल करून कसीनो जिंकलें. सतत बारा तास तोफांच्या फैरी झडत होत्या. कसीनो आमच्या हातीं आलें. पण कोणत्या परिस्थितींत? जिथें पूर्वीं रंगमहाल असतील तेथें आतां फक्त दगडांच्या राशी दिसत आहेत. ज्या हिरवळीवर पूर्वीं प्रेमिकांचे विलास व विहार चालत असतील तेथें आतां गाढवें व डुकरें उकिरडा फुंकीत आहेत. कसीनो अक्षरशः बेचिराख झालें आहे. पडकीं घरें अन् जळत्या इमारती या शहरांत विपुल आहेत. पुन्हां कसीनो शहराचें बांधकाम चालू आहे. अन् लोक नव्या जगांतील जीवन शांततेनें चालविण्याचा विचार करीत आहेत.

सुले, अशीं दृश्यं पाहिलीं कीं मनाला चरका बसतो. युद्धाच्या धामधुमींत अशा गोष्टी चालायच्याच हें जरी खरं असलं तरी एका नेत्याच्या चुकीमुळें सर्वच्या सर्व राष्ट्र कसं धुळीला मिळतं याचा पुरावा आज इटली देत आहे. एका बुटाच्या जोडास ५० रु. अशी येथील परिस्थिती

आहे. कोणतीही वस्तू विकत घ्यायला गेल्यास किंमत ३ रु. अथवा १० सिगारेट्स्! दोस्त राष्ट्र इटलीला मदत करीत असलीं तरी फाटलेल्या आकाशाला ठिगळ कोण देणार?

येथील मुक्काम संपवून मी पुन्हां माझ्या कामाला सुरवात करीन. पुढच्या दौऱ्याचे वेळीं 'आइल ऑफ कॅप्री' पहाण्याचा विचार आहे.

परत येण्याची शक्यता इतक्यांत नाहींसें दिसतें. मेजर मसग्रूव्ह माझ्या कामावर फारच खूष आहे. त्याचा स्टाफ कॅप्टन म्हणून मी काम करावें अशी त्याची इच्छा दिसते. तसें असेल तर येथील मुक्काम मोटेल.

आमच्या बरोबर बोटीवर ६ रेडक्रॉसच्या अधिकारी स्त्रिया होत्या. त्यांची मुख्य मिसेस सीली नांवाची एक बंगाली बाई आहे. तिची व माझी ओळख झाली आहे. मध्यंतरी मी टॅरंटोला गेलों असतां तिची भेट झाली. ती नेहमीं कैरोला असते. मजजवळ एक उत्तम सिगरेट केस आहे. त्यांत ३२ सिगरेट्स् राहतात. कोपऱ्यावर एक व्हीनसची मूर्ति मी बसवून घेतली आहे. तिला ती फारच आवडली. म्हटलं "ब्राह्मण गोत्यांत येणार!" दुसरी अशीच सिगरेट केस मिळाल्यास देईन असें मी तिला सांगितलें. जरा वेळानें मी म्हटलें: "कैरोला लेदर रायटिंग केसेस फारच छान मिळतात. मी घेणार होतों. पण वेळ मिळाला नाहीं." तिनं ती गोष्ट लक्षांत ठेवली असावी. कारण गेल्याच आठवड्यांत तिच्याकडून एक सुंदर रायटिंग केस भेट म्हणून आली आहे. लौकरच तिला सिगरेट केस पाठवून देईन!

तुझ्यासाठीं छान छान वस्तू खरेदी केल्या आहेत. गेल्या महिन्यांत ज्ञानप्रकाशचा फक्त एकच अंक मिळाला. बाकी तूर्तास ठीक.

तुझा,

**अनंत**

# २३

॥ श्री ॥

कॅसर्टा
२४ जून ४५

सुले,

तुझं पत्र वाचून मला फार वाईट वाटलं. तुझ्या येवढ्याशा डोक्यांत काय ही विचारांची गर्दी ! माझ्याबद्दल तुला काळजी वाटणं स्वाभाविक आहे. पण शंका कां वाटावी ? इतकी गोड गोड पत्र लिहिणारी तूं मुलगी. मग आज अशी निराश कां झालीस ? अन् तो राग माझ्यावर ? तुला माझ्याबद्दल पूर्ण खात्री आहे ना ? मग जगाशीं तुला काय करायचं ? तुझा अंता इथं बिघडेल असं वाटतं तुला ? या प्रश्नाचं उत्तर तुझ्या जवळच आहे. रोग्याच्या अंगांत ताप किती आहे हें थर्मामीटरला सांगावं नाहीं लागत. त्याच्यावर त्याची नोंद आपोआप होते.

तुझ्यासारख्या पदवीधर अन् सुशिक्षित स्त्रीकडून अशी मानसिक व्यथा ! बरं असा विचार करतांना त्या माणसाचं पूर्वीचं आयुष्य पहावं. त्याची मनोरचना पहावी. वास्तविक एकमेकांना उत्तमोत्तम पत्र लिहावींत. एकटया जिवाला विरंगुळा द्यावा अन् हा विरहाचा काल केव्हां संपेल असा विचार करावा. हा राजमार्ग !

पत्रांच्या लांबी रुंदीवर का प्रेम अवलंबून असतं ? मोत्यांच्या पांच दाण्यांची किंमत अधिक का पोतभर चुरमुऱ्यांची ? तोळाभर सोनं अधिक मूल्यवान का मणभर पितळ ! गुलाबाचं एक फूल चांगलं का टोपलीभर

कण्हेरी ? तूं मोकळेपणानें पत्र लिहितेस—नव्हें लिहायलाच हवींत. पण इतरांवरचा राग असह्य झाला कीं तो गरीब बिचाऱ्या अंतावर कां ?

तुझीं हीं दोन पत्रं मला उशीरा मिळालीं म्हणून तुझं माझ्यावरचं प्रेम कमी कां झालंय ? छे, छे, असा विचारही नको. अन् प्रेमाला पार्थिव कसोट्या कशाला ?

म्हणे प्रेम ही नगरी आहे. खरं आहे. या नगरींत प्रेमिकांचें अंतःकरण तेंच आहे ना ? आश्रय, आसरा, व आधार, सर्वत्र एकच आहे ना ? बाह्य वैभवाऐवजीं, अंतःकरणाचा मोठेपणा हेंच महत्व मापन आहे ना ? कुणी श्रीमंत असतो तर कुणी गरीब असतो, कुणाची शब्दसंपत्ति बाह्य उपचारांत असते तर कुणाची मुकी असते. सुले, तुझ्याबद्दलचे विचार प्रत्येक क्षणीं माझ्या मनांत असतात हें सांगायला का हवं ? शब्दांनीं लाडके, प्रिये, प्रियतमे, हृदयवल्लभे, प्रणयिनि आदि संबोधनांची शिफारस-पत्रं का धाडायचीं आहेत ? मंगळागौरीच्या देवीप्रमाणें शब्दांच्या फुलांत तें प्रेम लपून जावं असं का वाटतं तुला ? मारवाडणीच्या अंगावरील दागिन्यांमुळें अखेर मारवाडीण न दिसतां नुसते दागिनेच दिसतात; तसं का पत्रं हवं ? झाडाला खतपाणी घातलं तरच तें टवटवीत दिसतं; मग विरहाच्या खडकावर, प्रेमस्मृतींच्या आंतील ओलाव्यावर कशीबशी उभी राहिलेली ही प्रेमवल्ली कशी टवटवीत होणार ? कशी वाढणार ?

अन् तुला माहीत आहे सुले, मी कांहीं कवि नाहीं, मी रसिक नाहीं. अनेक पुष्पांना मोहवून, त्यांचा उपभोग घेणारा मी भ्रमर नाहीं. कमलपत्रांत गुरफटून जाऊन मागून पश्चाताप करणारा मी द्विरेफ नाहीं.—मी साधासुधा व्यवहारी माणूस आहे. मला तोंड आहे तें नुसतीं प्रेमवाक्यं बोलण्यासाठीं नाहीं. हात आहेत ते प्रेमाचं महाभारत लिहिण्यासाठीं नाहींत. माझे डोळे आहेत ते इतर स्त्रियांवर दृष्टीकटाक्ष टाकण्यासाठीं नाहींत. या सगळ्यांचा उपयोग सुलीसाठीं आहे.

इतर सज्जनांचीं अनेक उदाहरणं ऐकून तुला थोडीशी काळजी वाटणं स्वाभाविक आहे. पण नसता विचार करूं नकोस. मी नसती संगत धरणार नाहीं. अन् समजा तसं झालं तरी परिसाला लोखंडाची काय भीति ? समजलं ?

तुझाच,

***अन्ता***

## २४

नेपल्स
१२ जून १९४५

॥ श्री ॥

सुले,

आज फार गंमत झाली. मेजर मसग्रूव्ह्च्या पश्चात् माझं काम बघून कर्नल फार खूष झाला. मसग्रूव्ह्ला कामा करितां मी पाहिजे अन् मेजर बेनेट म्हणून आहे त्याची इच्छा मी त्याच्या विभागांत काम करावें. माझ्या देखत टेलिफोनवर दोघांचा खूप वाद झाला. अखेर निर्णय माझ्यावर सोपवावा असें ठरलें. मला विचारतां मी सांगितलें "हा निर्णय मजकडे नको. मिळेल तो हुकूम मानायचा, अन् आपलं काम चोख ठेवायचं असा फौजेंत शिरतांना मी नियम केला आहे !" शेवटीं समेट होऊन मी नेपल्सला आलों.

कॅसर्टाला तंबूंत रहावें लागे. येथें एका उत्तम हॉटेलांत एक स्वतंत्र खोली मिळाली आहे. आतां संध्याकाळचे ७॥ वाजले आहेत. डिनर

संपवून मी खोलींत बसलों आहे. माझी खोली ६ व्या मजल्यावर आहे. हॉटेल ' व्हेसुव्हिओ ' अगदी बंदरावर आहे. एक खिडकी पूर्वाभिमुख असून दुसरी पश्चिमाभिमुख आहे. उदबत्तीचा सुगंध खोलीभर दरवळला आहे. सर्व व्यवस्था सुसज्ज आहे. समुद्राच्या लाटा गोड गुंजारव करून आपल्या प्रियतमाला भेटायला उड्या घेत आहेत. पक्षी पूर्वेकडे जाताहेत. माझेही विचार अजाणता पूर्वेकडे,—हिंदुस्थान, पुणें, आपलें घर अन् अर्थात तूं— भरधांव धांवताहेत.

आतांच्या या क्षणीं मला तुझी अत्यंत आठवण येत आहे. विरह आत्यंतिकपणें जाणवत आहे. हें सौंदर्य, हें वैभव, याचा उपभोग माझ्या-बरोबर तूं घेतला असतास तर ?

दारू अन् परस्त्री या पासून मी अलिप्त राहिलों यांत विशेष काय केलं ? ज्याला घरीं पोटभर जेवायला मिळालंय तो उकिरडे कां फुंकील? अमृताचें आटोकाट पान केल्यानंतर द्राक्षें सडवून तयार केलेलें पेय कोणता सूज्ञ मनुष्य पीइल ? प्रेममूर्तिची प्राणप्रतिष्ठा हृदयाच्या गाभाऱ्यांत केल्यानंतर नरकासुराचा भक्त कोण होईल ?

लग्न झालेला पुरुष म्हणजे लगाम लावलेला घोडा. सरळ रस्त्यानें जोपर्यंत चालत आहे तोंपर्यंत ठीक आहे. पण वेडावांकडा जाऊं लागला कीं लगामाचे काटे रुतलेच म्हणून समजावें. जो पुरुष व्यवस्थित आहे तो वाममार्गानें जाणेंच शक्य नाहीं. अन् गेलाच तर प्रेमरज्जु अन् सद्-सद्विवेकबुद्धिचे कांटेरी लगाम त्याला वठणीवर आणतील— खरं ना ? तुझ्या इतका प्रेमळ पाठीराखा माझ्यामागें असल्यावर मला ग कशाची काळजी ?

तुला एक गंमत सांगायची आहे. मेजर मसग्रूव्ह मध्यंतरी हिंदुस्थानांत आला होता. ४ दिवसांसाठीं. माझा अडकित्ता चोरीला गेल्यानें त्याला तिथून आणायला सांगितला. आतां त्याला अडकित्ता काय कळणार ××× ! म्हणून नटक्रॅकर आण म्हणून सांगितलं. आकृति काढून

दिली. एक सुपारी काढून कशी कांपता येईल हेंहि समजावलें. हो म्हणाला. अन् नटक्रॅकर आणला बाळानें ! पण कसला ? अक्रोड फोडण्याचा ! तूं मेसमध्यें पाहिला असशील ? आतां या अडकित्त्यानें काय फोडूं ? सुपारी कीं कपाळ ? पण बरं झालं, संवय सुटली. १॥ महिना झाला, सुपाऱ्या पडून आहेत. चुना अन् जर्दा शिल्लक असल्यानें गाडीला पेट्रोल मिळते आहे म्हणा !

कॅप्टन आर. एच्. लिमये यांचें आणखी एक पत्र मिळालें ! पत्र म्हणजे काय मेसचें बिल होतं. पाकिटावर शेरा होता. कव्हर फाटलेल्या परिस्थितींत पत्र मिळालें. बिलासोबत आणखी:कागद होते. प्रेमानें उघडून पाहिलें, कारण पाकिट फाटलेलेंच होतें. तर काय, एका नूतन विवाहित पत्नीचें आपल्या प्रियतमास पत्र ! मिड्ल्सेक्स् इंग्लंडमधून लिहिलें. डार्लिंगनें सुरवात; म्हणजे नांवाचा पत्ता नाहीं. अन् शेवटीं तुझी बिलव्हेड--म्हणजे लिहिणारणीचा पत्ता नाहीं. वाटेल तें भारूड होतं पत्रांत. डार्लिंग शब्द १४ वेळां अन् लव्हचा तर सागरच होता. ऑफिसमध्यें सर्वांस पत्र दाखवलें. हंसतां हंसतां पुरेवाट ! कुणी म्हणे आम्हांला माहीत नव्हतं तुमची कांहीं भानगड आहे. कुणी म्हणे—तुमच्या बायकोचा पत्ता द्या म्हणजे कळवतो तिला. कुणी म्हणे—लिमये रसाळ उत्तर पाठवा आतां या पत्राला. कुणी म्हणें इंग्लंडमध्यें युद्धानंतर स्थायिक व्हायचा विचार दिसतो आहे तुमचा ! अखेर बिल फाडून टाकलं. वरचें कव्हर, हिंदुस्थानांतील पोस्टांच्या शिक्क्यांचें स्मारक म्हणून ऑफिसांतल्या एका क्लार्कनें ठेवलें आहे. अन् तें प्रेमाचें स्मारक तुला वाचण्यासाठीं ठेवलें आहें जपून ! आहे ना मजा !

पुढील आठवड्यांत मी दौऱ्यावर जातों आहे. तेव्हां पत्र उशीरा मिळालं तरी काळजी करूं नकोस.

तुझाच,
अन्ता

६८३२

# २५

नेपल्स
१४ जून १९४५

सुले,

तुझी पत्र वाचून खूप गंमत वाटली. तीं पत्रं म्हणजे माझी मेजवानी. माझा सणाचा दिवस. पण मेजवानी मोकळ्या मनानं झोडावी. मी शिकवलेला धडा विसरलीस. अप्रिय गोष्टी एका कानानें ऐकायच्या अन् दुसऱ्या कानानें सोडून द्यायच्या. जुन्या स्मृतींचं शिळं ताक फेकून देऊन त्यांतलं नवनीत तेवढं घेतलं पाहिजे. राहिलेल्या चोथा पाण्याचा हव्यास कशाला ? नव्या वस्तू, नव्या कल्पना, नवे विचार यांचा संग्रह करावा.

मला आज भर्तृहरिच्या उत्तर रामचरित्रांतील एका प्रसंगाची आठवण येते आहे. राम वनवासाहून परत आल्यानंतर सीतेला सविस्तर हकीगत सांगतो. सीता सुद्धां एकाकी आयुष्यांतील प्रसंग सांगते. गप्पा संपत नाहींत. पण रात्र संपून जाते. त्या गप्पागोष्टींत ती दोघं इतकी रंगून जातात कीं कशाचीही शुद्ध त्यांना रहात नाहीं. सीतेच्या मनांत रामाला एक प्रश्न विचारायचा असतो—सीतेची सुटका रामानें केली ती प्रिय कराचें कर्तव्य म्हणून सीतेसाठीं केली कीं कीर्तीच्या अथवा ऐहिक वैभवाच्या आशेनें केली ? गप्पा रंगल्या पण प्रश्न तसाच राहिला. उत्तर मिळालं पण प्रत्यक्ष नाहीं मिळालं. रामाच्या प्रत्येक अक्षरांत ' प्रिये सीते हें तुझ्यासाठीं सर्व ' असें पडसाद निघत पण उच्चारण नव्हतें. त्याच्या दृष्टींत प्रेमाची धुंदी होती—गर्वाचा मद नव्हता. त्याच्या हातांतील कंकणें प्रेमध्वनि काढीत होती. पण प्रेमाची गर्जना त्यांत नव्हती. सीतेच्या पाठीवरून प्रेमानें फिरणारा त्याचा हात—त्यांतून विद्यु-

लहरी निघत होत्या. पण त्यानें छातीवर हात आपटून एक लंबे चौडे प्रेम काव्य गाइलें नाहीं. सीतेच्या हृदय वीणेंतून अनुरागाचें झणत्कार निघत होते.—पण तिचें मन इंपिरियल बँकेतला क्लार्क जसा प्रत्येक रुपया वाजवून पाहातो त्या प्रमाणें प्रत्येक शब्द परीक्षून घेत होतें.

आपण आज पर्यंत एकत्र घालविलेल्या रात्रंदिवसांचे अनुभव यापेक्षां कांहीं निराळे आहेत कां ?

इतर कुणाकडे लक्ष देऊं नकोस. आपलं मन आपल्याला ग्वाही देतयं ना ? आरसा अन् चेहरा दोन्ही निर्मळ पाहिजेत. मगच प्रतिबिंब स्वच्छ पडतं. आपल्याला योग्य वाटतं तें करावं. प्रत्येकाला खूष ठेवणं अशक्य आहे. एकाचं अन्न दुसऱ्याला विषवत् असतं. ज्याच्याशीं आपला संबंध नाहीं. त्याचा विचारही नको.

भोवतालच्या जगाकडे प्रेक्षकाच्या दृष्टीनें पहायला हवं. नाटकांतला खलपुरुष नायिकेला पळवीत असतां आपण फरासखान्यांत जात नाहीं वर्दी द्यायला. या फॉर्म्यॅलिटीच्या कल्पना मला वाटतं आपण सोडून द्याव्यात. दोन ठोसे द्यावे, दोन घ्यावे, अन् शेवट गोड करावा. औपचारिकपणाचा अतिरेक हा समाजांतला एक रोग आहे असं मला वाटतं. इथल्या तंत्रानें मीं टेकीला आलों आहे. काय तर म्हणें तो खुर्चीवर बसला असतां त्यानें जमिनीशीं ५० च्या ऐवजीं ५२ डिग्रीचा कोन केला होता. हत् लेको ! भरपूर जेवण झाल्याची पावती म्हणून कृतज्ञतेची ढेंकर देणं हा गुन्हा—पण नाक शिंकरून रुमाल श्रीमंत करणें हें शिष्ट संमत !

कसल्या ह्या कल्पना ? असो. युद्धानंतरच्या कार्यक्रमाचा विचार सुरू आहे. तुझे विचार कळव, तोपर्यंत सर्व ठीक.

तुझाच,
*अनंत*

# २६

॥ श्री ॥

नेपल्स
१९ जून १९४५

सुले,

वसंत ऋतूचा येथें बहर आला आहे. सफरचंदी रंगाची पण आंत आंब्यासारखा गर असलेली प्लम नांवाची फळें, चेरी नांवाची फळें, पिकलेले व ताजे जरदाळू विपुल मिळूं लागले आहेत.

सायंकाळीं शहराच्या बाहेर समुद्र किनाऱ्यावरही लोक फिरायला जातात. समुद्र किनाऱ्यावर ' नॅशनल व्हिला ' नांवाचें उद्यान आहे. या उद्यानांत एक मत्स्यालय आहे. २०–२५ प्रकारचे मासे तेथें ठेवलेले आहेत. कांचेच्या मोठ्या मोठ्या कपाटांत समुद्राचें पाणी भरून खालीं समुद्रांतील वाळू पसरून व बाजूला दगडांनीं टेकडीचा देखावा निर्माण करून हे मासे शक्यतों नैसर्गिक परिस्थितींत ठेवण्यांत आले आहेत. त्यांचे रंग काय सांगावे ? इंद्रधनुष्याच्या रंगाचें मासेहि पुष्कळ आहेत. इलेक्ट्रिक फिश ( Electric fish ) नांवाच्या एका माशास मी हात लावला तों विजेचा झटका बसला. मोठाले सुळे असलेले शार्क, सर्पाकृति ईल, घोड्यासारखें तोंड असलेला हॉर्स फिश, विमानाच्या आकाराचा फ्लाइंग फिश वगैरे मासेही तेथें होते.

आमच्या मेसमध्यें एक स्त्री अधिकारी आहे. ६ फूट उंच, ३॥ फूट रुंद आहे. वजन असेल २०० पौंड. भलतेंच प्रस्थ आहे. असो, तिनें मला आपल्या टेबलावर एकदां न्याहारी करण्याकरितां बोलावलें. गेलों मी. कडेवर मूल घेतलेल्या आईचा फोटोच जणूं ! इतका तिच्या व

माझ्या विस्तारांत फरक होता. मी मात्र तिच्या कडेवर नव्हतो ! कडेला होतो ! मध्येंच बोलतां बोलतां ती एकदां लाजली ! अहाहा ! काय तो देखावा ! त्या गालावर पडलेल्या खळींत एक लहानसें शहर सहज मावलें असतें ! तिनें माझ्याकडे पाहिलें, अन् ती स्निग्ध नजर 'अमृत-मंथन' मधील चंद्रमोहनच्या डोळ्याप्रमाणें भासली, अन् ती हसूं लागली, त्या स्मितलहरी खवळलेल्या पॅसिफिक महासागराच्या तुफान लाटांप्रमाणें दिसूं लागल्या. त्यामुळें तिच्या हालचाली सुरूं होऊन भूकंपाप्रमाणें हादरे बसूं लागले. भरधांव जाणारी मोटार कष्टानें आवरण्याचा मोटारहाक्या जसा कसून प्रयत्न करीत असतो, त्या प्रमाणें ती आपलं मंदस्मित (!) आवरण्याचा प्रयत्न करूं लागली. थोड्या वेळानें तिनें आपल्या हास्याला ब्रेक लावला अन् जग एका मोठ्या आपत्तींतून सुटलें. मी धक्यांतून ( म्हणजे मानसिक बरं का—अंगसटीस आणण्याचा कार्यक्रम झाला नाहीं ) असा निसटलों असून, प्रकृति ठीक आहे.

गेल्या आठवड्यांत आणखी एक ऑपेरा पाहिला—त्याचें नांव "ऐदा." इटालियन भाषेंत होता तो. पहिल्या अंकांत ३, दुसऱ्यांत २ व तिसऱ्यांत ४ असें एकंदर ९ शब्द सबंध नाटकांत ओळखीचे वाटले. तेव्हां अंदाज बांधण्यास सुरवात केली. पहिल्या अंकांत नाटक सामाजिक असावें असें वाटलें. दुसऱ्यांत पौराणिक असल्याचा भास झाला. अखेर नाटक ऐतिहासिक निघालें. बाकी कार्यक्रम उत्तम.

तुझाच,
**अनंत**

## २७

॥ श्री ॥

नेपल्स

१० ऑगस्ट १९४५

सुले,

या आठवड्यांत सरकारी कामासाठीं मला टोरँटोला जावें लागलें. मोटार होतीच. मी आतां चांगलें ड्रायव्हिंग करूं लागलों आहे.

इटालियन शिकण्याचा पुन्हां एकदां प्रयत्न करून पाहणार आहे. म्हणजे त्याचं असं झालं; माझ्या जागी कॅ. पूरणसिंग नांवाचा एक अधिकारी नेपल्स येथें आला आहे.—त्याला सुदैवानें एक फ्लॅट मिळाला आहे. आम्हीं तेथें गेलों तो त्याच जागेंत मालक रहात होते. ते जागा सोडीनात. ही जागा वास्तविक सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली असून त्याबद्दल मालकांना भाडें मिळतें. पण वर हा चावटपणा! मला जागा ताब्यांत घेण्याचा हुकूम होता. मी त्यांस १० मिनिटांचा अवधि दिला. जागा खाली न केल्यास मला नाइलाजानें सामान बाहेर फेकावें लागेल. अन् चावटपणा केल्यास, धक्के मारून बाहेर घालवीन असेंही बजावलें, माझ्या बरोबर ५–६ माणसें होतीं. १० मिनिटें वाट पाहून माझ्या माणसांना आंत जाण्याचा हुकूम दिला. अन् मीही आंत शिरलों. २ ट्रंका बाहेर काढल्या. आणखी ५ मिनिटें देतों. तुमची माणसें आणा अन् सामान बाहेर काढा. नाहींतर खिडकी बाहेर फेकून देईन असेंही बजावलें. बराच आरडा ओरडा केला त्यांनीं. पण मग जागा ताब्यांत मिळाली. सांगायचें तात्पर्य काय की हें सर्व संभाषण करतांना माझे हाल झाले. इटालियन डिक्शनरी माझ्या नेहमी खिशांत असते. जागा, कबजा,

वगैरे शब्द, शब्दकोशांतून काढले. पण विभक्ति प्रत्यय कुठे येताहेत ! १० मिनिटांनीं माझें वाक्य तयार झालें. तें खालील प्रमाणें.

" मी जागा ताबा घेणें—१० मिनिटें वेळ—सामान बाहेर फेंकणें, जर तूं ताबा न सोडणें " आतां ठरविलें आहे की चालतें बोलतें इटालियन आपल्याला शिकलें पाहिजे. येथील अधिकाऱ्यांसाठीं एक इटालियन भाषेचा वर्ग काढला आहे. त्याला उद्यापासुन जाणार आहे.

आपले लोक इटालियन फारच चांगलें अन् सफाईनें बोलतात. साधुसिंग तर ह्या भाषेंत पत्र लिहीत असे. हा साधुसिंग कोण ? हो, ती गमतीदार हकीगतच आहे. टोरॅंटो येथें एका इस्पितळांत मी एका डॉक्टरशीं गप्पा मारीत असतां एक इटालियन जोडपें तेथें आलें. दोघेही वृद्धच होते. पण बाईच्या तोंडावर करारीपणाची छटा होती. हें जोडपें मिलान येथें रहात होतें. युद्ध चालू असतांना जर्मनीच्या ताब्यांत आपले बरेंचसे सैनिक होते. यांतील पुष्कळसे संधी सापडतांच पलायन करीत. व आपल्या फलटणीस येऊन मिळत. साधुसिंग हा असाच एक युद्धकैदी पळून मिलानला आला व २० महिने या घरांत राहिला. या नवरा बायकोला मूल नाहीं. साधुसिंगावर त्यांनी पुत्रवत् प्रेम केलें. व त्यास दत्तक घेण्याचें ठरविलें. या अवधींत साधुसिंग बरा झाला. परत येण्याचें वचन देऊन तो तेथून निघाला. दुर्दैवानें पलटणींत दाखल होतांच तो आजारी पडला तेव्हां त्याला या इस्पितळांत पाठविण्यांत आलें. तेथून त्यानें मिलानला पत्र पाठवलें. या मानलेल्या आईबापांस हें पत्र मिळतांच ते मिलानहून टोरॅंटो येथें आले. पण येथें आल्यावर त्यांना समजलें कीं साधुसिंग हिंदुस्थानांत परत गेला आहे. ( कारण तो बरा होताच त्याला मायदेशाला पाठवून दिलें. ) ती बाई तर बिचारी रडूं लागली. नवरा म्हणाला " सरकारला म्हणावं—साधु ऐवजीं मीं जपानशी लढण्यास जातों. पण साधुला मिलानला पाठवा " एकसारखें साधुसिंगाचें कौतुक !

हा साधुसिंग या २० महिन्यांच्या काळांत इटालियन खूपच शिकला. असा अशिक्षित मनुष्य जर इटालियन शिकतो. तर आपल्याला कां शिकतां येऊं नये ? जरूर येईल.

असो. मी पाठविलेले फोटो मिळाले कां ? पत्र जरूर पाठव.

तुझाच,
अन्ता

## २८

॥ श्री ॥

H. Q. 3 Dist
C. M. F.
ता. ७ जुलै १९४५

सुले,

पत्र वेळेवर न मिळाल्यानें तुला किती काळजी वाटत असेल हें मीं जाणतों. पण मी दौऱ्यावर असलों म्हणजे तर १५–२० दिवसांत तुझी पत्रं मला मिळत नाहींत. शिवाय हल्लींची पोस्टाची स्थिति; तेव्हां धीर धरून विचार केला पाहिजे. काळजी करून कसं चालेल ? थोडासा तरी आत्मविश्वास नको कां ?

आम्ही स्वतःची काळजी घेतोच. शिवाय सरकारनें लष्करासाठीं खूप खबरदारी घेतली आहे. खाण्यापिण्याची सर्व व्यवस्था सरकारमार्फत होते. त्यासाठीं लष्कराचें एक स्वतंत्र खातें आहे. त्याला ‘ आर्मी केट-

रिंग कोअर ’ म्हणतात. आमच्या मेसची व्यवस्था उत्तम आहे. इथलें रोजचें खाणें— ६॥ वा. चहा, ८। ब्रेकफास्ट, १० वा. चहा व केक, १ वा. लंच, ४ वा. चहा व केक, अन् सायंकाळीं ७॥ वाजतां डिनर— हेंच इतकें भरपूर होतें कीं बाहेरचें खाण्याची वेळच येत नाहीं. सकाळ संध्याकाळ जेवणावर फळें मिळतात. कचेरींत जलथैली ( वॉटर बॉटल ) घेऊन जातो व त्यांतील पाणी पितों. सर्व कांहीं व्यवस्थित आहे. त्रास फक्त एकच अन् तो म्हणजे आपल्या माणसाचा विरह.

तूं शिकलेली समंजस मुलगी. गैरसमज, दुसऱ्याचे कटु बोल अन् मिळालेली वागणूक या पातळीच्यावर आपण राहिलं पाहिजे. शिक्षणाचा उपयोग काय ? कोणतीहि गोष्ट मनाला लावून घेण्यापेक्षां वाऱ्यावर सोडून द्यावी. मी तिथें नसतांना होणारा त्रास सहन करायला खंबीर बनलं पाहिजे. म्हणे अमुक तमुक भेटायला आले नाहींत. ‘ चहाचा कप वांचला ’ अशी वृत्ति हवी. ज्याला कळकळ अन् आपुलकी वाटते तो येतोच. ज्याला येतां येत नाहीं तो सयुक्तिक कारणें दाखवतो अन् जो या दोहोंपैकीं कांहींच करीत नाहीं त्याला कळकळ वाटतच नाहीं. हा आपला मंत्र. आलांत या. आनंद आहे. घर तुमचं आहे. न आलांत तुमची मर्जी. तेव्हां या पुढें ह्याचा विचार करायचा नाहीं अन् मनाला लावून घ्यायचं नाहीं. समजलं ?

येथें महागाई फार आहे. साबणाची डबी ३ रु. एक पांढरी चादर ६ रु. घड्याळाची स्वच्छता १० रु. तरी माझा इतरांसारखा ‘इतर’ खर्च नाहीं. प्रेक्षणीय स्थळें अन् नवीन वस्तूंची खरेदी हा खर्च मात्र खूप करतो. तुला कॅम्पीचे फोटो पाठविलेच आहेत. बाकी कॅम्पी म्हणजे अजब आहे. तूं माझी चेष्टा करतेस ना ? म्हणून मी तुला लिहिणारच नव्हतों. पण माझ्या दैनंदिनींतील खालील उतारा वाच.

## गुरुवार २८ जून १९४५

ऐक हं सुले, नीट लक्ष देऊन ऐक. डॉक्टर ॲलक्स मूंटे नांवाचा एक स्वीडिश डॉक्टर होता. वयाच्या १८ व्या वर्षी तो एका बेटांत आला.

अन् २०–२२ वर्षें त्यानें त्या बेटांत काढलीं. सॅन मायकेल नांवाचें एक सुंदर पुस्तक लिहिलें. त्यांत या बेटाची सविस्तर माहिती त्यानें लिहिली. या बेटाचं नांव काय? अग 'आइल ऑफ कॅप्री'. जगांतलं अत्यंत प्रख्यात बेट! निसर्गाच्या सौंदर्यानं रसरसलेलं आइल ऑफ कॅप्री–थांब सर्व प्रश्नांचीं उत्तरें सांगतो—

मी अन् माझा स्नेही डॉ. ब्रह्मा सकाळीं ७ वाजतां पाँपे मार्गानें सोरेंटोला आलों. सोरेंटोचा रस्ता फारच छान आहे. सूर्य उगवला. उगवत्या सूर्याचीं तांबडी किरणं समुद्राच्या निळ्या पाण्यांत पडून त्यांचा रंग अंजिरी झाला. या अंजिरी रंगाचं प्रतिबिंब हिरव्या झाडांच्या सान्निध्यानं सप्तरंगी झालं! खरा उषःकाल होता तो. प्रियतमेनं साजश्रृंगार करून विलासांच्या श्रमानं थकून झोपीं गेलेल्या आपल्या 'प्रभावी' प्रभाकराला विंझणानें वारा घालून, कोमल अन् गोड स्वरांत आळवून, प्रेमानं आलिंगन देऊन जागं केलं. जगाचा राजा सूर्य, जागा होऊन हळू हळू उठत होता. उषेच्या चुंबनानं त्याचे ओठ लालसर झाले होते. जणुं तिच्या गालांवरील लाली त्याच्या ओठावर उमटली. प्रेमरसानें त्याचे डोळे धुंद अन् लाल झाले होते. रात्रीच्या एकांतांत त्याला बिलगून बसलेली उषाराणी त्याच्या ह्या प्रभावानें अन् दिवस वर येऊं लागल्यानें कुलवधूप्रमाणें लाजून दूर पळत होती. आधल्या रात्रींच्या प्रेममय स्मृति तिच्या डोळ्यांत मावत नव्हत्या. त्याच्या चुंबनाचें अमृत तिच्या ओठांच्या प्याल्यांत अजून तरळत होतें. अंगावरील गुलाबी रेशमी वस्त्र सांवरतांना तिची धांदल उडत होती. लज्जा राखण्याचा तिचा हा प्रयत्न पाहून सूर्य तिला हंसत होता. त्यामुळें लाजून लाजून ती आणखी लाल होत होती.

यथा राजा तथा प्रजा या न्यायानें भूतलावरील लोकही आपापल्या प्रेयसींच्या आलिंगनांतून जागे होत होते. जीवलोकांत चैतन्य आणण्यासाठीं सकाळचा वारा तमालपत्रांचे पंखे हालवीत होता. अन् आम्ही मात्र मोटारींतून चाललों होतों.

८–४० ला आम्हीं सोरेंटोला पोंहोचलों अन् लगेच नांवेंत बसलों. कॅप्रीला जाऊन येण्याचें भाडें २०० लिरा आहे ( सुमारें ७ रु. ) कॅप्रीला पोहोचण्यास १ तास लागतो. आम्ही नेपल्सच्या उपसागरांत आलों अन् कॅप्री दृष्टिपथांत आली जिचें वर्णन करतां करतां कवि थकले, जिचें रक्षण करतां करतां अनेक राष्ट्रें थकली, जिला नटवितां नटवितां निसर्गहि थकला—ती ही कॅप्री ! कॅप्री पाहाण्याची इच्छा फार दिवस मनांत घोळत होती. डोंगर दिसूं लागले, घरें दिसूं लागली. हृदयांत आनंद मावेना. तूं या वेळीं बरोबर हवी होतीस ग !

कॅप्री बेट ७ मैल लांब अन् ३ मैल रुंद आहे. काप्री व अनाकाप्री असे दोन भाग आहेत. आम्हीं बेटाच्या जवळ आलों अन् बोट थांबली. विक्रेत्यांचा आरडाओरडा सुरू झाला अन् लहान लहान बोटी आल्या. ब्ल्यू ग्राटोला जाणारी मंडळी होड्यांत बसूं लागली. मींही एका बोटींत बसलों. ब्ल्यू ग्राटो म्हणजे निसर्गाचा एक अजबखाना आहे. आकार कसा म्हणशील तर दुधाच्या बाटलीसारखा. तोंड लहान पण आंत मोठें. समुद्राजवळील खडकांत एक गुहा आहे. तिचें प्रवेशद्वार फारच लहान आहे. समुद्राच्या पाण्यावर सुमारें ३॥ फूट—मोठी लाट आली कीं हें तोंड बंद होतें. बाहेरच्या बाजूला एक साखळदंड बांधला आहे. प्रवेश द्वारांतून फक्त बोट जाण्या इतकीच जागा असल्यानें उतारूंना अन् नावाड्याला बोटींत पालथें पडावें लागतें. लाट ओसरली कीं नांवाडी साखळदंड जोरानें मागें ओढतो. त्या वेगानें बोट आंत शिरते. आंत जाऊन डोकें वर काढावें तर डोळे दिपतात. किती नयन मनोहर दृश्य ! डोंगराखालील ती जलगुहा. अन् निळें निळें तें पाणी, जणूं आकाशाचा रंग पाण्यांत मिसळला आहे. जणूं तळाशी नीलमण्यांचें भांडार उघडलें आहे. इतकं निळं पाणी मी आज पावेतो पाहिलं नव्हतं. बाकीचे लोक पोहोण्यास उतरले. मींही पोहण्याचा पोशाख करून पाण्यांत उडी ठोकली. माझा रंग निळा झाला. श्रीकृष्णाच्या तसबिरींत त्याला जितका निळा

दाखवितात—तितका निळा रंग प्रत्येक पोहोणाऱ्याच्या अंगावर चढला. ग्वाल्हेरच्या रत्नमहाल राजवाड्यांत भिंतींत रत्नें बसविलेलीं असून त्याचे रंग सर्व दिवाणखान्यांत विखुरलेले पाहावयास सापडतात.–येथें निसर्गानें आपला रत्नमहाल किती स्वस्तांत अन् किती सुंदर सजविला आहे ? आंत ३२ बोटी होत्या.—इतकी मोठी गुहा आहे. डोळ्यांची तृप्ति होईना .पण बाहेर आलों. येतांनाहि पालथें पडण्याचा प्राणायाम !

बंदराला बोट लागल्यावर आम्हीं १० जणांनीं एक मोटार केली व एक गाइड घेऊन आम्ही काप्री बेटाच्या सफरीला सुरवात केली. दोहों बाजूला हिरवीगार झाडी होती. द्राक्षांचे घोस लटकत होते. हिरवळ पसरली होती. हिरवळीला पांचूचा गालिचा म्हणण्याचा कवि संकेत आहे. पण पाचूंच्या गालिच्यावरून चालले असतां खडे टोंचतात. पाचूच्या गालिच्यावर लोळले तर अंगावर ओरखडे उठतात, निसर्गाचा हा गालिचा असा कठीण नाहीं. मऊ आहे. किती मऊ आहे— कोमल त्वचेप्रमाणें मऊ आहे. साबणाच्या फेसासारखा मऊ आहे. समुद्राच्या लाटेसारखा मऊ आहे. आंब्याच्या रसासारखा मऊ आहे. किती मऊ आहे ? या गालिच्यावर आपण लोळलों तर आनंदानें आपलं शरीर पुकलित होईल. रोमांचित होईल— आपले रोम या गालिच्याला बोचतील ! अशा या गालिच्यावरून आमची मोटार चालली होती. मस्त हवा. आनंदी वातावरण, ४ तास काप्रींत हिंडलों. बागा अन् उद्यानें, आरामस्थानें व विलासमंदिरें, एकांतातील प्रणयगृहें— काप्री म्हणजे प्रेम, काप्री म्हणजे काव्य, काप्री म्हणजे जीवन– काप्री म्हणजे भूलोकावरील स्वर्ग.

वेरुळची लेणी तूं पाहिली आहेस कां ? काका कालेलकरांच एक पुस्तकच आहे त्यांवर–ते म्हणतात—"बुद्ध लोकांनीं बुद्धाच्या आज्ञेनुसार जगाचे मायापाश सोडून डोंगराची वाट धरली. बाह्यतः ते संन्यासी झाले पण त्यांचें मन रंगेल व रासिकच होतें. रसिकता दाखविण्याचे सर्व मार्ग त्यांना बंद होते. पण मनांतील विचारांची खळबळ वाढतच

होती. मग त्यांनीं काय केलं. त्याच डोंगराच्या कपारींत अन् गुहांत आपल्या मनांतील विचार त्यांनीं तेथेंच चित्रित केले. ही चित्रें, चित्रें नव्हंत, त्यांच्या मनाची प्रतिबिंबें होत! त्यामुळें या लेण्यांमधील चित्रें इतकी रंगेल व रसिक वाटतात! सुले मी कांहीं मोठा कवि नाहीं कीं चित्रकार नाहीं. पण रसिकतेचे बाकीचे सर्व मार्ग बंद असल्यामुळें माझें मन गत स्मृतींत भिर भिर हिंडतें. माझ्या लहानशा आयुष्यांत घडलेले प्रसंग मी प्रतिबिंबित करतो. त्या मनाला दुसऱ्या सिनोरिनाची जरुरी नसते. ही सर्व वर्णनें माझ्या मनाची सुलीच्या आरशांत दिसणारी प्रतिबिंबें आहेत. पुन्हां प्रतिबिंबें केव्हां दिसतील.

तेव्हां तूर्त येथेंच स्वल्पविराम.

तुझाच,

*अन्ता*

## २९

॥ श्री ॥

कॅसर्टा

२५ जुलै १९४५

सुले,

कालचं पत्रं तुला मिळालंच असेल. सोमवारी संध्याकाळीं कॅसर्टाला पोहोचलों. नेपल्सचा थाट शहरी होता तर कॅसर्टाचें वैभव घरगुती आहे. टॉमलिन फ्रेड नांवाच्या एका अधिकाऱ्यासंबंधीं मी तुला मागें लिहीलेंच

आहे. तो व मी एका तंबूत राहातो. तंबू चांगला प्रशस्त असून जागा भरपूर आहे, नेपल्समध्यें लिफ्टसह सगळ्या सोई होत्या. येथें विजेच्या दिव्याखेरिज कसलीच आधुनिकता नाहीं. तरी पण आयुष्यक्रम चांगला आहे.

या गांवीं एक खूप मोठा राजवाडा आहे. त्याच्यामागें खूपच मोठें उद्यान आहे. ठिकठिकाणी संगमरवरी पुतळे व कारंजी आहेत. वृक्षराजींनी सर्व उद्यान थंडगार राहातें. अशा या उद्यानांत एकूण १४ कँप आहेत अन् प्रत्येक कँपांत ३० तंबू आहेत. माझ्या तंबूचा नंबर आय् २७ आहे. छोटे छोटे पद् पथ, चौक सर्व आहेत. प्रत्येक कँपांत एक न्हाणी घर आहे. त्यांत शौचकूप, वॉशबसीन, शॉवर, आहेत. २४ तास थंड व ऊन पाणी मिळतें.

टॉमलिनची व माझी सध्यां खूप दोस्ती झाली असून दोघांच्या नांवाचा संयोग करून तंबूला नांव दिले आहे. अनंत + फ्रेड = ' ॲनाफ्रे. ' हें आमच्या तंबूचें नांव. अधिकाऱ्यांसाठी खूप भोजनालयें आहेत. मी बी मेसमध्यें आहे. आमचा तंबू कचेरी व मेस यांच्यामध्यें आहे.

दर आठवड्यास आम्हांला दारूची एक बाटली मिळते. अर्थांत त्याला मागणी फार. कधीं कधीं कोणी स्नेही दारूची बाटली घेऊन भेट म्हणून सिगरेटस् देतो. फ्रेड दारू पीत नाहीं म्हणून त्याचें माझें चांगले जमतें. त्याच्या बायकोला त्यानें मजसंबंधीं लिहिलें होते. तिनें मला नमस्कार सांगितले आहेत. तो मजकूर त्यानें मला दाखवला. मी म्हटलें मी माझ्या बायकोला तुझ्या संबंधी पूर्वींच लिहीलें आहे. अन् प्रत्येक पत्रांत ती तुला नमस्कार लिहीते. पुरावा म्हणून तुझी सर्व ' मराठी ' पत्रें त्याला दाखवलीं. कुठेही बोट ठेवावें अन् म्हणावें —" हे बघ, मजकूर मराठींत आहे. त्यामुळें तुला कळणार नाहीं. " आम्ही दोघे घरच्या गप्पा मारीत बसतों रात्रीचे.

आतां फारसा दौरा करावा लागणार नाहीं व कायमपणा आला आहे. दुष्यंत राजा शिकारीला गेला—अन् त्याला शकुंतला दिसली. तो मोहित झाला. विदुषकानें म्हटलें महाराज, राजवाड्यांत इतक्या राण्या आहेत. मग हिची काय जरूरी ? दुष्यंत उत्तरला—अरे आंबे खाऊन कंटाळा आला की चिंच गोड लागते. नेपल्समध्ये बादशाही वैभव भोगलें खरें पण तें कृत्रिम वाटे. तूर्त तरी कॅसर्टातील आयुष्य गोड वाटत आहे.

दर बुधवारी नेपल्स व दर शनिवारी सुटी असा तूर्त कार्यक्रम आहे.

बाकी ठीक.

तुझाच,
*अन्ता*

## ३०

॥ श्री ॥

C. M. F.
३० ऑगस्ट ४५.

सुले,

घराची ओढ ही एक विलक्षण गोष्ट आहे. आज तुझी—घरची आठवण फारच येते आहे. अशावेळीं काय करावं सुचत नाहीं. शेवटीं दुधाची तहान ताकावर म्हणून तुला खूप गोड पत्र लिहितों अन् तुझ्याशीं गप्पा केल्याचा आनंद मानतों झालं.

आमच्या कचेरींत बदल्या झाल्यामुळें नव्या अधिकाऱ्यांचे आगमन व जुन्यांस निरोप देण्यासाठीं गेल्या मंगळवारीं रात्रीं मेसमध्यें मदिरापान समारंभ झाला. आम्हीं एकूण १५ अधिकारी होतों. प्रत्येकाच्या नांवाचें एक पेय. मी १५ ग्लास लेमोनेड प्यालो. अन् येथें साखरेचें दुर्भिक्ष असल्यानें लेमोनेड छटाकभर आंबटच होते. बरं समारंभ गोड असल्यानें 'तोंड वाकडें' करण्याची सोय नाहीं. पहिले पांच ग्लास अमृतासारखे लागले. त्यानंतरचे ५ ग्लास एरंडेलासारखे भासले, अन् शेवटचें ५ ग्लास पंचकव्यासारखें प्यालों. तुला सांगतों सुले, ते लेमोनेड माझ्या अंगावर आलें. पण म्हणतात ना, अडकली गाय फटके खाय.

हे १५ ग्लास कसे प्यालों तें माझें मलाच माहीत. एकेक ग्लास (अर्थात् दारूचा) प्याल्यानंतर बाकीचे अधिकारी रंगांत येऊं लागले. तर एकेक ग्लास (अर्थात लेमोनेडचा) घशाखालीं उतरवितां माझें वांगें होऊं लागलें. मला इतकी किळस बसली आहे कीं बोलायची सोय नाहीं.

मध्यें आमच्या मेसमध्यें मजा झाली. जेवणांत कांहींतरी बिघाड झाला म्हण, कांहीं म्हण, पण रात्रीं सगळे लोक ओकूं लागले. किराणा मालाच्या दुकानापुढें रॉकेलच्या बाटल्या हातांत घेऊन जशी गर्दी होते तशी शौचकूपांशीं गर्दी होती. मी त्या रात्रीं तंबूतच हिंदी जेवण जेवलों असल्यानें निसटलों. फ्रेड रात्रभर शंख करीत होता. अखेर झोपण्यास सकाळचे ४ वाजले.

तुझी दोन्हीं पत्रें मिळालीं. चांगलें घर मिळाल्यास जरूर घे. ती. मा. आईला पैसे व्यवस्थित मिळतात ना ? तिच्याकडून मला पत्र नाहीं. प्रकृतीची काळजी घे. कसलाही जास्त विचार करूं नकोस. आनंदांत रहा.

तुझाच,

*अन्ता*

# ३१

॥ श्री ॥

८ सप्टेंबर १९४५

सुले,

मी ठरवतो खूप गोष्टी. पण कांहीं वेळा वेळाभावीं त्या तशाच राहातात. म्हणजे त्याचं असं आहे. चांगल पुस्तक वाचायला मिळालं की बाकी सर्व गोष्टी राहातात एका बाजूला. अन् पुस्तक संपवितों. आमच्या कचेरींत एक सुरेखसें ग्रंथालय आहे. त्यांत खूप पुस्तकें आहेत. परवा मजा झाली बरं कां. बुधवारीं रात्रीं येथील हिंदी शिपायांच्या कँप-मध्यें युद्ध समाप्तीबद्दल मेजवानी होती. मटाराची उसळ, एग करी, पुऱ्या वगैरे बेत होता. खूपच हात मारला. तेथून निघालों तो एका अधिका-ऱ्याच्या खोलींत गप्पा सुरूं झाल्या. १२॥ वाजतां घरीं आलों. अग घरीं म्हणजे माझ्या तंबूत.

झोप येईना म्हणून पुस्तक काढलें वाचायला. अन् इतका रंगलों कीं ४ वाजतां झोपलों. सकाळी जागा होतों तों घड्याळांत ८।४५ झालेले! बॅटमन रात्रीं खूपच प्याला होता म्हणून त्याला सुटी दिली होती. फ्रेड दौऱ्यावर गेला होता. मग मला उठवणार कोण! जागा झालों. आभाळ आलं होतं—त्यामुळें वेळेचा अंदाज येईना——म्हटलं छे, छे, आपलं घड्याळ चुकलं आहे. बाहेर आलो तों आपला सर्वत्र शुकशुकाट. कसला चहा, अन् कसला ब्रेकफास्ट! घाईघाईनें दाढी केली. कपडे केले, अन् कचेरींत पळालों. नेहमीं मी मसग्रूव्हच्या आधीं जातो. पण त्या दिवशीं त्यानें माझी फार वाट पाहिली. मी पार्टीला जाणार हें त्याला माहीत होतें. त्यानें टेलिफोन केला. त्याला कळलें कीं लिमये काल रात्रीं

चांगलाच रंगला होता. मी गेलो. म्हटलें " सॉरी. " मला म्हणाला " तूं थापा कां मारतोस ? "

" कसल्या थापा ? "

" दारू पीत नाहीं म्हणून "

" यांत थापांचा काय प्रश्न आहे ? मी खरंच दारू पीत नाहीं."

" काल रात्री प्यायला नाहींस ? "

" मुळींच नाहीं "

" पण मला बातमी कळली आहे "

" दुर्दैवाने ती खोटी आहे.

त्यानें माझ्याकडे पाहिलें. अर्थातच नेहमीं प्रमाणें चेहेरा. त्याचा विश्वास पटेना. पण गप्प बसला. ज्यानें सकाळीं त्याला ही बातमी पुरवली तो अधिकारी मसरूव्हला संध्याकाळीं परत भेटला. त्यानें पुन्हां विचारलें. तेव्हां तो अधिकारी म्हणाला " आम्हीं तुझी गम्मत केली. आम्हीं लिमयेला खूप आग्रह केला. पण त्यानें स्पष्ट नकार दिला."

मला यांतल कांहींच माहीत नव्हतं. आपला रात्री ९॥ वाजतां तंबूत तो हजर. मीं एकटाच होतों. मला म्हणाला. " अनंत. तुझी क्षमा मागायला आलों आहे मीं."

" कां रे बाबा ? "

" तुझ्यावर विनाकारण आळ घेतल्याबद्दल "

" पण तुझी खात्री पटली कां ? "

" अगदीं पूर्ण "

" मग पुन्हां असं बोलशील ? "

" मुळींच नाहीं "

" मग झालं तर—गुन्हा माफ "

अन् मग ज्या गप्पा रंगल्या त्या १ वाजेपर्यंत.

शुक्रवारी टोर देल ग्रेको या गांवीं गेलो होतो. बाकी ठीक.

तुझाच,

अनंत

# ३२

॥ श्री ॥

फ्लारेन्स—इटली
१६-९-४५

सुले,

मी मागच्या पत्रांत तुला कळवलं होतं. ह्याप्रमाणें आज येथें आलों. अंधळा मागतो एक डोळा अन् देव देतो दोन तसं झालं.

येथें यायला विमानाचं तिकिट मिळालं. ४॥ वाजतां मोटरनें नेपल्स-हून विमानगृहापाशीं आलो. विमान ६ वाजतां निघणार होतें. तिकिटें तपासलीं. सामान पाहिलं. वजन केलं. फक्त १७० पौंड भरलं. म्हटलं समजा ५ पौंड वजन देवाला दिलं, तर १६५ पौंड तर खरं !

५॥ वाजतां गडबड सुरू झाली. आमच्या फेरीचा नंबर पुकारला. प्रथम स्त्रियानंतर, त्रिन लष्करी व नंतर दर्जाप्रमाणें लष्करी अशा अनुक्रमानें नांवें उच्चारण्यांत आलीं. पण माझें नांवच नाहीं. मी चौकशी केली तर म्हणाला, ‘ तुझें नांव उच्चारलें कीं, ’ मग म्हटलं, ‘ मला

कसं ऐकूं आलं नाहीं ? ' विमानगृहाचें आवार विस्तीर्ण असल्यानें व विमानांची वरवर एकसारखी चालूं असल्यानें सर्वत्र दूरध्वनि प्रक्षेपक ठेवण्यांत आले आहेत. अन् तरी मला नांव कसं ऐकूं आलं नाहीं. अन शिवाय मी तर झोपीही गेलो नव्हतों. पण मला कसं कळणार ? माझं नांव कॅप्टन अनंत लिमये असं लिहिण्यांत आलं होतं. अन् त्यानें उच्चारलें " कॅप्टन अँट ". आतां या उंटाला अँट म्हटलं तर कसा अर्थ लावायचा बरं ? पण अखेर एकदांचा शिरलो विमानांत. पुढील संकटांना तोंड देण्यासाठीं लवंगा सुपारी ठेवलीच होती जवळ.

अखेर सहा वाजले. अन् विमानाचें दार बंद केलें. खूपच मोठं होतं हें विमान. २० माणसें बसण्याची व्यवस्था होती. पण आम्हीं १५ च लोक होतो. मग मशीन सुरू झालं. काय त्या मशीनचा आवाज ! जणूं कांहीं १० पिठाच्या गिरण्या एकदम चालूं झाल्या आहेत. अथवा, कांहीं बायका आपल्या नवऱ्याची हजेरी घेत आहेत !

मग विमान जमिनीवर पळूं लागलें. एंजिनवाल्यानें एंजिन खूप चढवलं अन् मग आम्हीं उडत गेलों.

विमानाच्या खिडक्या बैठकीच्या मागें असतात. विमान वर जातांना अन् खालीं उतरतांना कमरेभोंवतीं पट्टा बांधावा लागतो. विमान वर गेलें अन् मी बाहेर पाहूं लागलों. त्या देखाव्यांत खरंच 'जमीन अस्मानाचा' फरक होता. सूर्य उगवूं लागला होता. पण तें बिंब नेहमींप्रमाणें आकाशांत न दिसतां जमिनीवर दिसूं लागलें. जमिनीवरून व्हेसुव्हिअस पर्वताची बाजू दिसते. मधील खड्डा अथवा कढई दिसत नाहीं. ती कढई दिसूं लागली. डोंगर उंच दिसण्याऐवजीं ठेंगणें दिसूं लागले. फार पूर्वींच्या काळीं हिंदुस्थानांत एक मोठा पर्वत होता. तो कोणालाही ओलांडता येणें शक्य नव्हतं—पण त्या पर्वतापेक्षांही एका मोठ्या ऋषीनें तो पर्वत ओलांडला म्हणून त्या पर्वताला विंध्य पर्वत म्हणूं लागले—आज वैमानिकाच्या कृपेने मींही आल्पस् पर्वताला 'विंध्य' केलें.

शेतांची मजा तर औरच—झाडांच्या राईच्या एका बाजूला एक शेताचा लहानसा तुकडा होता. मारवाडी आपल्या डोक्याचें पाट काढतो ना ? तसें—तर चारी बाजूंना शेतें. व मध्यें झाडांची झुंड. मुंज्या मुलाच्या डोक्यावर मध्येंच घेरा ठेवतात ना तसा.

कांहीं शेतें काळसर. तर कांहीं पांढुरकी, तर कांहीं तांबडी, लांबवर पसरलीं होतीं. एक तळें होतें. त्याच्या भोंवतीं झाडं होतीं. एकाद्या फुल-पात्रांत बाजूला पानें लावून मध्येंच पाणी ठेवावें ना तशी आकृति दिसत होती. दिवाळींतल्या किल्ल्याप्रमाणें छोटीं छोटीं घरें अन् आग-गाड्या. प्रचंड रस्ते असून जणूं त्यांच्या पायवाटा झाल्या होत्या. अन् एवढ्या मोठ्या नद्या पण ओढ्यासारख्या भासत होत्या. मजेदार दिसत होतें. अग तुला सांगूं का अस्मादिक गलिव्हरच्या भूमिकेंतून लिलिपुट लोकांच्या सृष्टीचा आनंद लुटत होते.

मध्यंतरी आमचें विमान ढगांतून गेलें. माझ्या मागील खिडकीला एक छिद्र होतें. त्यांतून असा गारवा आला कीं काय सांगूं ? बुवा आइस्क्रीमवाल्याच्या दुकानांतील फॅमिली सर्कलमध्यें जातांना, आइस्क्रीम तयार होत असतांना कसा गार वारा येतो अन् हुडहुडतं. अगदीं तसं !

असा ५० मिनिटांचा प्रवास करून आमचं विमान खालीं उतरूं लागलं. अन् मीही अंतरिक्षाच्या त्या समाधींतून जडांत आलों. प्रथम झाडाचें शेंडे दिसूं लागले. अगदीं सपाट वाटणारी ती जमीन खडबडीत दिसूं लागली अन् मग जसं मऊ गादीवरून धप्पादिशी खालीं यावं, तसा भास झाला अन् आम्हीं रोममध्यें उतरलों. येथें विमानाचा व आमचा फराळ झाला व अर्ध्या तासानें आम्हीं पुढें निघालों. दोस तासांनीं म्हणजे ९॥ वाजतां आम्ही फ्लॉरेन्सला उतरलों. म्हणजे नेपलसहून ३ तासांत आम्हीं येऊन पोहोचलों. मोटारीनें दीड दिवस लागतो.

खालीं उतरतांना शाकुंतलांतील सातव्या अंकाची आठवण झाली. राक्षसांचा संहार करून इंद्रानें दिलेल्या रथांतून दुष्यंत खालीं उतरतो

आहे असा कथाभाग, अन् वर वर्णन केलेला प्रसंग त्याच पद्धतीनं कालिदासानं वर्णन केला आहे.

फ्लॉरेन्स आवडलं तर त्याचं वर्णन पुढील पत्रांत लिहीन. येथील एक्सेलाशिअर नांवाच्या हॉटेलांत राहाण्याची व्यवस्था आहे. पण तें पुढील पत्रीं.

मला पंचांग, उदबत्तीचे पुडे व पुस्तकें पाठव.

तुझाच,
*अन्ता*

## ३३

श्री

A. F. H. Q.
C. M. F.

सुले,

जपानचा सुद्धां—जय हो, परत यायचे विचार इतके मनांत घोळत आहेत कीं पराभव झाला लिहायच्या ऐवजीं 'परत आलो' असेंच लिहीलें. काय हें सांग. इ ऽ ऽ श्य !

गेल्या आठवड्यांतील महत्त्वाची बातमी म्हणजे 'जपानचा पराभव'. त्यासाठीं येथें व्ही. जे. डे (व्हिक्टरी ओव्हर जपान) पाळण्यांत आला. सकाळीं उत्तम ब्रेकफास्ट, दुपारीं बूफे लंच म्हणजे टेबलावर सगळे पदार्थ ठेवायचे अन् आपण आपल्या हातानें वाढून घ्यायचे. आय्. डी. मल-

होत्रानें आपल्याला दिले होतेना तसें. दुपारीं पोहोण्याचा कार्यक्रम अन् रात्रीं उत्तम डिनर. कोंबडी, रशियन बैलाची जीभ, फ्रेंच माशाचें काळीज वगैरे. खाल्लं बाई कसं तरी सगळं. मग आला मदिरापानाचा प्रवेश! मी पहिल्यापासून घाबरलोंच होतो. आमचा सर्व अधिकारी वर्ग तेथें होता—२ कर्नल, ३ मेजर अन् मध्यें मी. त्या लोकांनीं कट केला होता कीं, काय कोण जाणे. त्यांनीं एका ग्लासांत दारूचे दोन थेंब घातले अन् म्हणूं लागले ' लिमये नाहीं म्हणूं नको आमच्याकरितां एवढें पी. नाहींतर आमच्या गळ्याची शपथ आहे. अगदीं इंग्रजींत म्हणाले—ओथ ऑफ द नेक '. आतां आली पंचाइत. धर्म, कर्म, सगळ्या सबबी व कारणें सांगितलीं. पण ऐकेनात. आतां आली कां पंचाइत ! म्हणाले एवढा ग्लास संपव. एक घोट घे नाहीं तर आडवा पाडून नरड्यांत ओतूं. जपानची लढाई संपली होती सुलें. पण या लढ्याची रणशिंगें वाजूं लागलीं. सगळे हट्टाला पेटले. फ्रेड शेजारींच होता. त्याच्याकडून कांहीं प्रोत्साहन किंवा उत्साह मिळेना. जास्तच आग्रह. साले असे तर्र झाले होते ! बरं मधून उठून जातां येईना. शेवटीं केली गम्मत. त्या ग्लासांत दारूचे दोनच थेंब असल्यानें पाणी पांढरे स्वच्छ होते. मीही म्हटलें हे इतका आग्रह करतात ना ? मग नाहींच पिणार. प्रथम त्यांच्याकडून करार करून घेतला. कीं कांहींहि झालें तरी या ग्लासा नंतर पुन्हां आग्रह करणार नाहीं. Whatever happens after this glass we won't press you to drink more.

ग्लास हातांत घेतला अन् कोपरानें टेबलाला धक्का लावला. सर्व ग्लास पालथा. खालीं पडून तुकडे. मग ऐकेनात. म्हणाले असला चावटपणा नाहीं चालायचा. मी म्हटले—महाशय तुमचाच चावटपपणा नाहीं चालायचा ! मी प्यावें अशी परमेश्वराचीच इच्छा नाहीं, त्याला तुम्हीं काय करणार ! माफ करा म्हणावं. अखेर नाद सोडून दिला !

सुटलो ग बाई त्या दिव्यांतून. तंबूंत आल्यावर फ्रेड म्हणतो काय हलकट आहेस रे.

हो फ्रेडला मी मराठी शिकवूं लागलों आहे. कांहीं शब्द व त्यांचें अर्थ खालील प्रमाणें आहेत. सकाळीं प्रथम स्नेही भेटला कीं गुडमॉर्निंग ऐवजीं मराठींत ‘ साल्या ’ म्हणायचे, फ्रेड सकाळीं उठतो अन् म्हणतो–अनंत साल्या अन् मला असें हंसू येतें की बोलायची सोय नाहीं.

हलकट = मिस्टर

तूं पाजी आहेस = How do you do ?

पण हे शिकवतांना मला कोण गंभीरता धारण करावी लागते म्हणतेस. एक गोष्ट बरी आहे. येथें मराठी बोलणारे कोणी नाहीं म्हणून मला रान मोकळें आहे. फ्रेडचा मराठी शिकण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरूं आहे. मला फोन केला तरी, ‘ हॅलो अनंत साल्या ’ म्हणायला विसरत नाहीं तो.

आजच्या पत्रांत आणखी एक गंमत आहे. दोन न्यूझीलँडर सैनिक आमच्या बरोबर आले होते. व त्यांनीं आमचा फोटो घेतला होता. तो तुला पाठवीत आहे. माझा फोटो म्हणजे अगदीं ध्यान आहे की नाहीं ? डोळ्यावर ऊन येतच होतं. विजारीचा फुटका बुरुज झालाच आहे. हा फोटो बारी–नेपल्स रस्त्यावरील आहे. हें ठिकाण मोठें रमणीय आहे.

फ्रेडला तुझं पत्र दिलं. त्याला फारच आवडलं. त्यानें तुला न. सांगितलेत. कांहीं म्हण सुले, पण माझ्यापेक्षां तूंच जास्त चांगली पत्रं लिहीतेस. अन तोच तर माझा आनंद आहे. होय ना ?

तुझाच,

अन्ता

## ३४

श्री

कॅसर्टा
२२ सप्टेंबर १९४५

सुले,

मागच्या रविवारीं फ्लारेन्सहून लिहिलेलं पत्र मिळालं कां तुला ?

फ्लॉरेन्समध्यें एक्सेलाशिअर नांवाच्या हॉटेलांत उतरलों होतो. हें हॉटेल खूपच मोठें आहे. सुमारें ५०० खोल्या आहेत. खोलींत टेलिफोन तर आहेच पण ३ घंटा आहेत. चहासाठीं, एक मोलकरणीसाठीं अन् एक गड्यासाठीं. या तीन घंटांजवळ, त्या घंटा कशासाठीं आहेत हें दाखविणारीं चित्रें काढलीं आहेत. हॉटेलांत एक छोटेसें सिनेमागृह आहे. दररोज जेवणाच्यावेळीं बॅण्ड वाजत असतो.

संगमरवरी दगडांची रेलचेल आहे. खालच्या मोठ्या दिवाणखान्यांत अनेक छोटी दुकानें आहेत. एक बाई २ मिनिटांत काळ्या कागदावर चित्र कापते. माझें चित्र मीं काढून घेतलें तें पाठवीत आहे.

रविवारीं सकाळीं हॉटेलांत पोहोचलों व कामास सुरवात केली. जवळील एका डोंगरावरून फ्लॉरेन्सचा देखावा फारच रम्य दिसतो. शहराच्या मध्यभागीं आर्नो नदी वहात आहे. नदीवरील सर्व पूल जर्मनांनी जमीनदोस्त केले आहेत. कसीनो नांवाच्या एका बागेंत कोल्हापूरचे छत्रपति राजाराम महाराज यांचा मोठा पुतळा आहे. काळ्या दगडाचा १८७४ साली उभारलेला हा पुतळा प्रेक्षणीय आहे. त्याच रात्रीं मी येथील वाय्. एम्. सी. ए. मध्यें जेवणास गेलों. दहीभात प्रथम मिळाला. तेथें दोन बंगाली अधिकारी भेटल्यानें दुसऱ्या दिवशीं

सकाळीं पिसा येथील झुलता मनोरा पाहाण्यास गेलों. फ्लॉरेन्सहून पिसा ५० मैल आहे. रस्ता उत्तम आहे. मनोरा झुलता नसून कलता आहे. एकूण मजले ६ असून, २८६ पायऱ्या आहेत. डोंगराच्या उतारावरून जात असतांना जशी तोल जाण्याची भीति वाटते, तशी मनोरा चढतांना वाटते. वरून पिसा शहर छान दिसतें. पिसा येथें संगमरवरी दगडाची एक पावडरची डबी तुझ्यासाठीं घेतली आहे. डबीवर मनोऱ्याचें चित्र काढलें आहे. एक सुंदर ॲशट्रेही घेतला आहे.

येथें सिगारही छान मिळतात. म्हणून सिगार घेतले. तर ती बाई म्हणते—तुला फौजेंत सिगारेट नाहीत कां मिळत—मग कशाला घेतोस हे सिगार? मीं म्हटलं तुला ग काय करायच्या चांभार चौकश्या? हवें असलें तर दे'—मग तिनें सिगार दिले.

मंगळवारी सकाळीं येथील शेतकी कॉलेज पाहाण्यास गेलों होतो. गण्याची फार आठवण झाली. येथें मलिक नांवाचा एक मुसलमान गृहस्थ आमच्याकडे काम करतो. त्याची बायको युरोपियन आहे, त्याच्याकडे जेवण होतें.

दुपारी पिति पॅलेस नांवाचा राजवाडा पाहाण्यास गेलों. राजवाडा खूपच मोठा असून छान आहे. राणीचा एक महाल आहे. त्यांतील एका टेबलावर सगळ्या जगांतील संगमरवरी दगड बसविलेले आहेत. हिंदुस्थानांतील संगमरवरी दगड मध्यभागी आहे. भिंतीवर जागोजागी २० फूट लांबी रुंदीचे गालीचे टांगले असून त्यावर उत्तम कशिदा काम केलें आहे. एक पांढरा महाल आहे. सर्व पांढरें चकचकीत. या राजवाड्या शेजारीच फ्रेंच कलाकृतींचें प्रदर्शन उघडण्यांत आलेलें आहे. पण चित्रें आवडलीं नाहींत.

इटालियन लोक व्यापारी खरे. या प्रदर्शनांतील चित्रांची छाया चित्रें बाहेर विकायला ठेवलीं आहेत.

तेथून आम्हीं आधुनिक चित्रांचें प्रदर्शन पाहाण्यास गेलों पण अगदींच भिकार! तेथें एक पोरगी दिग्दर्शक (गाइड) होती. तिला मी म्हटलं काय ग, मायकेल अँजेलो, राफेल यांच्यासारखे महान कलाकार ज्या राष्ट्रांत निर्माण झाले, त्याच राष्ट्रांतले हे सध्यांचे चित्रकार इतके भिकार कां? फळें, गाढव, हत्ती असल्या देखाव्यांचें चित्रण करण्यांकडे त्यांचें लक्ष कां वेधलें जावें? तिनें उडवा उडवीची उत्तरें देण्यास सुरवात केली. सध्यांची प्रवृत्ति अभिनव आहे, लोकांच्या प्रवृत्ती बदलतात, वर्ण्य विषय अधिक व्यवहारी होत आहेत. वगैरे—पण मला तें पटलें नाहीं. मीं म्हणालों—" माझें असें मत आहे की ज्या राष्ट्रांत पूर्वीच्या काळांत नामवंत कलाकार होऊन गेले, त्यांनी आपल्यापुढें ठेवलेले आदर्श इतके उत्तम आहेत, कीं त्यांच्या पलिकडे जाणें अशक्य आहे असें अलिकडील पिढ्यांना वाटूं लागलें अन् त्यांच्याकडून नवीन व भरीव अशा कलाकृति निर्माण होतच नाहींत. त्यांचे डोळे दिपून जातात त्या कलाकृति पाहून. मी तिला ग्रीस, इजिप्त व हिंदुस्थान यांची उदाहरणें दिली.

एकूण मला फ्लॉरेन्स फारसं आवडलं नाहीं. अगोदर एकटं वाटत होतं. तुझी आठवण येत होती. शहर जर्मनांनी उध्वस्त केलें आहे. अखेर रात्री खोलींत यावें अन् आकाशांतील चन्द्राकडे अन् आर्नो नदींत पडलेल्या त्याच्या प्रतिबिंबाकडे बघावं असा कार्यक्रम चालूं होता.

येतांना फ्लॉरेन्स पासून रोमपर्यंत विमान थोडेसें लागलें. रोम नेपल्स प्रवास छान झाला.

रविवार २३ तारखेस मी मिलानला जात आहे (अर्थात विमानानें). २४, २५ जिनोव्हा, २६–२७ फोरली, २८–२९ मिलानमध्यें विश्रांति ३० ते ४ व्हेनिस व मग कॅसर्टा. १५ तारखेला ग्रीसचा दौरा करण्याचा विचार आहे. त्यामुळें पत्रें कदाचित् त्रोटक येतील तुला.

तुझा,
अनंत

## ३५

॥ श्री ॥

मिलान ( इटली )
२४-९-४५

सुले,

काल सकाळीं नेपल्सहून निघालों. १० वाजतां दुपारचं जेवण रोम-मध्यें करून, चहाला मिलान मध्यें हजर. अर्थात हा प्रवास विमानानेंच झाला. काल संध्याकाळीं टूरिस्मो नांवाच्या एका सुंदर हॉटेलांत उतरलों होतो. खाली मोटार उभी आहे. मी जिनोव्हाला निघालो आहे. अत्यंत गर्दीत आहे.

मिलान हें एक अत्यंत उत्तम शहर आहे. बर्फाचे पर्वत दिसत आहेत आजूबाजूला. थंडी पडली आहे. बॅटलड्रेस चढवला आहे. आतां पत्र वाचतांना तुला इटलीचा नकाशा उघडावा लागेल.

तुझाच,
*अन्ता*

## ३६

श्री

ऑस्टेरिया हॉटेल,
जिनोव्हा—इटली
२५ सप्टेंबर ४५

सुले,

काल आम्हीं मिलानहून निघालों. मुसोलिनीचा वध मिलानच्या पलि-कडे असलेल्या कोमो नांवाच्या सरोवराजवळील एका खेड्यांत करण्यांत

आला. त्यानंतर त्याचें प्रेत मिलानमध्यें आणण्यांत आलें. दोस्त राष्ट्रां-विरुद्ध जर्मनीला मदत केल्याबद्दल लोक अतिशय संतापले होते. एका चौकांत त्याचें प्रेत ठेवण्यांत आलें. त्याच्या बरोबर त्याची प्रेयसीही बळी पडली. लोकांनीं त्याच्या बद्दलचा आपला द्वेष व्यक्त केला. कोणी लाथा मारल्या, कोणी थुंकलें, अन् अखेर एका अज्ञात स्थळीं प्रेत नेण्यांत आलें. ज्या शहरांत तो मान सन्मानानें मिरवला; तेथें त्याची मानहानी करण्यांत आली. हा कालमहिमा नाही कां ? तो चौक आम्ही पाहिला अन् पुढें निघालों.

मिलान जिनोव्हा रस्ता फारच छान आहे. रस्त्याच्या दोहों बाजूंना कालवे आहेत, पण ते फार अरुंद आहेत. बोटींची वल्ही मारण्यास जागा नाहीं म्हणून बोटींना बैल जोडतात. बोटींच्या पुढील बाजूंना एक मोठा दोर बांधलेला असतो. तो बैलाच्या गळ्यांतील दाव्याला बांधतात. काल-व्याच्या बाजूला असलेल्या पायरस्त्यावरून बैल चालतात व कालव्यांतील बोट ओढतात. या योजनेंत मानवाची कल्पकता कीं माणुसकीचा अभाव यांचा विचार करीत असतांच मोटार पुढें चालूं लागली.

मिलान येथें सफरचंदें अत्यंत उत्तम मिळतात. खूप खाल्ली. चेस्टनट नांवाची फळेंही मिळालीं.

जिनोव्हा शहर फारच उत्तम आहे. पण बॉम्ब वर्षावामुळें उध्वस्त झालें आहे. ऑस्टेरिया हॉटेल समुद्र किनाऱ्याजवळ आहे. शांततेच्या काळांत या हॉटेलचा रोजचा दर १५ रु. असतो. पण आम्हांला फक्त १२॥ आणे आहे.

सकाळीं ८ ते १२ काम केलें. अन् दुपारीं शहर पाहाण्यास निघालों. जगप्रख्यात कोलंबसाचें घर, चार्लस डिकन्सचें घर वगैरे ठिकाणें पाहिलीं. एक चर्चही पाहिलें. ३०० वर्षांपूर्वींचे जुनें दोन पुतळेही दृष्टीस पडले. एका पलटणींत जेवावयास गेलों तों तेथें एक महाराष्ट्रीयन डॉक्टर

माझी वाट पहात आहेतसें समजलें. बघतो तो बडोद्याचे डॉ. शारंगपाणी. मग गप्पा सुरू झाल्या त्या रात्रीं १२॥ पर्यंत. अन् मग घरीं.

आम्हीं आतां इटलीच्या पश्चिम किनाऱ्यावर आहोंत. रात्रीं आम्हीं पूर्वेकडे रिमिनी येथें जाणार. पुढील पत्र व्हेनिसहून.

तुझाच,
*अन्ता*

# ३७

श्री

वोलोना—इटली
२७ सप्टेंबर १९४५

सुले,

कमाल आहे कीं नाहीं आतां! पण मी ठरविलें आहे. कीं दौऱ्यावर असतांना खूपशीं पत्रें पाठवायचीं. अनेक गोष्टी पहायला मिळतात. अन् त्यांची नंतर आठवण रहात नाहीं. बरं इतके दिवस डायरींत या सर्व गोष्टींची नोंद होत असे, पण तीही हरवली. तेव्हां विचार असा केला कीं, पत्रानें तुलाच सर्व पाठवून द्यावें.

डायरींत मी सर्व बऱ्यावाईट गोष्टी लिहीत असे. मनुष्याचें मन फार चमत्कारिक आहे. चांगले विचार जसे मनांत येतात तसे पाजीपणाचे विचारही मनुष्याचें मन कलुषित केल्याशिवाय रहात नाहींत. गेले दोन

दिवस मनांत विचार आला कीं एवढा मी इटलींत आलों तर एकाद्या इटालियन मुलीचा उपभोग कां घेऊं नये.—अर्थात् दुसऱ्या क्षणींच अशा विचारांना मनांत प्रवेश करूं दिल्याबद्दल मनाला मी फैलावर घेतों. ही गोष्ट निराळीं. पण असे मनांत येतात विचार. तुझें प्रेम अत्यंत उज्ज्वल अन् सात्विक असल्यानें हे विचार तावडतोब वितळतात हेंहि तितकंच खरं.

काल रात्रींचीच गोष्ट बघ ना ! डॉ. शारंगपाणी माझ्या खोलींत गप्पा मारायला आले होते. ते परत जायला निघाले. आमच्या हॉटेलचा मॅनेजर त्याच बाजूला जायचा होता. म्हणून शारंगपाणी त्याला आपल्याबरोबर घेऊन गेले. आम्ही शहाणपणानें ही गोष्ट इटालियन भाषेंत हॉटेलच्या दुसऱ्या माणसाला सांगायला गेलों. इटालियन भाषेंत पुरुषाला सिनॉर व अविवाहित मुलीला सिनोरीना म्हणतात. आम्ही सांगणारे अन् ते चिरंजीव ऐकणारे—आमचे वक्तव्य ऐकून त्यांची अशी कल्पना झाली कीं मला 'मुलगी' पाहिजे. वेळ रात्री १२॥ ची—त्यानें नकार दर्शविला अन् तोंड वेडेंवांकडें केलें. मुद्रा गंभीर झाली. कांहीं तरी 'विनोद' निर्माण झाला असावा अशी मला लगेच शंका आली. पण त्याला इंग्रजी अजिबात येत नसल्यानें आणि इटालियन भाषेंत आणखी तारे तोडण्याचें धाडस माझ्याकडून न करविल्या गेल्याकारणानें भलताच पेंचप्रसंग निर्माण झाला. त्याच वेळीं आणखी एक अधिकारी आला. लगेच माझ्याकडे बोट दाखवून त्यानें एरंडेल प्यायल्यासारखें तोंड केलें. या अधिकाऱ्याला इटालियन येत होतें. म्हणून मी त्याला म्हटलें कीं, 'बाबारे तुझ्या मित्राला त्याच्या घरापर्यंत पोहोचविण्याची मी व्यवस्था केली' असें इटालियन भाषेंत सांगण्याचा मी प्रयत्न केला. पण तो अयशस्वी झाला असावा, असें त्याच्या मुद्रेवरून मला वाटत आहे. तेव्हां माझी भूमिका तूं स्पष्ट कर. त्यानें त्याप्रमाणें करतांच आमच्या या हॉटेलवाल्या स्नेह्याचें आतांपावेतों चिमणीएवढें झालेलें तोंड हत्तीएवढें फुललें अन् मला बास्केट फुल थँक्स अन् कार्टलोड ऑफ अपॉलॉजीज् मिळाल्या. आतां या कर्माला काय करणार तूंच सांग.

असो, सकाळीं जिनोव्हाला न्याहारी करून दुपारीं मिलानला आलों अन् जेवण करून रात्रींच्या जेवणाच्या वेळीं बोलोनला पोहोंचलो. येथें बॅगलोनिया नांवाच्या एका राजेशाही हॉटेलांत मुक्काम आहे. मिलानहून बाहेर पडतांच डाव्या हातास मुसोलिनीला जेथें प्रत्यक्ष ठार मारण्यांत आलें ती जागा आहे. हा एक जुना तबेला होता. त्याच्या टपावर डोळे बांधून त्याला व त्याच्या प्रेयसीला उभें करण्यांत आलें. अन् ' फायर ' असा हुकूम मिळतांच त्या दोघांवर बंदुकीची फैर झडली. मुसोलिनी स्वित्झरलँडमध्यें पळून जात असतां मिलानजवळ देशभक्तांच्या हातीं लागला. अन् तावडतोब त्याची चौकशी होऊन देहांत शासनाची शिक्षा त्याला फर्माविण्यांत आली. या प्रसंगाची बातमी व फोटो तुला तेथें पहायला मिळाले असतीलच. मरणापूर्वीं मुसोलिनीनें जगण्याची खूप खटपट केली. ' मी सत्तेचा त्याग करीन, ' ' मला वाटलें तर जन्मभर कैदेंत ठेवा ' अशीं आश्वासनें व विनवण्या त्यानें केल्या म्हणे. पण तीं आश्वासनें व त्या विनवण्या व्यर्थ ठरल्या. अक्षपक्षाच्या नादीं लागून एका देशाचें वाटोळें करणाऱ्या माणसाचें कोण ऐकणार ? आज तो तबेला तेथें उभा आहे, ती भिंत जागेवर आहे, तेथील रक्त वाळलें असलें तरी स्मृति ताजी आहे. अन् अपराध्याला योग्य तें शासन केल्याचें समाधान लोकांस लाभलें आहे.

सुले, हें दृश्य पाहिल्यावर मनांत विचारांचा कल्लोळ उडाला. नारायणराव पेशव्यांवर गारद्यांच्या तलवारी चालण्यापूर्वीं त्यानें अशाच विनवण्या केल्या होत्या. पण भर दरबारांत मारलेल्या थोबाडीचा सूड उगवण्यासाठीं तुळ्या पवारासारखा हुजऱ्या देखील त्या आश्वासनांना वळला नाहीं, तर मुसोलिनीच्या अनेक हालअपेष्टा सोसलेले देशभक्त कां वळतील ?

मानवी आयुष्य किती क्षणभंगूर आहे नाहीं ? कालाचा महिमा किती अलौकिक आहे नाहीं ? उसळलेला डोंब किती जळजळीत आहे नाहीं?

क्षणभर मला वाटलं ' बिचारा ' ! पण बिचारा कसला ? त्यानें

बुद्धिपुरस्सर ज्या गोष्टी केल्या, त्याचें फळ त्याला मिळालें. करावें तसें भरावें !

जर्मनीच्या नादीं लागल्यानें इटलीचे अपरिमित नुकसान झालें आहे. आम्ही प्रसिद्ध ‘ पो ’ नदी आज दोनदां ओलांडली. पण दोन्ही ठिकाणचे पूल उडविले गेले आहेत. अन् ते पूल उडविणाऱ्या चिलखती गाड्या शेजारीच वाळवंटांत गंजून पडल्या आहेत. फ्लॉरेन्स, जिनोव्हा, मिलान सारखी सौंदर्य स्थळें स्मशानवत् झाली आहेत. अन् अशा सौंदर्यस्थळांना स्मशानवत् बनविणाऱ्या तोफा इतस्ततः विखुरल्या आहेत. त्या तोफा चालविणारांच्या अस्थिही त्याच स्मशानांत बहुधा पडल्या असाव्यात.

सुले, एक अथवा दोन माणसांच्या ‘ पाशवी ’ इच्छाशक्तीनें, जगाचें, संस्कृतीचें, मानव्यतेचें इतके कां नुकसान व्हावें ?

पण हा विचार चालूं असतांनाच अनेक स्त्रीपुरुषांचे थवे, गप्पा मारीत हंसत खेळत जातांना दिसले. या विभागांत सायकलींचा फारच सुकाळ आहे. तरुण जोडपें सायकलवरून जातांना पाहून आपल्या पूर्वायुष्याची आठवण आली. पण हाही विचार फार वेळ टिकला नाहीं. कारण हंसूं आलें—एक पाद्रीबुवा सायकलीवरून चालले होते—पाद्र्याचा झगा फारच पायघोळ असतो. अगदीं इरकली लुगड्यासारखा. तेव्हां तो झगा सायकलींत अथवा स्पोकमध्यें अडकणार नाहीं कां ? क्लिप लावायची सोय नाहीं कारण त्यांचा मक्ता आधुनिक स्त्रियांनीं घेतलेला. पण पाद्रीबुवांचा मेंदू बायबल वाचून तल्लख झालेला दिसला. कारण लेडीज बायसिकलला मागील बाजूस जशा दोऱ्या बांधलेल्या असतात, तशा दोऱ्या त्यांनीं बांधल्या होत्या. कामांत काम अन् रामांत नाम. द्वादशीच्या दिवशीं जावयाला जेवायला बोलावण्यापैकीं प्रकार ! सासूबाईही खूष अन् ब्राह्मण भोजनाचें पुण्य !

असा विचार चालू असतां चहाची आठवण झाली. एका इटालियन घरापाशीं गाडी थांबली. हॉटेल होतें तें. चहाची चौकशी केली. म्हातारीनें चहा दिला. पण पैसे देऊं लागलों तर नको म्हणाली. हिंदी लोकांबद्दल इटालियनांना फार आदर वाटतो. अखेर तिला मिले ग्रात्सी ( मेनी थँक्स Many Thanks ) देऊन आमच्या स्वाऱ्या पुढें सटकल्या. ही गोष्ट महत्त्वाची आहे बरं का—कांहींहीं लिहीण्याजोगं अथवा न लिहीण्याजोगं न होतां आम्ही बोलोनला पोहोचलो. तेव्हां गाडीला येथें विश्रांति.

तुझाच,

*अन्ता*

## ३८

॥ श्री ॥

व्हेनिस—इटली.
२९ सप्टेंबर १९४५

*सुले,*

कालव्याचं शहर म्हणून जगांत प्रसिद्ध असलेल्या व्हेनिस मधून आजच हें पत्र आहे. माझं बोलोनचं पत्र मिळालं कां तुला ?

बोलोनला एक इटालियन सर्कस पाहाण्यास गेलो होतो. आपली सर्कशीची कल्पना म्हणजे वाघ सिंह वगैरे जनावरें—पण या सर्कशींत एकच होतें; तें म्हणजे गाढव—अन् शिवाय एक बदक पण होतें. बँडच्या गाण्यांत,—योग्य वेळीं, आपल्याकडे तबलजी जसा समेवर आला

कीं थाप मारतो त्या प्रमाणें तें बद्क आवाज करीत असे. जवळच एक प्रदर्शन होतें. त्यांत निरनिराळ्या रोगांची प्रत्यक्षिकें दाखविण्यांत आली होती. शेजारीच अनेक तऱ्हेचे आरसे ठेवण्यांत आले होते.. त्यांत प्रत्येकाची चित्र विचित्र रूपें दिसत. एका आरशांत मी फक्त १॥ फूट उंच होतो. त्याच्या शेजारीच एक भविष्य सांगणारें यंत्र होतें. तुम्ही त्यांत नाणें टाकलं कीं एका विशिष्ट तबकडीवर उजेड पडे. मी ही प्रयोग केला. ' फॉरतूनाते ल अमोरा ' अशीं अक्षरें निघालीं. ' प्रेमांत तूं फार भाग्यवान आहेस ' असें भाषांतर.

अन् सुले, खरंच मी भाग्यवान आहे. भोंवताली मोहाचे पाश किती पडलेले आहेत याची संपूर्ण कल्पना तुला येणें शक्य नाहीं. आजूबाजूला पुष्कळ उदाहरणें आहेत. पण सुले, शप्पथ घेऊन सांगतो कीं या क्षणापर्यंत दारू आणि स्त्री यांपासून अलिप्त आहे. अगदीं पूर्णपणें अलिप्त आहे. तुझ्या आत्मिक बलानें मी सुखरूप आहे. तूं म्हणशील नेहमीं नेहमीं कशाला तेंच तेंच लिहीतोस. पण खरं सांगू मला नेहेमीं भीति वाटे कीं आपलं पाऊल वाकडं पडेल किंवा काय ? पडणार नाहीं ही खात्री आहे, पण मला माझें मन अत्यंत खंबीर करावें लागतें. त्यांत मला यश येतें. निष्कलंक राहण्याची प्रतिज्ञा मी केलीच आहे. पण सुले, मनांत विचार येतात. दुःखाला डोळ्यावाटे वाव दिल्यावर दुःखिताचं मन जसं हलकं होतं तसें मनांतलें बरे वाईट विचार तुला लिहिले कीं मला धीर येतो. म्हणून मी लिहितो. स्वतःच्या घरी सदाशिव पेठेंत नोकरीला जातांना स्वत.च्या बायकोला ' जातो ' म्हणून सांगून जाणें. अन् ५ वाजतां घरी परत येतांना पत्नी सुंदर कपडे करून हंसत मुखानें चहाचा कप पुढें करते तो उपभोग घेऊन मग नीतिमत्तेच्या गप्पा मारणं सोपं आहे. पण सुले अशा परिस्थितींत मात्र त्रास होतो हो.

असो, काल सकाळीं आम्हीं बोलोनहून निघालों. अन् फोरली, रिमिनी वगैरे ठिकाणीं काम करून, रिचिओनो या ठिकाणीं मुक्कामाला

आलों. अन् आज सकाळीं ८॥ ला निघालों. वाटेंत सर्व भाग उध्वस्त झालेला आहे. सुंदर इमारती नष्ट झाल्या आहेत अन् लोक भ्रष्ट झाले आहेत. चांगला कपडा असावा अन् त्यावर कुणीतरी रंगपंचमीची पिचकारी उडवावी, सुंदर मुखकमल असावें पण त्यावर थोड्याच दिवसांत देवीचे वण दिसावेत असें मला हा भाग पाहून वाटलें. तारेचे खांब मोडलेले. पूल उडविलेले, घराच्या खिडक्या, जिने अन् दारें एकाद्या महालाच्या आधारानें लोंबकळत असतात.

तरीपण पाऊस पडून हवेंत गारठा यावा, अन् मग ऊन्हाची एक तिरीप येऊन तो गारठा नाहींसा व्हावा; मन प्रसन्न व्हावें, हुषारी वाटावी असें व्हेनिस पाहून मला वाटलें.

पाडुआ–व्हेनिस रस्ता नितांत रमणीय आहे. समुद्राप्रमाणें आकाशही निळें दिसत होतें. अन् अस्ताला जाणाऱ्या त्या सूर्याला शेवटचा अर्घ्य देण्यासाठीं सर्व सृष्टि सज्ज झाली होती. मानेवर कांटा ठेवून आपले कर्तव्य पार पाडणाऱ्या त्या दिवसाच्या राजाला, रात्रीचा दिवस करणाऱ्या त्या कर्तृत्ववान अन् पराक्रमी पुरुषाला, मानाचा निरोप देणें योग्य नाहीं कां ! अन् साधारण जनतेच्या मानानें तो जरी अस्तास चाललेला असला, तरी त्याचें तें अस्तास जाणें, अन् मावळणें, संध्याराणीला उदय अन् प्रकाश नव्हता कां !

म्हणून या राजाला, मानाचा मुजरा करण्यासाठीं सारी सृष्टी सज्ज झाली होती. द्राक्षें काळीं खरी पण किती तेजस्वी; शेतें ‘हिरवट’ खरीं पण किती आकर्षक, सूर्यकमळें पिवळीं खरीं पण किती प्रेमळ, शेतांतली कणसें करडी खरी पण किती दळदार. सुले, त्या सूर्याची स्थिति मोठी केविलवाणी झाली होती. हें वैभव टाकून जाणें, हा राज्य-त्याग करून जाणें त्याच्या खासच जिवावर येत होतें, कारण तो रेंगाळत होता. पण संध्याराणी किती उत्सुकतेनें त्याची वाट पहात होती. तांबडा शालू नेसून त्यावर निळा अस्मानी ब्लाऊज घालून आपल्या तारागणांच्या-

सह, पायांतले नुपूर रुणझुण वाजवीत, आपल्या कटाक्षानें, किती उत्कटतेनें ती त्याची वाट पहात होती. येथें राहावें कीं संध्याराणीकडे जावें, केवढा हा डावपेच, केवढें हें कोडें ! पण तो थोडाच स्वतःचा मालक होता.

पण संध्याराणी सबबी ऐकायला कुठें तयार होती. ती म्हणाली, 'राजा, मला काय सांगतोस या गोष्टी ? मी एवढं तुझ्या स्वागतासाठीं जिवाचं रान केलं, हृदयांतला मेवा, विचारांचा मेवा तुझ्यासाठीं केला, तुला रस्ता दिसावा म्हणून तारकांच्या मशाली जागोजाग लावल्या. चंद्राला हातांत कंदील घेऊन तुझ्या रस्त्यावर धाडलं, मृगशीर्षाचं वाहन तुला आणण्यासाठीं पाठवलं, सप्तर्षींना भाट बनवून तुझी स्तुतिस्त्रोत्रं गाण्यासाठीं पाठवलं, विशाखा, अनुराधा या माझ्या दासींना तुला प्रेमाचा संदेश घेऊन पाठवलं, चन्द्रकमळाच्या कमानी तुझ्या स्वागतासाठीं उभारल्या, चन्द्रकान्त मण्यांच्या पाणपोई जागोजाग उघडल्या, माझ्या घराचा पत्ता दुरून लागावा म्हणून शुक्राला अहोरात्र पाहाऱ्यावर ठेवलं. मला काय सांगतोस गोष्टी !

सूर्याचं मन द्विधा झालं. कर्तव्य कीं प्रेम हा मोठाच पेचप्रसंग त्याच्यापुढें उभा राहिला. पण त्याला एक जम्मत माहीत होती. संध्याराणी त्याच्यावर रागावली असली तरी तो राग खोटा होता. तो प्रेमळ होता. आकाशगंगेंतून अमृताचे कुंभ आपल्या घरांत आणतांना, आकाशी रंगाचा चंदेरी गालिच्या दिवाणखान्यांत ठेवतांना, तारकांचे विद्युद्दीप लावतांना, प्रेमाची शेज सजवितांना तिची कोण धांदल उडत होती. वास्तविक तिच्या हृदयाप्रमाणें तिच्या घरांतहि अंधेरच होता. पण तिच्या डोळ्यांतून सौंदर्य नितळत होतें. प्रेमाच्या कल्पनेनें तिचं वक्षःस्थळ हलत होतं. वाऱ्यानें उडलेला पदर सांवरीत असतांनाचा भावनांची झालेली खळबळ तिला समजत होती. तिनं सूर्य येईतों कांहीं खालं नव्हतें कीं प्यायलं नव्हतं. मौक्तिकांचं आणलेलं जेवण तिनें आपल्या मैनेला दिलं होतं. तिच्यासाठीं मुद्दाम आणलेलं गंगाजल तिनें आपल्या बगीच्यांत शिंपडलं होतं. तिची तहान प्रेमाची होती. वाळ्याचं पाणीहि तिला कढत लागत होतं. तिच्या

कानांत कुंडलं होतीं. तींही तिनें काढून फेंकून दिलीं.——लोक म्हणाले—पहा हे नवे तारे उदयास आले. पण तीं कुंडलं तिला सूर्यानें दिलेली होती. म्हणून तिनें ती पुन्हां घातली. लोक म्हणाले, "धूमकेतूचा अस्त झाला." तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. सूर्याच्या विरहानं तिच्या डोळ्यांत अश्रू आलें. लोकांना ते अश्रु दंवबिंदु वाटले. थकून तिला डुकली आली. इतक्यांत तिच्या कानावर सूर्याच्या त्या परिचित वाहनांचा आवाज आला. त्या क्षणिक स्वप्नांतून ती जागी झाली.

अन् मींही जागा झालों. कारण सुले, माझंहि ते स्वप्नच होतं. मोटारचा तोच परिचित आवाज माझ्या कानांत शिरत होता.

——आम्ही व्हेनिसमध्यें शिरत होतो.

सुले, इटलीच्या पूर्व किनाऱ्यावर उत्तरेकडे ॲड्रिआटिक समुद्रांत जमिनीच्या जवळच पण समुद्रांत— १७७ लहान बेटांचा एक समूह आहे. या समूहालाच व्हेनिस म्हणतात. या बेटांत समुद्राच्या १५० अगदीं लहान लहान खाडया आहेत. त्यांना व्हेनिसमधील कालवे म्हणतात. ही बेटें सुमारें ४८० पुलांनीं एकमेकांस जोडली आहेत. अन् या पुलांखालून दररोज सुमारें ६०० लहान मोठया होडया जात असतात. त्यांना गोंडोला म्हणतात. उत्तम इमारती, सौंदर्य अन् निसर्गाची ही विचित्र लीला यांसाठीं व्हेनिस प्रसिद्ध आहे. आपण जशा जाण्यायेण्यासाठीं सायकली वापरतो तसे हे लोक बोटी वापरतात. मंडईसाठीं, सभा—संमेलनासाठीं, कचेरींत जाण्यासाठीं अन् हळदीकुंकवासाठीं लोक बोटी वापरतात.

भाजीवाल्यांचे गाळे, दुकानदारांची दुकानें पाण्यांतून डुलत डुलत जातात. असें हें शहर आहे. सुंदर हॉटेले आहेत अन् जलदुर्गांप्रमाणें, ही हॉटेले पाण्यानें वेढलेलीं आहेत. मी ग्रँड हॉटेल नांवाच्या एका राजेशाही हॉटेलांतील १६१ नं. च्या खोलींत बसून हें पत्र लिहीत आहे. सायंकाळीं जेवण झाल्यानंतर शतपावली करण्यासाठीं गोंडोलांत बसून चक्कर

मारून आलों. एका तासाचे ३ रु. घेतलेन त्यानें. पण ब्रिज ऑफ साइज ( Bridge of Sighs ) अन् टॉवर ऑफ हॅपिनेस ( Tower of Happiness ) वगैरे स्थळें पाहिलीं.

सुले, माझ्या या पत्रांवरून मीं कांहीहीं काम न करतां उगीच येथून तेथें उनाडक्या करीत आहे असा तुझा समज होईल. पण तो चुकीचा आहे बरं कां. सकाळीं ८ ते १२ अन् दुपारी २–५ काम अन् मग बाकीचे उद्योग.

शिवाय तुला मोठ्या पत्रांची चटक लावून ठेवली आहे. तेव्हां लिहिणंच भाग आहे. खरं ना ?

तुझाच,
*अनंत*

## ३९

॥ श्री ॥

विजयादशमी
१६ आक्टोबर ४५

सुले,

आज विजयादशमी आहे हें विसरून गेलो होतो. पण सकाळी एका अधिकाऱ्यानें दसऱ्यानिमित्त फोन वरून अभिनंदन केलें तेव्हां लक्षांत

आलं की आज दसरा आहे. आज रात्रीं आमच्या बॅटमनच्या कॅंपांत दसऱ्याचें जेवण आहे अन् मला अर्थात आमंत्रण आहेच.

येथील काम किती विविध प्रकारचें असतें याचें तुला एक उदाहरण देतो. मघाशीं हॉस्पिटलमधून फोन आला. एक रशियन मुसलमान येथें मृत्युमुखीं पडला आहे. कुणातरी मुसलमानाकडून कुराणाचा पाठ ऐकावा अशी त्याची इच्छा. डॉक्टरनें मला विचारलें कुणी मुसलमान आहे कां? एक मुसलमान ड्रायव्हर भेटला. पण त्याला रशियनच काय पण इंग्रजी सुद्धां येत नाहीं! अखेर धांवपळ-(अर्थात फोन वर) करून एका कारकुनाला तो मुसलमान असल्यामुळें पाठवून देण्याची व्यवस्था केली. पण १० मिनिटांत पुन्हां फोन-कीं कारकुनाजवळ कुराण नाहीं. आतां काय करणार! अखेर एक प्रत मिळवून त्याच्या हातांत कोंबली अन् त्याला धाडलें.-आहे कीं नाहीं गम्मत!

तुझ्याकडे आज काय गोड केलं होतं. आज सिनेमाला गेलों होतों. आलबर्ट व कॅस्टेलो इन् हॉलिवुड नांवाचा चित्रपट होता. दामुआण्णा मालवणकर छाप विनोद. हिंदी चित्रपटांत असा प्रसंग असता तर वर्तमान पत्रांचे शेकडों रकाने त्यावर टीका करण्यांत खर्च झाले असते.

आज दुपारीं आमच्या कचेरींत काम करणाऱ्या मुलींनी मला प्रश्न विचारला की "गोऱ्या मुलीं बद्दल तुमचे काय मत आहे?" प्रथम मी त्यांना सरळ जबाब दिला की आजपर्यंत कोणत्याही गोऱ्या मुलीशीं माझा निकटचा असा संबंध आला नाहीं, त्यामुळें मी मत देऊ शकत नाही. पण ऑफिसमध्यें काम करण्या ऐवजी त्या जास्त गप्पा मारतात असें वाटतें. नेली वेळ मारून झालं.

पान खाण्याची तल्लफ फार आली आहे. असो सर्वत्रास नं.

तुझाच,

*अन्ता*

# ४०

॥ श्री ॥

कॅसर्टा
१ नोव्हेंबर १९४५

सुले,

येथील सर्व कार्यक्रम चांगला आहे. परन्तु माझें येणें मात्र लांबणीवर पडलें. मी जी. एच् क्यू मध्यें असल्यानें येथील सर्व फौजा गेल्यानंतर कचेरी बंद करून येणार. शिवाय बाकीचे अधिकारी २।२ वर्षें येथें राहिलें असल्यानें त्यांचा हक्क माझ्या आधी आहे.

येथील एका अधिकाऱ्यानें मला बराथिया सूट दिला. मसग्रूव्ह म्हणतो तूं हा घालूं नकोस. तुला दृष्ट लागेल. पोरी भाळतील तुझ्यावर. काय ग ! मसग्रूव्हचें तुला पत्र आलें होतें कां ? तो तर मला म्हणाला "मी तुझ्या घरीं पत्र लिहीलं आहे अन् त्यांत तुझी भरपूर नालस्ती केली आहे." मी म्हटलं लिहीनास कां, त्या पत्रांच चांगलं खमंग असं उत्तर येईल.

अग मी इतके चित्रपट पाहातों कीं त्यांची कथानकें लिहूं लागलों तर आमच्या कचेरींतील सर्व कागद खलास होतील. म्हणून लिहीत नाहीं. तूं "अर्ध्या वाटेवर' नाटकाबद्दल लिहीलेस पण हा प्रकार अमेरिकेंत प्रत्यक्ष घडला आहे. एका सैनिकाची मृत्यूची नोंद सरकारांत होती—पुढें तो जिवंत सांपडला पण सरकार कांहीं त्याला पगार देईना, अखेर अंगावरील खाणा खुणा पटवून मी जिवंत आहे हें त्याला पटवावें लागलें. दुसऱ्या एका बाईनें आपला पति मृत्यु पावल्याचें समजतांच दुसऱ्याशीं लग्न केलं. पुढं हा नवरा परत आला. पण नवरा नं. २ कांहीं आपल्या

बायकोला परत देईना. अखेर खटला होऊन प्रकरण मिटलें अन् सवत्स धेनु नवरा नं. १ च्या घरीं आली.

गेल्या महायुद्धांतली गोष्ट आहे. बरेंच लोक युद्धाच्या सुरवातीस वाङ्‌निश्चित होते. पण लग्न होण्याच्या आधींच त्यांना युद्धावर जावें लागलें. विवाह सहवासोत्तर होता. अन् तो सहवास अधिकाधिक उठून दिसूं लागला. अशी शेकडों उदाहरणें आहेत. हें उत्पादन प्रचलित कायद्याप्रमाणें अनौरस ठरत होतें. अखेर पार्लमेंटला खास कायदा पास करून त्या बालकांना औरसत्व द्यावें लागलें. तुला जळके बी. ए. माहीत आहेत कीं नाहीं? मुंबई विश्वविद्यालयाच्या कचेरीला एकदां आग लागली अन् बी. ए. चे सर्व पेपर जळून गेलें. अखेर सहामाहीचे निकाल गोळा करून रिझल्ट लावला. तसलाच हा प्रकार.

पुरे झाल्या गप्पा. तुला काय? दिवाळी आनंदांत घालवा. मलाही हिंदी कँपांत दिवाळीचं आमंत्रण आहे.

तुझाच,
*अनंत*

## ४१

॥ श्री ॥

कॅसर्टा
१४।११।४५

**गुड मॉर्निंग सुले,**

बघ. हो इतकं इंग्रजी तोंडांत बसलय कीं लिहितांना सुद्धां इंग्रजी आलं. काल पत्र लिहायला सुरवात केली. पीटर म्हणाला “ कुणाला

रे पत्र लिहीतोस ? " मी म्हटलं ' सुलीला '—" रोज " ? " हो बहुधा रोज." " अरे अशी एक सारखी पत्र लिहूं लागलास अन् एकादे वेळेस दिरंगाई झाली तर काळजी करेल ना ती ?

अगोदर दिरंगाई व्हायची नाहीं अन् झालीच तर तिला माहीत आहे कीं तसंच कारण असल्या शिवाय मीं कांहीं पत्र लिहायला चुकायचा नाहीं.

थंडी चिकार पडूं लागली आहे. डोंगरावर सर्वत्र बर्फ आहे. शेगडी मात्र २४ तास चालूं आहे. तुझ्या प्रकृतीचा अहवाल दोस्तांच्या हाल-चालीप्रमाणें उत्तेजक आहे. अशीच सुधारणा ठेव. बाकी ठीक.

तुझाच,
*अन्ता*

## ४२

॥ श्री ॥

अथेन्स—ग्रीस
१६।११।४५

सुले,

जाहिराती लावतां लावतां आमची स्वारी अथेन्सला येऊन दाखल झाली. बारीहून निघालों अन् समजलें कीं अथेन्सला अतीशय पाऊस पडत असल्यानें विमान उतरणें अशक्य आहे. अन आपले खरोखर ४ वाजतां

बारीला परत आलों. तेथें दुपारचें जेवण झालें. शेजारच्या ट्रॅन्झीट कँपांत पत्र्याच्या झोपडींत मुक्काम असल्यानें रात्रीं चिकार थंडी वाजली. शेवटीं सकाळीं ७ वाजतां विमान निघालें. आम्हीं इटलीच्या पूर्व किनाऱ्यावर जात होतों. नंतर ॲड्रिॲटिक समुद्र ओलांडून अल्बेनियांत शिरलों व खालीं दक्षिणेकडे येऊन अथेन्स जवळ आलों. धुकें खूपच होतें अन् पुन्हां परत जाण्याची पाळी येत होती. पण तेवढ्यांत उन्हाची तिरीप आली अन् वैमानिकानें विमान खालीं उतरवलें. समोरच्या घड्याळांत पाहिलें तो पावणे अकरा. मग ध्यानांत आलें कीं आपण पूर्वेला आलो आहोंत. बाहेर बस तयार होती. लगेच हॉटेल गांठलें. किंग जॉर्ज नांवाच्या एका प्रशस्त हॉटेलांत ३२४ नंबरच्या खोलींत मुक्काम आहे.

अथेन्स शहरांत ग्रीसची दोन तृतीयांश लोक संख्या आहे. शहर स्वच्छ आहे. सायंकाळी शहरांस चक्कर मारली. सर्व वस्तु अत्यंत महाग आहेत. ग्रीक मधील नाणें ड्राकमा—त्याची आजची किंमत १ पै आहे. लिराचे ड्राकमा करून घेतले. २५०० लिराचे १०२२५० ड्राकमा मिळाले. वाहने रस्त्याच्या उजवीकडून चालतात. भाषा ग्रीक असल्यानें खरोखरच ग्रीक लॅटिन सारखी वाटली. दुकानावरच्या पाट्या ग्रीक भाषेंत आहेत. फ्रेंच भाषेचें वर्चस्व बरेंच आहे. अथेन्स शहराची रचना मुंबई सारखी विशेषतः दादर माटुंगा या भागा सारखी वाटते. येथील काम आटोपून १—२ दिवसांत उत्तर ग्रीसमध्यें जाईन.

डिसेंबरमध्यें कदाचित इंग्लंडला जाईन.

तुझाच,

*अन्ता*

# ४३

॥ श्री ॥

सालोनिका
२१ नोव्हेंबर ४५

सुल,

रात्रौ एक ग्रीक ऑपेरा पाहिला. आमच्या अथेन्स येथील कचेरींत काम करणाऱ्या एका ग्रीक मुलीनें ' या अधिकाऱ्याला आज रात्रीच्या ऑपेराचे तिकिट द्यावें ' असें एका कागदावर लिहून दिलें. तो कागद घेऊन मी थिएटरांत गेलों. व तिकिट घेतलें. एवढा सुशिक्षित मी पण ' बोलका ढलपा ' वापरावा कागला. अर्थात एक अक्षरही कळलें नाहीं. हें सांगणें नकोच.

रविवारीं येथें विमानानें येण्यास निघालों. पण हवा वाईट असल्यानें दोनदां परत जावें लागलें. इथला मेडिटरेनियन पॅलेस, नांवालाच पॅलेस आहे. कारण खोलींत पलंग व गादी आहे. पण चादर अन् ब्लँकेटें नाहींत. डिपॉझिट ठेवून ब्लँकेटें घ्यावीं लागलीं. ग्रीसमध्यें सरपणाची अत्यंत चणचण आहे. त्यामुळें आंघोळी साठीं नंबर लावावें लागतात. तसेंच आंघोळीचा दर १०० ड्राकमा म्हणजे १० आणे आहे.

टर्कीचा अध्यक्ष केमालपाशा याचा जन्म सालोनिका येथें झाला. त्याचें घर अजून शाबूत ठेवलें आहे. तें काल पाहिलें. कर्नल वेद प्रकाश नांवाचे अधिकारी येथील मुख्य आहेत. ह्यांनीं एका इजिप्शियन तरुणीशीं लग्न केलें आहे. दोघं नवरा बायको चांगली आहेत.

उद्या मी दौऱ्यावर जाईन.

तुझाच,
अन्ता

# ४४

॥ श्री ॥

कवाला—उत्तर ग्रीस
२४।११।१९४५

सुले,

आज कवालाचा मुक्काम संपवून उद्यां सालोनिकाला जाईन.

हें शहर मोठं रमणीय आहे. इजिअन समुद्रासाठीं हें बंदर आहे. ग्रीक इतिहासांत या समुद्राचं महत्त्व फार आहे. माझी खोली दुसऱ्या मजल्यावर आहे. समुद्र किनाऱ्यावर डोंगरांची एक रांग उतरत आलेली आहे. या उतारावर शहर बांधण्यांत आलं आहे. एकाद्या मोठ्या थिएटरांत स्टेज भोवती जशा सर्व बाजूंनी तीन मजल्यांवर बसण्याची व्यवस्था असते तशीं समुद्राकडे तोंड करून सर्व घरांची बांधणी घातलेली आहे. उजव्या व डाव्या बाजूला दोन लहानशीं बेटं आहेत. समोर अथांग दर्या पसरला आहे. बंदरांत बोटी उभ्या आहेत. समुद्र किनाऱ्यावर असलेल्या रस्त्याचा पांढरा पट्टा नागमोडी वळणें घेत घेत डोंगरामागें अदृश्य झाला आहे. त्याच्या समुद्राकडील भागावर लावलेली झाडें, पंगतीतील पांढऱ्या रांगोळीच्या पट्ट्यावर लावलेल्या उदबत्त्यांची आठवण करून देत आहेत.

अशा या थंड हवेंत थोडे दिवस मिळाले.

तुझाच,

*अन्ना*

# ४५

श्री

सालोनिका—ग्रीस
२८ नोव्हेंबर ४५

सुले,

कवाला नंतर व्हराया येथून पत्र लिहीन असें मी म्हटलें होतें खरें पण व्हराया येथें मीं गेलों तों चिकार बर्फ पडत होतें. कामा निमित्त कसाबसा बाहेर जात होतो. पण परत आल्यावर आळीमिळी गुपचिळी. पायमोजे घालून ब्लँकेटांत शिरत असे. थंडी निमित्त नवीन प्रगति म्हणजे आतां दोन पायमोजे घालण्यास सुरवात केली आहे. आंघोळीचें प्रमाण भूमिति श्रेणीनें घसरत आहे. गेल्या सहा दिवसांत गंजीफ्रॉक, गरम सदरा अथवा जर्सी पुलओव्हर काढण्याची कांहीं छाती झाली नाहीं. पडसें भरपूर झालें आहे. हातमोजे घालून लिहीण्याची सवय करूं लागलों आहे. पण तशी संवय नसल्यानें बोटें न हालतां लोकरच हालते.

सकाळीं चहूंकडे पांढरें स्वच्छ बर्फ दिसतें. कवीला बर्फ पाहून कशा कल्पना सुचतात कोण जाणें. माझा मात्र शब्दशः गारठा झाला. उघड्या जीपमधून कानांवर दोहोबाजूंनी वारा फडाफड मारीत होता. (कसला मंद समीर अन् कसलें झुळझुळ विझण !)

ग्रीक मेवा खाल्ला. २ शेर मिठाईचे ६५ रु. दिले. बुटांची किंमत १२० रु. असून एका कपबशीला १३ रु. द्यावे लागतात. बोला आतां !

तुझाच,

*अन्ता*

# ४६

॥ श्री ॥

सालोनिका—उत्तर ग्रीस
३ डिसेंबर १९४५

सुले,

माझा दौरा संपवून मी येथें विमानाची वाट पहात आहे. रोजचें जेवण ठीक असतें सकाळीं १०॥ वाजतां कॉफी मिळते. मेडिटरेनियन पॅलेस हें या हॉटेलचें नांव. सकाळीं ७॥ वाजतां चेंबरमेड चहा घेऊन येते व म्हणते—कलिसेमे कपितानो ( गुड मॉर्निंग कॅप्टन ) चहा घ्यावा. लाऊंजमध्यें रेडिओ आहे. पिंगपॉंग टेबल आहे. वाचनालय आहे.

लाऊंजच्या बाहेर गच्ची आहे. हें हॉटेल समुद्र किनाऱ्यावर आहे. सर्वत्र धुकें पसरलें आहे. पावसानें रस्ता ओला झाला आहे. १०—५ लहान मोठे पडाव उभे आहेत. मजूर या पडावांतून रसदार मोसंब्याचा करंड्या बंदरावर आणीत आहेत. लोकांची गडबड चालूंच आहे. किरकोळ विक्रेते मोठमोठ्यानें ओरडत आहेत. पोलीस हातगाड्यावाल्या लोकांना हांकलून देत आहेत. अन् पोलिसाची पाठ वळते न वळते तोंच लोक पुन्हां जमा होतात. आरडाओरड सुरूच आहे.

तों बघ आणखी एक पडाव आला. त्यांत ताजी कोबी, बीट, सॅलेड भरलें आहे. जणुं हालती मंडईच. त्याच्याच पलिकडे मासळीचा पडाव आहे. हजारों प्रकारचे मासे लहान लहान टोपल्यांत चमकत आहेत. दूर क्षितिजावर एक मोठें जहाज समाधिस्त योग्याप्रमाणें उभें आहे. त्याच्यां तून निघणारा धूर योग्याच्या धुनींतून निघणाऱ्या धुराप्रमाणें दिसत

आहे. छोट्या छोट्या नांवा लहान पोरांप्रमाणें उगीचच इकडून तिकडे जात येत आहेत. गंमत वाटतें हें दृश्य बघून. बाकी ठीक.

तुझाच,
*अन्ता*

४७

श्री

आगगाडींत लंडनच्या रस्त्यावर
१४ डिसेंबर १९४५

बघतेस काय ? मीं खरंच लंडनला निघालों आहे. सगळा प्रकार स्वप्नांतल्यासारखा झाला. अनेक ठिकाणीं थांबत थांबत काल दुपारीं कॅसर्टाला पोहोचलों. तों सुटीवर लंडनला जाणाऱ्या लोकांत माझं नांव आहे असें मेजर मसरूव्हनें सांगितलं. माझ्या गैरहजेरींत त्यानेंच ही सगळीं व्यवस्था केली होती. गाडी रात्रीं ८॥ ला होती. पण एकच गर्दी. जुनें कपडे भट्टीला दिले, नवीन चढवलें, जुजबी सामान घेतलें अन् निघालों. दौऱ्याचा अहवाल अगोदरच लिहून टाकल्यानें मोकळा होतों. मसरूव्हनें खूपच मदत केली. पैसे दिले. सामान बांधलें कमाल आहे त्याची ! रात्रीं स्टेशनवर पोंहोंचवायला आला होता. शेवटीं काल रात्रीं कॅसर्टा सोडलें अन् रोमला येऊन पोहोंचलो. स्वित्झर्लंड व फ्रान्स मार्गे कॅले, हा प्रवास आगगाडीचा अन् मग इंग्लिश खाडी ओलांडून लंडन २० तारखेला लंडनला पोहोचूं.

कार्यक्रम फार गर्दीनें झाला.

हें पत्र गाडींतून लिहून टाकित आहे.

गाडींत दिवे नाहींतच. पण इतके दिवस मालाच्या डब्यांतून प्रवास करावा लागत असे तो आतां माणसाच्या डब्यांतून होत आहे एवढेंच ! जेवण उत्तम. पण झोपायला जागा नाहीं. अखेर काल दोन बाकांमध्यें झोप काढली. जुन्या आठवणी जाग्या झाल्या.

तुझीं १४ पत्र मला एकदम काल मिळाली. एक उत्तम मेजवानीच ती.

आतां शांतपणें तुला 'ग्रीसच्या गमति' लिहीणार होतों. तों ही सफर निघाली. ग्रीसमध्यें मेरी नांवाची एक मुलगी आमच्या अथेन्स येथील शाखेंत काम करते. हिंदुस्थानबद्दल तिनें खूप वाचन केलें आहे. गीतांजली तिला पाठ येते. तिच्याशी खूप गप्पा मारल्या आपल्या संस्कृतिबद्दल. एप्रील अखेर हिंदुस्थानांत यायला मिळेल असें वाटतें.

तुझा,
*अन्ता*

४८

Albergo Turion
मिलान—इटली
१७ डिसेंबर १९४५

सुले,

आज सायंकाळीं ४॥ वाजतां आम्हीं येथून लंडनला कूच करणार. स्वित्झर्लंड व पॅरिस मधून कॅलेला आम्हीं उतरूं. मिलान-कॅले ३६ तासांचा रस्ता आहे.

काल आम्हीं येथून जवळच असलेल्या ‘ कोमो ’ नांवाच्या ठिकाणीं गेलों होतों. तेथील चित्रें तुला पाठविलीं आहेत. तुजजवळ आतां चिक्कार चित्रें सांठलीं असतील. त्याचा सुंदर अल्बम करून ठेव.

कोमो हें ठिकाण मिलानच्या उत्तरेस आहे. एका मोठ्या सरोवरापाशीं हें ठिकाण वसलें आहे. सरोवराचा घेर २०० मैल आहे. चारी बाजूला डोंगर असून तेथें छोटी छोटी खेडीं आहेत. एका डोंगरावर आम्हीं गेलों तेथें ब्रुनेट नांवाचें गांव आहे. वर जाण्यास रेल्वे आहे. येथून स्विट्झरलँड दिसतें. सरोवरांत बोटींनें आम्ही १–१॥ तास हिंडलों. याच कोमोला मुसालिनी सांपडला. पार्लमेंट निवडणुकीनंतर चर्चिल येथें येऊन राहिला होता. खरोखर हें गांव सृष्टिसौंदर्यानें नटलेलें आहे. मींही बोट वल्हवली.

आतां बर्फ रोजचाच प्रकार होऊन बसला. शहराबाहेर पडलें कीं, तळीं व नाले गोठलेले दिसतात.

तुझाच,
अनंत

५०

कॅले–फ्रान्स
१९ डिसेंबर १९४५.

सुले,

१॥ दिवसांच्या प्रवासानंतर आज येथें येऊन पोहोंचलों. काल सायंकाळीं ५॥ ला आम्हीं मिलान सोडलें. रात्रीं ११ वाजतां सिंपलेन

नांवाचा बोगदा ओलांडून आम्हीं स्विट्झरलँडमध्यें प्रवेश केला. हा बोगदा सुमारें १५ मैल लांब आहे. अन् इटली व स्विट्झरलँड यांच्या सरहद्दी या बोगद्यांत कोठेंतरी आहेत.

स्विट्झरलंडमध्यें शिरतांच जणूं ट्रॅन्स्फर सीन झाला. चांदणें स्वच्छ पडलें होतें. अन् तें बर्फानें पांढरें शुभ्र झालें होतें. जणूं कांहीं पारिजातकांच्या फुलांचा सडाच. लहान मोठे ओहळ डोंगर पठारावरून उड्या घेत होते. पण उड्या घेतां घेतांच त्यांचे बर्फ बनलें. अन् मग ते बर्फाचें खडे खालीं पसरूं लागले. जणूं कांहीं विधात्यानें हातांतील मोत्यांची पुडीच उधळून टाकली. किंवा साखरेचें पोतें उलटें झालें.

दुरून एकाद्या बर्फाच्या डोंगरावर एकुलता एक दिवा दिसे.

हे देखावे पहाटे ५ वाजेतों आम्हीं पहात होतों. डब्यांतील सर्व अधिकारी रग पांघरून बसले होते. बाहेर बर्फाचे पट्टे ओढले होते. डब्यांत हीटर असल्यानें खिडक्या बंद होत्या तोंवर ठीक होतें. खिडकींवर प्रथम दहिवर, नंतर धुकें, व नंतर बर्फ जमल्यामुळें त्यांचा पारदर्शकपणा नाहींसा झाला. तें झाडून टाकण्यासाठीं खिडकी उघडली मात्र लगेच थंड वाऱ्याचा झोत आंत आला.

गाडींत सर्व प्रकारची सोय होती. लाऊड-स्पीकरची व्यवस्था असल्यानें सर्व हुकूम डब्यांतल्या डब्यांत मिळत असत. एक गैर सोय प्रामुख्यानें भासली. जेवतांना पिण्यासाठीं चहाची व्यवस्था असे. पण थंडपाणी पिण्यास मिळणें अशक्य.

काल दिवसभर फ्रान्स पाहिला पण स्विट्झरलंड पुढें फुकट !

तुझाच,

**अनंत**

# ५१

श्री

कॅले–फ्रा·स
२० डिसेंबर १९४५

*काय सुले,*

आजचा कागद् छकास आहे कीं नाहीं ! म्हटलं फ्रान्समध्यें विकत घेतला आहे. वास्तविक आम्हीं आज लंडनला जावयाचे. पण आयत्या·वेळीं घोडें अडलें अन् उद्यांची तिकिटें मिळालीं. सुले, इंग्लंडपासून आम्हीं फक्त २२ मैल दूर आहोत बघ. पण असं बघ हिटलरनें ६ वर्षं खटपट करून त्याला इंग्लिश खाडी ओलांडता आली नाहीं. मग आम्हीं १–२ दिवस थांबलों तर त्यांत विशेष असं काय ? इंग्लंडमध्यें ५०० रु. खर्च करायचें असं ठरवलं आहे.

मसग्रूव्हच्या वडिलांचें अत्यंत आग्रहाचें आमंत्रण आहे. केंब्रिजलाही आमंत्रण आहे. अग दोस्तांना काय तोटा !

खरेद्याही करीन म्हणतों.

फ्रेंच भाषा म्हणजे अजब आहे हो. ‘ हो ’ म्हणायचं झालं तर

इटालियन–‘ सी ’ फ्रेंच–‘ वी ’

इंग्लिश थँक्यू,

अमेरिकन–‘ यू वेलकम ’

इटालियन–‘ ग्रात्सी ’

ग्रीक–‘ द्राक्षी ’

अन् फ्रेंच–‘ मर्सी ’

बघ मला आतां किती भाषा येऊं लागल्या.

कॅले हें शहर एकूण नकालीच. मुली सुंदर व तरतरीत दिसल्या भिंवया कापलेल्या, ओठांना रंग वगैरे. सौ. खानोलकर यांची अतिशय आठवण येते. साधारणपणें माझें निरीक्षण असे आहे कीं जेथें बायका उठावदार तरतरी व रंगेल असतात, तेथील पुरुष अगदीं बावळट असतात. इटली व फ्रान्स येथें हा प्रकार प्रामुख्यानें नजरेस पडला. उलट ग्रीस व इंग्लंडमध्यें पुरुषांचे वर्चस्व जास्त उठून दिसतें.

काल शहरांत चक्कर मारली. बॉंबफेकीनें अतिशय नुकसान झालें आहे. पण त्यांतही रसिकपणा व कलाकौशल्य दृष्टीस पडल्या शिवाय रहात नाहीं. घराच्या खिडक्या साध्या न करतां अष्टकोनी करतील सुंदर गच्ची चढवतील. लोक रसिक खरे !

तुझ्यासाठीं खूप खरेदी केली आहे. फ्रान्सचे नाणें फ्रॅंक. या फ्रॅंकची आजची किंमत १ आणा आहे.

येतांना आम्हीं पॅरिसला जाऊं. येथून पॅरिस १५० मैल आहे. ७ तास लागतात. सुले, मी खूप हिंडतो आहे. नाविन्याचा अनुभव घेतो आहे. पण तूं जवळ नाहीस. म्हणून वाईट वाटतं.

येथें थंडी खूप आहे. शेगडी शिवाय निभाव लागत नाहीं. आज ५ ब्लॅंकेटें मिळालीं. मी इंग्लंडला एक छकास पेन घेणार आहे. बाकी ठीक.

तुझाच,

अनंत

## ५२

लंडन
२२ डिसेंबर १९४५

सुले,

काल रात्रीं ९॥ वाजतां येथें येऊन पोहोंचलों. धुकें खूपच पडल्यानें कांहीं दिसत नव्हतें. फक्त मधून मधून विजेचे दिवे लुकलुकत होते.

सुले, बाकीचे लोक लंडनला येतात त्या वेळीं ट्रंका भरभरून सामान असतें त्यांच्याबरोबर. बोटीवर हिंदी लोक पुष्कळसे असले तरी बरें वाटत नाहीं त्यांना. दर्याज्वर ( Sea sickness ) पेक्षां गृहज्वरच अधिक तापदायक वाटतो. फराळाच्या करंड्या असतात बरोबर अन् अगाऊ व्यवस्था करून व्हिक्टोरिया अथवा चेरिंग क्रॉस स्टेशनवर उतरवून घेण्यासाठीं त्यांना मित्र लागतो.

सुले, माझ्या विलायतच्या प्रवासाची तयारी करण्यास मला अवघे ६ तास मिळाले. माझें एकूण सामान वजन ५० पौंड होतें. ही माझी प्रवासाची तयारी! पण येथें वस्तु इतक्या छान मिळतात कीं कसलीच अडचण पडत नाहीं.

सुले, विलायतच्या प्रवासांतील १ लें प्रकरण अश्रूंनीं भरलेलें असतें. ते बंदरावरील निरोप, गळ्यांतील हार, डोळ्यांतील तें पाणी, ते हातरुमाल फडफडविणें, अन् आपली मायभूमि दिसणार नाहीं म्हणून दुःखित अंतःकरणानें तें केबिनमध्यें जाणें.

सुले, सगळा चावटपणा आहे. आतां माझेंच बघ ना. मीं लंडनला जाण्यासाठीं निघालों तों कॅसर्टा स्टेशनवर काळें कुत्रेंसुद्धां नव्हतें. बंगलोरला जाण्यासाठीं आपण गाडींत बसावं, अन् इतक्या लांबवर जाणारे

आपण तेव्हां चोराच्या आळंदीचे तिकिट काढलेल्या प्रवाशाकडे ज्या तुच्छतेनें पाहातों कीं नाहीं तसें लोक माझ्याकडे पहात होते. येवढा विलायतेला गेलों पण एकदां तरी कुठलं जेवायचं अथवा चहाचं आमंत्रण ?

असो, आतां दुसरं प्रकरण.

सकाळीं उठून शहरांत चक्कर मारली. किरकोळ खरेद्या केल्या. किंमती अर्थात् तुफान आहेत. सुले, पिॲस्टर (इजिप्त), लिरा (इटली), ड्राकमा (ग्रीस), फ्रँक (फ्रान्स), व शिलिंग (इंग्लंड), या नाणें बाजारांत मी अगदीं गोंधळून गेलों आहे. अखेर प्रत्येक नाण्याचें रुपये आण्यांत रूपांतर करून किंमत बरोबर आहे कीं नाहीं यांचा अंदाज घेतों. नाहींतर ग्रीससारखी फजिती. रुबाबांत २ शेर मिठाई घेतली. पैसे दिले. अन् मग समजलं कीं २ शेराचे ६४ रु. दिले. अन् पुन्हां तुला मिठाई नाहींच आवडली.

दुपारीं टयूबनें पिकॅडिली सर्कसवर गेलों. ही ट्यूब म्हणजे एक और आहे. जमिनीच्या खालून ही रेल्वे जाते म्हणून बहुतेक रस्ता बोगद्यांतून जातो. जमिनीवरून खालीं जाणारे सरकते जिने असतात. पायऱ्या उतरण्याची जरूर नाहीं. जेथें स्टेशनं असतात तेथें अंडरग्राऊंड म्हणून पाटी असते.

बसेस अगदीं मुंबईप्रमाणें आहेत. अन् कंडक्टर, ड्रायव्हर सगळ्या स्त्रिया. अग काय जामतात त्या प्रवाशांना. अगदीं बायका आपल्या गरीब बिचाऱ्या नवऱ्यांना जामतात ना तश्या ! लंडनचे पोलीस अन् प्रख्यात टॅक्सीही पाहिल्या.

नाझी लोकांनीं जीं अमानुष कृत्यें केली, त्यांचें प्रदर्शन व सिनेमा पाहिला. अन् सायंकाळीं ७ वाजतां परत आलों. ट्यूब स्टेशनमधून वर येतों. तो दोघे हिंदी गृहस्थ भेटले. लगेच गप्पांना सुरुवात. त्याची नांवें

श्री. जोशी व डॉ. मोदी. त्यांनीं आग्रहानें जेवावयास नेलें. कोहिनूर नांवाच्या उपहार गृहांत पुऱ्या, भाजी, जिलबी वगैरे जेवण झाले.

२४-१२-४५.

काल रात्रीं पत्र पुरें केलें नाहीं. तेव्हां आज करीत आहे. आज सकाळीं ईस्ट एंडमध्यें पेटिकोट लेनमधील बाजारांत गेलों होतों. "सब चीज छे, छे आनेवाला" हा बाजार आहे. सुमारें १५०० तरी दुकानें असावींत. सैन्यांतून रिलीज झालेले लोक बॅटलड्रेस घालून माल विकतांना पाहाण्याची मौज वाटते.

एका गोष्टीची आठवण झाली. माझा ओव्हरकोट तुला माहीतच आहे. त्याचा ग्रेटकोट, रेनकोट अन् ड्रेसिंग गाऊन म्हणून मी उपयोग करीत आहे.

या बाजारांत मी किरकोळ खरेद्या केल्या. दुपारीं पुन्हां भटकण्यास बाहेर पडलों. ओडियन नांवाच्या थिएटरांत सीझर क्लीओपात्रा हा चित्रपट पाहिला. थिएटर व चित्रपट दोन्हीं उत्तम. तिकिट ४॥ रु. आज शाफी नांवाच्या हिंदी हॉटेलांत जेवलों. जेवण उत्तम होतें.

तुझाच,

*अनंत*

# ५३

लंडन

२६ डिसेंबर १९४५

तुला आठवतं कां सुजे, आपण 'वॉटरलू ब्रिज' नांवाचा चित्रपट पाहाण्यास गेलों होतों. चित्रपटाची सुरवात व शेवट त्या पुलावर होतो

असा तो चित्रपट होता. हा पूल आम्हीं पाहिला. नंतर बाकिंग हम राजवाडा पाहाण्यास गेलों. बरा आहे. पार्लमेंट सभागृहही पाहिलें !

पण सर्वच रूढीचें साम्राज्य पसरलेलें दिसतें. हॉटेलांत १३ नं. ची खोली मिळायची नाहीं. ख्रिस्मस् डिनरला टर्की हवीच ! अजून फादर ख्रिस्त पोरांना खेळणीं आणून देतो.

सर्व इमारती मुळच्या पांढऱ्या पण धुरानें धूसर झालेल्या दिसल्या. इटली, फ्रान्स, स्वित्झरलँडमध्यें जी कला आहे ती येथें दिसून येत नाहीं. सुखसोयी भरपूर आहेत, हॉटेलें भव्य आहेत. पण व्हेनिसचें सौंदर्य अन् रोममधील कलाकौशल्य येथें मिळत नाहीं.

काल दुपारीं शफीमध्यें जेवण करून बाहेर पडलों. नं. १० डाउनिंग स्ट्रीट मुख्य प्रधानाचा बंगला, ट्रॅफलगार स्केअर, गेल्या महायुद्धांतील मृत सैनिकांचे स्मारक वगैरे स्थळें पाहिलीं.

त्यानंतर विंडमिल नांवाच्या एका थिएटरांत नृत्यें पहावयास गेलों होतों. भलतींच बीभत्स होतीं. पण रात्रीं हॉटेलमध्यें नाताळ निमित्त जेवण मात्र छान होतें.

आज सकाळीं पुन्हां लंडनची सफर केली. दुपारीं 'वर्मस् आय व्हयू' नांवाचें नाटक पाहाण्यास गेलों होतों. सर्व कामें माजी वैमानिकांनीं केली होती. व भूमिकाही वैमानिकांच्याच असल्यानें कपड्यांचा प्रश्नच नव्हता.

त्यानंतर बी. बी. सी. चे रेडियोचे कार्यक्रम कसे होतात यांचें प्रात्यक्षिक पाहाण्यास गेलों. अनेक तऱ्हेचें प्रसंग निर्माण करण्यासाठीं हजारों तऱ्हेची आयुधें येथें हजर असतात. वीज चमकते, मेघांचा गडगडाट, आगगाडाची शिटी वगैरे तासभर छान करमणूक झाली.

सकाळीं लंडनचे प्रख्यात वेस्टमिनिस्टर चर्च पहाण्यास गेलों.

ड्रायडन, हार्डी, डिकन्स, जॉनसन, वगैरे लेखक व डिझरेली, ग्लॅडस्टन, चेंबर्लेन वगैरे मुत्सद्दी यांची थडगीं येथें आहेत. खूपच मोठें आवार आहे. नाताळ निमित्त चर्च छान सजविलें होतें. त्याच्या शेजारीच

बिगबेन म्हणून मोठें थोरलें घड्याळ आहे. लंडन रेडियोवरील तासाचे ठोके या घड्याळाचे आहेत असें म्हणतात. महाराष्ट्रीय लोक हरतऱ्हेच्या क्षेत्रांत येथेंही आहेत. लंडन रेडियोच्या हिंदी शाखेंत फाटक व मुळे असे दोघे संगीतज्ञ आहेत. आनंद वाटला.

लंडनमध्यें सुमारें ४००० हिंदी लोकांची वस्ती आहे म्हणे. गेले २-३ दिवस हवा छान आहे. इटलीपेक्षां येथें थंडी कमी आहे. प्रकृति उत्तम.

तुझाच,

*अन्ता*

५४

॥ श्री ॥

नॉर्थ ब्रिटिश हॉटेल, एडिंबरा

१-१-१९४६

सुले,

दुपारीं ४ वाजतां यॉर्कहून निघालों. पहिल्या वर्गाचं तिकिट काढूनही प्रथम कांहीं वेळ उभं रहावं लागलं. कारण गर्दी तुफान होती. पण न्युकॅसल स्टेशनवर जागा मिळाली बसायला. कोळशासाठीं प्रख्यांत असलेलें न्यूकॅसल तें हेंच. रात्रीं ९॥ ला येथें पोहोंचलों.

स्टेशन जवळ हें हॉटेल आहे. स्वतंत्र खोली पण मिळाली आहे. हें हॉटेल खुद्द रेल्वे कंपनीनें चालेविलें असून खूप मोठें आहे. सर्व सुख-

सोई आहेत. न्हावी धोबी तर आहेतच पण नाटकांची तिकिटेंसुद्धां रिझर्व करतां येतात. रेल्वेचें तिकिट मिळतें. पुस्तकें अन् वर्तमान पत्रांचें दुकान आहे. सकाळीं सांगाल त्यावेळीं चहा, बिस्किटें वर्तमानपत्रें खोलींत येतात. चिनी मातीच्या छोट्या छोट्या बरण्यांत गरम पाणी भरून त्या हांथरुणांत ठेवतात, म्हणजे अंथरुण अगदीं गरम रहातें. पोस्टाचीं तिकिटें देणारें एक मशीन आहे. पेनी टाका कीं तिकिट बाहेर येतें. शौचकूप नहाणीघर व टेलिफोन यांतील दिव्यांचे कनेक्शन दरवाज्यापाशीं आहे. आंतून दरवाजा लावला कीं दिवे लागतात—आपलें अस्तित्व खाकरून पटवून देण्याची जरूरी नाहीं.

कालचा सर्व दिवस भटकण्यांत घालविला. सकाळीं एका हॉटेलांत गेलों. चहा पीत असतांना एक स्कॉटिश दांपत्य मुद्दाम माझ्या टेबलापाशीं आलें. ३१ डिसेंबरच्या अनेक गमती त्यांनीं सांगितल्या. इंग्रज लोकांपेक्षां स्कॉटिश लोक अत्यंत रूढिप्रिय आहेत. आपल्याकडे पांढरा रंग पवित्र समजला जातो. येथें काळ्या रंगाचें महत्त्व फार आहे. आपल्याकडील लोक काळे असल्यानें त्यांना जसा पांढरा रंग हवासा वाटतो तसेंच.

३१ डिसेंबरला तर काळा रंग म्हणजे पावित्र्याचा अर्क. काळा मनुष्य, तो न मिळाल्यास काळ्या केसांचा मनुष्य, तेंही न जमल्यास काळ्या कपड्यांचा मनुष्य. अन् हंसशील पण सांगतो वर दिलेल्या अटींपैकीं एकही अट पुरी करणें अशक्य झालें तर कोळशाचा तुकडा तरी खिशांत हवा.

असो. अशा रितीनें सशस्त्र होऊन रात्रीं १२ वाजतां कुठल्याही घरीं जा, तुमचें अत्यंत प्रेमानें स्वागत होईल. उत्तम मद्य व सुग्रास जेवण मिळेल. कारण अशा तऱ्हेचा मनुष्य मिळणें हा पहिल्या प्रतीचा शुभशकुन समजला जातो.

हें जोडपें या उदात्त हेतूनें प्रेरित होऊन माझ्या टेबलापाशीं आलें. त्यांनीं मला त्यांचा पत्ता दिला अन् रात्रीं आमच्याकडे जरूर या असें

वजाविलें पण वाई पोक्त व नेतावाताच्याच असल्यानें अन् तिला मुलगी नसल्यानें मीं साहजिकच नकार दिला. सुमारें १ तास आमच्या गप्पा चालल्या होत्या. इंग्लंडमध्यें २५–२६ डिसेंबर हे दोन दिवस महत्त्वाचे, त्याप्रमाणें स्कॉटलंडमध्यें ३१ डिसेंबर व १ जानेवारी हे दिवस महत्त्वाचे.

सौ. बार्कले (हे त्या बाईचें नांव) प्रेमळ होत्या. नाताळबद्दल त्यांनीं इतिहास सांगितला. एडिंबरा येथें या दोन दिवसांसाठीं हजारों लोक येतात. व या हजारोंत आस्मादिक असल्याबद्दल त्यांनीं आनंद व कौतुक व्यक्त केलें. या पेमळपणावर कळस म्हणजे माझें चहाचें बीलहि त्यांनींच दिलें.

स्कॉटिश मनुष्य अन् पैसा.

या दोन गोष्टी अविभक्त आहेत. कंजुषपणाबद्दल जगभर त्याची प्रसिद्धी आहे. प्रतिष्ठा अन् पैसा या दोघांना तो जिवापलिकडे जपत असतो. धंद्यामध्यें त्याचा नेहमीं पहिला नंबर असतो. अशा देशांत ओळखपाळख नसतांना, प्रेमळपणानें, आपलेपणा बाळगून बिल देणें म्हणजे तूं झुरळाला अगदीं प्रेमानें हात लावण्यापैकी आहे.

मग गावांत जाऊन कांहीं खरेद्या केल्या. एक उत्तम सूटही घेतला आहे. अग असूं दे स्कॉटलँडची आठवण !

दुपारीं येथील इंडियन असोसिएशन मध्यें जेवायला गेलों होतों. येथें बरेंच हिंदी विद्यार्थी आहेत. जेवण चांगलें होतें.

सायंकाळीं हिंडायला गेलों. जसजसा सूर्य मावळूं लागला. तसतसा सर्वत्र रंग भरूं लागला. गुत्ते उघडले, सर्व नाच सुरूं झाले. संगिताचे आलाप अन् आरडा ओरडा सुरूं झाला. शांततेच्या काळांतील पहिला नाताळ. शहरांत सर्वत्र रोषणाई ! ट्रॅम व बसेसमध्यें फक्त ड्रायव्हर व कंडक्टर शुद्धीवर होते. ३ तास खूप हिंडलों. काना कोपऱ्यांत नाताळ साजरा होत होता. मोठ्या रस्त्यांवर स्त्री पुरुषांची टोळकी गात, ओरडत हंसत खिदळत चाललीं होतीं. डोक्यावर विदूषकी टोप्या. हातांत दारूच्या

बाटल्या. तोंडांत शिव्या व सिगरेट—सर्वत्र आनंद होता. पायीं चालण्याची सोयच नव्हती. सहज गंमत म्हणून पायीं जाऊं लागलों. तो एक विद्वान भेटलें. ते ' इंडियां ' त २ महिने होतें. अन् राजकारणावर माझ्याशीं चर्चा करण्याचा त्यांचा मानस होता. पण मीं त्यांचा लौकरच निरोप घेतला.

आमच्या हॉटेलच्या मागच्या बाजूस ट्रोन चर्च ( स्कॉटिश उच्चार ' कर्क ' असा आहे ) नांवाचें चर्च आहे. रात्रीं १२ वाजतां येथें जत्रा भरते. चर्चच्या डोक्यावर मोठें घड्याळ आहे. मी पावणे बारा वाजतां येथें पोहोंचलों. ही गर्दी! आपटबार उडत होते. बँड चालू होते. एकंदर ' अल्ला ' होता ! स्कॉटिश पद्धतिप्रमाणें प्रत्येकाच्या हातांत व्हिस्कीची बाटली होती. अन् दुसरा हात प्रियतमेच्या गळ्यांत होता. बरोबर १२ वाजतां हजारों बाटल्या फुटल्या अन् नव्या वर्षाच्या स्वागतांच्या चुंबनांच्या फैरीच्या फैरी झडूं लागल्या. मी काळा मनुष्य म्हणून जरा घाबरलोंच होतो. पण कसलाही अनिष्ट प्रसंग न येतां हॉटेलमध्यें परतलों.

हॉटेलमध्येंही शिमगा संपून धुळवड सुरू झाली होती. अर्थात सभ्य प्रमाणावर— खोलींत जाण्यासाठीं लिफ्टमध्यें शिरलों. अन् शत्रूच्या हातीं सांपडलों. तीन स्त्रिया लिफ्टमध्यें होत्या. त्यांनीं माझ्याकडे पाहिलें मात्र अन् रुढीच्या ह्या भावना त्यांच्यामध्यें जोरानें उचंबळून आल्या. मी घाबरलोंच. विचार कर सुले, काळ्या केसांचा, काळ्या रंगाचा मी, १२ वाजून २ मिनिटांनीं त्यांच्या हातीं सांपडल्यावर त्यांनीं काय करावें ? पण प्रसंगावधान साधून मी पाइप पेटवला अन् धुराचे फवारेच्या फवारे काढूं लागलों. ते धूम्रमेघ होते. त्या भगिनींना इप्सित शुभशकून झाल्या बद्दल अत्यंत आनंद झाला होता. तो त्यांनी बोलूनही दाखवला. हस्तांदोलनही केले. पण इतक्यांत माझी खोली आली अन् मी बाहेर पडलों.

सुले, त्यावेळीं १२। वाजले होते. बाहेर बर्फ पडलें होतें. अन् मी

माझ्या खोलींत घाम पुशींत होतो. असो. नातळ तर सुखरूप पार पडला उद्यां मी लंडनला जाईन. केंब्रिज व ऑक्सफर्ड करून मग पॅरिसला जाऊं.

तो पर्यंत बाय बाय !

तुझाच,

*अनंत*

५५

श्री

मिलान

१३।१।४६

सुले,

कॅलेला आल्यावर २ दिवस रहावें लागेल असें समजलें. म्हणून पॅरिसला गेलों. कॅलेहून पॅरिस ७ तासांच्या अंतरावर आहे. आम्हीं सकाळीं ८ वाजतां पॅरिसला पोहोंचलों. नार्ड नांवाच्या स्टेशनवर आम्हांस उतरावें लागलें. लंडनप्रमाणें पॅरिसमध्येंही जमिनीखालून जाणाऱ्या ट्यूबरेल्वे आहेत. पॅरिस येथें असतांना, माझा मुक्काम बेडफर्ड नांवाच्या हॉटेलांत होता. राहाणें व ३ जेवणें यासाठीं दररोज १२ फ्रँक म्हणजे ८ आणे द्यावे लागत. याच्या उलट एका हॉटेलांत चहा व आइस्क्रीम घेतलें तर १३० फ्रँक म्हणजे ७॥ रु. द्यावे लागले.

सकाळीं उठून बाजारांत फेरी मारली. फ्रान्सच्या चलनांत १ तारखेपासून फरक झाला आहे. पूर्वीं १ पौंडास २०० फ्रँक मिळत असत आतां ४८० मिळतात. त्यामुळें वस्तूंच्या किंमती खूपच स्वस्त वाटल्या. एक पार्करसारखे दिसणारे फाउंटनपेन घेतले. ४४५ फ्रँक म्हणजे अंदाजे १२ रु. पडले. एक पाइपही खरेदी केला. येतां येतां मॅडलीन नांवाचें चर्च पाहिलें. या चर्चच्या बाहेरील व्हरांड्यावर एक स्तंभमालिका आहे. रोममधील पँथिअनप्रमाणें. पॅरिसच्या देखाव्याचें एक पुस्तकही घेतलें आहे.

दुपारीं एका फ्रेंच मुलीला गाईड म्हणून घेऊन आम्हीं निघालों. प्रथम लोव्हे म्युझियम नांवाचा अजबखाना पाहिला, भलताच प्रचंड आहे. एकूण विस्तार शनिवार वाड्याएवढा असावा. ग्रीक, इटालियन, इजिप्शियन, हिंदी कलाकृतींचे नमुने व अवशेष येथें ठेवण्यांत आले आहेत. चित्रं तर असंख्य आहेत. चित्रकलेंत व्हेनिस व फ्लॉरेन्स यांचा दर्जा वर लागतो. तीं चित्रें येथें आढळतात. फ्रेंच चित्रकलाही कांहीं कमी नाहीं. भावदर्शन हा फ्रेंच चित्रकलेंतील एक विशेष प्रकार आहे असें मला वाटतें. त्यानंतर फ्रेंच राजघराण्यांतील जवाहिरखाना आम्हीं पाहाण्यास गेलों. अग, रत्नांचे म्हणजे नुसतें प्रदर्शन होतें बघ! नीलमाणि, पोवळें अन् पाचूंचे मोठमोठे प्याले, अन् मदिरापात्रें, त्यांच्या काठांवर रत्नांच्या आकृति! जे राजे हे प्याले वापरीत असत, त्यांची तहान हे प्याले पाहूनच अर्धी तृप्त होत असावी. एक मोठी तलवार होती. तिच्या मुठावर रत्नं म्हणजे नुसती खचलेली होतीं. प्रदर्शन पाहाण्यास लष्करी लोकांस मूल्य नाहीं.

सुले, पॅरिस हें मूळं एक बेट होतें. सीन नदीच्या मध्यभागांत असलेल्या या बेटावर पॅरिशिअन नांवाचे लोक वसति करून रहात असत. त्यामुळें शहराचें नांव पॅरिस असें पडलें. पुढें वसति वाढूं लागली तेव्हां त्या बेटाच्या आजूबाजूस असलेल्या सीन नदीच्या दोहों किनाऱ्यावर शहर वसूं लागलें. मूळचें बेट व नंतरची ही लोक वस्ती यांना जोडण्या-

साठीं मोठे मोठे प्रचंड पूल बांधण्यांत आले. अन् आतां तर नदीच्या तळाशीं पोखरून व बोगदे बांधून ट्यूब रस्ता तयार करण्यांत आला आहे.

पॅरिस वाढलें खरें पण या मूळच्या बेटाचें महत्व कायमच राहिलें. मूळच्या पॅरिशियन लोकांनीं या बेटावर एक सुंदर चर्च बांधलें. नोत्रदाम त्याला म्हणतात. नोत्रदाम हें जगांतील एक प्रख्यात चर्च आहे. या चर्चमध्यें एका वेळीं २०००० लोक प्रार्थना करूं शकतात. इतका या चर्चचा विस्तार आहे. फ्रान्सचे मोठे मोठे राजे, पुढारी, व धर्मगुरु यांचे धार्मिक संस्कार या चर्च मध्यें केलें जातात. जवाहिरखाना खूपच मोठा आहे. या चर्च शेजारीच ' हॉटेल द व्हिल ' नांवाचें एक प्रचंड व भव्य हॉटेल आहे. चर्चच्या समोर एक सुंदर स्मारक आहे. दुपारभर या बेटावर हिंडून आम्हीं एका फ्रेंच उपहार गृहांत गेलों. कारण चहा पिण्याची फारच तल्लफ आली होती. पॅरीसमध्यें विजेची सोय अजून चांगली नसल्यानें आठवड्यांतून ३ दिवसच वीज मिळते. म्हणून बाकीच्या दिवशीं मेणबत्या लावण्यांत येतात. प्रथम चहा मागवला. पण तोंडांत जाईना. कारण पॅरिसमध्यें अजूनही साखर व दूध या दोन वस्तु दुर्लभ आहेत. मग तो सोनामुखीचा काढा कोणी प्यायचा ! अखेर गाइडच्या सांगण्यावरून आइस्क्रीम मागवलें. बिल पाहातों तों १०८० फ्रँक ! ही मुलगी चांगली होती. गाइडचे काम तिला येत नसलं तरी सहवासाला बरी होती. अशा गाइडसचा तांडाचा तांडा उभा असतो. सैनिक येतात. आपापली गाइड पसंत करतात. अन् ' पॅरिस ' पाहातात. आम्हीं ५ अधिकारी व ४ लेडी डॉक्टर अशी ९ मंडळी असल्यामुळें गाइड जरा नाखूषच होती !

सायंकाळीं हॉटेलमध्यें आलों अन् जेवण करून रात्रींचे विलास पाहाण्यास गेलों. आम्हीं एकूण तिघे अधिकारी होतों. या भागास मॉ मॅा असें म्हणतात. सालाबादप्रमाणें भाषेची अडचण येथेंहि नडली. गाइड

घेऊन जाणें शक्यच नव्हतें. आमच्या हॉटेल जवळील मेट्रो स्टेशन (पॅरिसमध्यें ट्यूब रेल्वेला मेट्रो म्हणतात) मॅडलिनीं हें होतें. मी अर्थातच आमच्या कंपूचा पुढारी! नकाशा उघडला व स्टेशनचें नांव वांचलें Monte Morte (मॉंटे मॉर्ते). रुबाबांत या स्टेशनचें तिकिट मागितलें. तिला कांहींच कळेना. तुला आश्चर्य वाटेल सुले, हिंदुस्थानांत इंग्रजीचें केवढें महत्त्व! तसेंच अर्धवट ज्ञान असणारे सुद्धां वाक्यांत ५–७ इंग्रजी शब्द फेकून देतात. पण इंग्लंडशेजारीं असणारा हा फ्रान्स इंग्रजीला जाणत नाहीं. तर काय इंग्रजी जाणणारा कोणीहि मिळेना. अखेर त्या नकाशावर तें नांव अधोरेखित करून नकाशा त्या तिकिट विक्रेती पुढें धरला! 'वी, वी, मॉं मॉं!' मग मला कळलें कीं, या मालगाडी एवढ्या प्रचंड अक्षरांचा उच्चार मॉं मॉं असा होतो! या विभागांत रू द् फॉं व रू द् पिगॅली हे दोन रस्ते येथील तमाशांबद्दल प्रसिद्ध आहेत. तेव्हां आम्हीं तिकडे मोर्चा वळवला. कोपऱ्या कोपऱ्यांत पोरी उभ्या होत्याच. खाणाखुणा, हंसणें, खाकरणें चालूंच होतें सर्वत्र! एका तमाशाला आम्हीं गेलों. तिकिट ६१ फ्रँक. जवळ जवळ सर्व नग्न नाच. मला खरं म्हणशील तर किळस वाटली. खेळ संपल्यावर बाहेर आलों. १॥ वाजला. अपेक्षित दृश्यें समोर दिसत होतीं. अन् परत आणि आलों काय! नाहीं म्हटलं तरी असल्या दृश्यांचा मनावर परिणाम होतोच! म्हणून लंडनमधील व येथील असल्या कार्यक्रमास आम्हीं दोघे चौघेजण जात असूं!

९ जानेवारी हा पॅरिसमधील शेवटचा दिवस. आज सकाळीं व्हर्साय येथील प्रचंड राजवाडा पाहीला. राजवाड्यांत अनेक दालनें असून, त्यांत ऐतिहासिक वस्तु ठेवण्यांत आल्या आहेत. मग ज्या दालनांत गेल्या महायुद्धाच्या तहाच्या अटींवर सह्या झाल्या तो दिवाणखाना आम्हीं पाहिला.

इफेल टॉवर हा यांत्रिक कारागिरीचा अजब नमुना आहे. याच्या-इतका उंच टॉवर जगांत कोठेंहि नाहीं असें म्हणतात. या टॉवरवर

जाण्यास विजेचे पाळणे आहेत. परंतु ते सध्यां बंद आहेत. टॉवरच्या पायथ्याशीं एक मोठा बाग असून त्यांत तळीं आहेत. तळ्यांतील पाणी गोठून त्याचें बर्फ झालें होतें. टॉवरचे स्मारक म्हणून एक कलमदान घेतलें आहे, अन् तुला चित्रेंही पाठविली आहेत. मिळालीं कां ?

टॉवरपासून दूर एटवॉयल नांवाचा एक मोठा चौक आहे. या ठिकाणीं १२ रस्ते येऊन मिळत असल्यानें चौक हा शब्द हास्यास्पदच आहे. मध्यभागीं मोठी थोरली कमान असून एका अज्ञात वीराचें स्मारकही येथें आहे. या स्मारकाशेजारीं २४ तास अग्नि जळत असतो. या स्मारकाला नमस्कार करून आम्हीं पुढें निघालों. १२॥ वाजतां एका अधिकाऱ्यानें मला जेवायला बोलावलें होतें. अवकाश बराच होता म्हणून आणखी एक चक्कर मारली तो एका बाजूला "हिटलर प्रदर्शन" असा बोर्ड दिसला. शिरलो आंत. जर्मनांनीं या युद्धांत जेवढी म्हणून आयुधें वापरलीं, त्यांचें प्रदर्शन येथें आहे. व्ही. १ बॉम्बही आहे. या शिवाय हिटलरची स्वतःची मोटारही येथें ठेवण्यांत आली आहे. काळ्या रंगाची, मजबूत मर्सिडीज बेन्झ असून १२ अश्वशक्तींची आहे. नं. 296-501 असा आहे. वेग १०० मैलांपर्यंत आहे. सर्व मोटार बॉंब प्रूफ आहे. खिडक्या व दारें यांच्या कांचा ६ इंच जाड आहेत.

प्रदर्शन पाहून बाहेर आलों अन् वेळ झाल्यामुळें जेवणास गेलों. या अधिकाऱ्याचें नांव कमांडर शेव्हलियर असून फ्रेंच आरमारांतील तो एक अधिकारी आहे. त्याची बायको, मुलगी व जांवई ही मंडळीही मजबरोबरच जेवणास होती. मी दारू नको म्हटल्यावर सगळे हंसूं लागले ! जेवणानंतर त्यांच्या आग्रहास्तव बिन साखर दुधाची कॉफी प्यावी लागली. त्यांच्या न कळत तोंड वेडेंवाकडें करावें लागलें अग अगदीं काडेचिराइत ! दुपारीं २॥ वाजतां आपल्या मोटारीतून त्यानें मला घरीं सोडलें. फारच प्रेमळ होता तो मनुष्य !

दुपारीं लष्करी म्युझियम पाहाण्यास गेलों. हे म्युझियम ३ मजली

असून प्रत्येक खोलींत सर्व राष्ट्रांचे झेंडे ! तर दुसरीकडे निरानिराळ्या फलटणींचे पोषाख, शिपायांचे पुतळे, मोठमोठ्या, अधिकाऱ्यांचे कपडे, सामान, चिलखतें, तलवारी, बंदुका, वगैरे हजारों लाखों वस्तु भरलेल्या आहेत. एक दालन नेपोलियनसाठीं राखून ठेवलें आहे. त्याचा घोडा व कुत्रा, टोपी, टेबल, खुर्ची, बटनें, केस, हातरुमाल, त्यानें काढलेल्या सनदा, वगैरे नेपोलियनच्या शक्य तितक्या वस्तु ठेवलेल्या आहेत.

सुले, एकादा मनुष्य विभूति पदास चढला म्हणजे त्याच्या लहान सहान वस्तूंना सुद्धां किती महत्व येतें ! फ्रेंच लोक हे स्वभावतःच भावनाप्रधान, त्यांत नेपोलियनसारखा लोकोत्तर पुरुष, मग काय विचारतां ? त्याच्या बारीक सारीक वस्तूही मोठ्या आस्थेनें अन् प्रेमानें जपून ठेवून त्यांनीं स्वतःला धन्य करून घेतलें आहे. पण खरें कौशल्य अन् आस्था नेपोलियनच्या समाधींत समावली आहे. पण तें पुढील पत्रीं. तोपर्यंत.

अगदीं तुझाच,
*अन्ता*

## ५६

श्री

१९ फेब्रुवारी ४६
कॅसर्टा

सुले,

कोण भयंकर थंडी पडली आहे म्हणतेस ! अक्षरच बघ की ! हात कसे कांपताहेत. कांपू दे. आतां काय ८।१० दिवस राहिले कॅसर्टांत अन्

१५ इटलींत ! रोज रोज तुझी स्वप्न पडताहेत. जोंपर्यंत येण्या संबंधी कांहीं बातमी नव्हती तोंपर्यंत इथल्या कार्यक्रमाकडे लक्ष द्यावेंसें वाटे. पण आतां काय ! ट्रँझिट कँपांत पडल्या सारखं वाटत आहे ! जॉनसन, टॉमलिन अन् मी असे तिघे एकाच खोलींत आहोत. रोज रात्रीं झोपायच्या वेळीं मी म्हणतों.

> *Oh! My God, my love, my darling, what a life without a wife! But wait my dear only a month more.*

अन् मग सगळे हंसतों. तुझ्यासाठीं पुष्कळ वस्तु घेतल्या आहेत. आतां काय तीन आठवडे राहीले. येथून निघाल्या बरोबर तार अन् तेथें पोहोचल्या बरोबर तार !

तुझाच
***अनंत***

# ५७

॥ श्री ॥

२६।१।४६

**सुले,**

अग म्हणतात ना न करायचा वार शनवार ! पण मी आज खूप काम केलयं बरं कां. सकाळीं ७ वाजतां उठलों. म्हणजे जोसेफ नांवाचा एक आस्ट्रियन युद्ध कैदी माझा बटमन आहे. त्यानें चहा देऊन मला

उठवलं ! ७॥ वाजतां माझा हिंदी बॅटमन आला अल्लाबक्ष. मजबरोबर तोही लंडनला आला होता. अग " एका हिंदी माणसाची इंग्लंड बद्दलची मतें " म्हणून माझें येथें व्याख्यान झालं. तसंच A. T. S. च्या मुलीं करीतांही माझं व्याख्यान झालं. बिचाऱ्या अल्लाबक्षाला मात्र त्याची इंग्लंड बद्दलची मतं कुणी विचारलीं नाहींत. हा मेजर मसग्रूव्हची कामेंही करीत असे. विलायतेहून परत आल्यावर अल्लाबक्ष पीटरला म्हणतो.— " मेजर साहेब, तुम्हीं परत जातां आहां ! पण विलायतेंत लोक दारू फार पितात अन् तिथल्या बायका फार वाइट आहेत. संभाळून रहा बरं कां ! " खूप हंसलों आम्हीं दोघें !

तर काय हा कार्यक्रम आटपून मस्तपैकीं आंघोळ केली. अन् मग आठवूं लागलों की मी कधीं बरं आंघोळ केली होती. पण तूंच बघ रोज संध्याकाळीं ६ पर्यंत वेळ नाहीं. १८ तारखेला शनिवारीं येथें आलों. त्या दिवशी पीटरला पोंहोचवायला गेलों. शनिवारी सिनेमा, रविवारी हिंदी जेवण, सोमवार सायंकाळ A. T. S. मुलींपुढें व्याख्यान, मंगळवार नेपल्सला जेवणाचें आमंत्रण, बुधवार पडसे, गुरुवार व्याख्यान, काल आमच्या ऑफिसमधील शिक्षण खात्याची मुख्य मिस् टॉमसन तिचा वाढं दिवस म्हणून तिनें ६ वाजल्या पासून बोलावलं. मग संपला की आठवडा. आतां आठवण करूं लागलों कधी केली बरं आंघोळ. मिलानला १३ तारखेला. म्हटलं बापरे जर कां घरीं असं केलं असतं तर धडगत नव्हती माझी.

जाऊं दे. पण तूं आतां मला सांग कीं तूं मुंबईला येशील कां मीं पुण्याला येऊं !

तुझाच

*अनंत*

# ५८

श्री

असीसी–इटली
६ मार्च १९४६

सुले,

तूं म्हणशील काय हें हिंडणं ! पण आतां तूंच बघ ४ दिवस राहिले. मग नको हिंडूं ! ११ तारखेची बोट नक्की होऊन मला नेपल्सला जायची सूचना मिळाली. त्याप्रमाणें परूजा, रोम, कॅसर्टा, सालेर्नो, नेपल्स अन् ११ तारखेला इटली सोडणार.

मी अगदीं टेकीला आलों आहे. तेथें येई तो १४ महिनें होतील. अगदीं स्वच्छ अन् निष्कलंक असा परत येणार या भावनेनेंच किती अभिमान अन् आनंद वाटतो आहे. तुझ्या प्रेमाची पाखर गेले १४ महिने कायमची माझ्यावर होती. अन् म्हणूनच मजकडून कांहीही अनुचित घडलं नाहीं. याचं सगळं श्रेय तुला आहे. प्रेमाचे धागे अदृश्य असले तरी किती बळकट असतात याचं प्रत्यंतर मला आलं. इटलींत एकाही मुलीशी मी मैत्री ठेवली नाहीं. किंवा तसा प्रयत्नही केला नाहीं. अथेन्स-मध्यें मेरी भेटली आमच्या अथेन्स मधील शाखेत ती लायब्रेरियन आहे. पण कचेरींत हिंदुस्थान व इतर विषयांवर तेथील मुक्कामांत चर्चा करण्यापलीकडे माझी मजल गेली नाहीं. अर्थातच तिला मजबद्दल आदर वाटतो यांत सर्व कांहीं आलें. अशा निष्कलंक मनाने अन् शुद्ध शरिरानें

हिंदुस्थानला परत येण्यांत अन् माझ्या येण्याकडे डोळे लावून वाट पाहणाऱ्या सुलीला भेटण्याच्या नुसत्या कल्पनेंत किती आनंद आहे.

सुले मी इकडे व्यवस्थित राहिलों. तूं हिंदुस्थानांत अंतरींच दुःख दाबून टाकून हंसत खेळत राहिलीस. बाह्यतः बाह्य जगाला आपलं दुःख दाखवलं नाहीस. आपल्या या तपश्चर्येचं फळ आपल्याला मिळेल असा माझा आशावाद आहे.

आतां माझ्याकडून पत्र नाहीं. मी बहुधा २८ एप्रिलला मुंबईला येईन. अन् तिथून तार करीन.

तुझाच,
*अन्ता*

## ५१

सालेर्नो कँप—इटली
९·३·४६

सुले,

अखेर आज सकाळीं जड अंतःकरणानें अन् हलक्या खिशानें (पैसे खलास झाले म्हटलं सगळे) कॅसर्टा सोडलें. सर्वांचे निरोप घेऊन झाले. अन् कँपांत दाखल झालो. हा कँप समुद्रकिनाऱ्यावर आहे. इथें वाळूंत

गादी टाकून मी पडलों आहे. वारा सुटला आहे. लाटा उसळल्या आहेत. इटली भर यौवनांत आला आहे. अन् अशा वातावरणांत शेवटचे १-२ दिवस घालविण्याचें भाग्य मला लाभलं आहे. लढाईचा परिणाम कमी होतो आहे. पण नकोच तें वर्णन. तूं माझ्या मराठीला हंसतेस ना ? अग मराठीच्या वक्तृत्वाची बक्षिस मिळवलेला मी पण बघ माझी फजिती. आज महिन्याला मी कुठें असेन ?

तुझाच,

अनंत

६०

सार्लेर्नो—इटली

रात्रीं १० वाजतां

१२ मार्च ४६

सुले,

आतांच ९ वाजतां नक्की जाण्याचें ठरलें. उद्यां सकाळीं ६॥ वाजतां आम्हीं बोटीवर चढणार. उद्यां तुला तार करण्याची व्यवस्था केलीच आहे. आम्हीं २८।२९ तारखेला मुंबईला पोहोचूं. अजून मुंबईला उतरा-यचें कीं कराचीला हें कळलें नाहीं. पण तुला तार करीन. इटलींतून हें शेवटचें पत्र. आतां विशेष भेटी अन्ती.

तुझाच,

अनंत

## ६१

॥ श्री ॥

C. M. दिलवारा
पोर्टसैद
१८-३-४६

सुले,

शेवटीं दिलवारा बोटीनें इटली सोडली. तुला बोटीचा फोटो पाठवत आहे. आतां मात्र पत्रं पुरत हो. यापुढे एकमेकांपासुन दूर रहाणं नको. अन् पत्रही नको. वेळ मजत जातो आहे. पण सर्व समक्षच.

तुझाच,

अन्ता

REFBK-0006982

देशमुख आणि कंपनी,

१९१ शनिवार, पुणें २.